नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com


## आरसीबीच्या याचिकेवर आज सुनावणी

■ **वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ९ :**
चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्ध दाखल केलेला फौजदारी खटला रद्द करण्याबाबतची सुनावणी उद्या होणार आहे. या प्रकरणात त्यांना गोवण्यात आले आहे, असे म्हणत फ्रँचायझीने सोमवारी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

आरसीबीने असा युक्तिवाद केला आहे की, त्यांच्याविरुद्ध खोटे आरोप करण्यात आले आहेत. सोशल मीडियावर स्पष्टपणे सांगण्यात आले होते की पास मर्यादित आहेत. स्टेडियमचे दरवाजे ३ वाजता उघडले गेले, ज्यामुळे गर्दी वाढली.


* वर्ष ५५ * अंक ७२ * * नागपूर * मंगळवार, दिनांक १० जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## राहुलने आणले नाकीनऊ

सध्या राहुल गांधी मोदी सरकारवर आरोपांच्या फैरी झाडत आहेत. त्या आरोपांचे खंडन भाजपचे अनेक प्रवक्ते, वक्ते अनेक मुख्यमंत्री आणि बरेचजण ओरडून ओरडून करीत आहेत. पण राहुल गांधी दररोज नवा आरोप करतात आणि त्याला उत्तर कसे द्यावे. अशा विवंचनेत भाजप सारखा बलाढ्य पक्ष सध्यातरी हतबल झालेला दिसतो आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीचे जे निकाल आले. त्यात गडबड झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. त्याबद्दल याच स्तंभात आम्ही त्याचा उहापोह केला होता. आता भारतीय जनता पक्षाचे तमाम वक्ते आणि प्रवक्ते अगदी हिरिरीने खंडन करीत आहेत. खुलाश्यावर खुलासे करीत आहेत. त्यानंतर राहुल गांधी यांचेकडून आरोपावर आरोप होत आहेत. आज मोदी सरकारच्या तिसऱ्या कालखंडाच्या पहिल्या वर्षाच्या वर्धापन दिनानिमित्त मोदीप्रेमी वृत्तपत्रांमधून मोठमोठ्या जाहिराती प्रकाशित झालेल्या आहेत. भारतीय जनता पक्षाच्या दमदार प्रचार यंत्रणांकडून प्रचाराचा झंझावात उभा करण्यात आलेला आहे. इतर विरोधी पक्ष तेवढे फार्मात दिसत नाहीत. पण राहुल गांधी मात्र षटकारावर षटकार (सोप्या भाषेत छक्क्यावर छक्के) लगावत आहेत?. 2014 मध्ये पहिल्यांदा स्पष्ट बहुमताने भारतीय जनता पक्षाचे सरकार अगदी निर्विवादपणे सत्तेवर आले होते. तेव्हा राहुल गांधी काँग्रेसचे अर्धवट नेते होते. कारण तेव्हा ते भाजपचे आवडते पप्पू होते. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप त्यावेळच्या सत्ताधारी पक्षाने गंभीरपणे घेतले नव्हते. तसेच जनतेनेही ते गंभीरपणे घेतले नव्हते. आता राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावरच निशाणा साधलेला आहे. या आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे करून या आयोगाची विश्वासार्हता संकटात सापडली आहे. असे विधान केल्यानंतर निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांनी केलेले आरोप हे अधांतरी आणि हास्यास्पद आहेत. इतकेच म्हटले आहे. राहुल गांधी यांनी केलेले आरोप फेटाळताना निवडणूक आयोगाने कोणताही खुलासा केलेला दिसत नाही. हास्यास्पद आरोप फेटाळताना खुलासा हवा असतोच ना. ते मात्र निवडणूक आयोगाने केलेलेच नाही. भारत पाकिस्तान यांच्यातील नुकत्याच संपन्न झालेल्या लढाईमध्ये केंद्र सरकारला आपल्या भारतातील सर्व राज्यातील सरकारांनी अत्यंत मनापासून आणि सक्रिय दाद दिली होती. ती अत्यंत मनापासून होती. त्यावेळी केवळ राहुल गांधीच नाही किंवा काँग्रेस पक्षच नाही. तर देशातील तमाम विरोधी पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला होता. भारतातील विशिष्ट जातीचा पगडा असलेल्या पक्षांनीही सरकारसोबत असल्याचे अनेकदा म्हटले होते आणि आपल्या कृतीतून दाखवून दिले होते. पण आता ऑपरेशन सिंदूर संपल्यानंतर राहुल गांधी यांनी त्या सिंदूराची अशी काही चिरफाड केली आहे की, सरकारलाही त्याचे उत्तर देतादेता नाकीनऊ येत आहे. या पाकिस्तानबरोबरच्या लढाईत भारताच्या काही विमानांना झळ बसली आहेच. त्यात राफेलही फेल झाल्याचे आरोप होत आहेत. पण या ऑपरेशन सिंदूर बाबत देशाला स्पष्टपणे सांगण्यास काय हरकत आहे. असा राहुल गांधींचा आरोप आहे. ही गोष्ट अत्यंत वस्तुनिष्ठ आहे, असे बरेच राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मतभेदांमध्ये तिस?या पक्षाने मध्यस्थी करू नये. असे शिमला करारावेळी ठरलेले होते आणि ते त्रिकालाबाधित सत्य आहे. मग अमेरिकेचे उपटसुंभ अध्यक्ष ट्रम्प यांनी दहादहा, अकरा-अकरा वेळा आपल्यामुळेच युद्ध थांबले. म्हणजे आपण युद्ध थांबविण्याचे काम केले. असा गर्विष्ठपणा का केला. हे अद्याप कोणालाच कळलेले नाही. त्यालाही राहुल गांधी आणि लक्ष्य केलेले आहे. राहुल गांधी सध्या जे आरोप करीत आहेत. त्याचा खुलासा कुणीही करीत नाही. हल्ला करणारे दहशतवादी कुठे गडप झाले हेही समजत नाही. राहुल गांधी मात्र देशद्रोही वक्तव्य करतात. हेच राहुल गांधींच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असते. जे सध्याच्या कालावधीमध्ये अजिबात संयुक्तिक वाटत नाही, असे जनता म्हणते. मग या आणि अशा परिस्थितीत भारतीय जनता पक्षाला आता काँग्रेसवर गांधी कुटुंबावर चावूनचावून आणि घासूनघासून चोथा झालेले आरोप करावे लागत आहेत. म्हणजेच त्यात काँग्रेसमधील गांधी परिवाराची घराणेशाही, मुसलमानधाजीर्णा काँग्रेस पक्ष त्यासोबतच धर्मद्रोही किंवा देशद्रोही वगैरे सारखी उत्तरे देण्यात येत आहेत. एक राहुल गांधी सोडले. तर काँग्रेस पक्षात एवढ्या त्वेषाने बोलणारे कन्हैया कुमार यांच्यासारखे एक दोन वक्ते सोडले. तर काँग्रेस वाल्यांची तोंडे जवळ जवळ बंदच आहेत. पण एकटे राहुल गांधीच आम्ही वर म्हटल्याप्रमाणे जोरदार आरोप करून सरकारला हैराण करीत आहेत. आता परवाच राहुल गांधी यांनी महाराष्ट्र प्रमाणेच बिहारमध्येही मतमोजणी घोटाळा होईल. असा आरोप करून टाकला आहे. महाबलाढ्य भारतीय जनता पक्षाची फौज एकट्या राहुल गांधीच्या आरोपाचे उत्तर देण्यासाठी तेवढी प्रभावी ठरत नाही. एकूणच सध्या एकट्या राहुल गांधी यांनी सरकारच्या नाकीनऊ आणले आहे. असे म्हटले तर, ते वावगे ठरू नये.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# लोकल ट्रेनमधून पडल्याने चार प्रवाशांचा मृत्यू

**मुंबईनिकट दिवा ते मुंब्रा स्थानकादरम्यान भीषण अपघात**

**मुंबईची लाईफलाईन ठरली डेथलाईन**

**मृतकांच्या कुटुंबियांना ५ लाखांची मदत**

**मुख्यमंत्र्यांनी दिले चौकशीचे आदेश**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
ठाण्यातील मुंब्रा रेल्वे स्थानकावर आज सकाळी काही प्रवासी ट्रेनमधून खाली पडले. त्यापैकी ४ जणांचा मृत्यू झाला. हे प्रवासी ट्रेनच्या दरवाज्याला लटकलेले होते, जिथून ते खाली पडले. ही घटना लोकल ट्रेनची आहे. सकाळच्या वेळेत प्रचंड गर्दीमुळे हा अपघात झाला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेत १३ प्रवासी पडले, ९ प्रवासी जखमी तर ४ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) दिशेने जाणाऱ्या लोकलमध्ये प्रचंड गर्दी होती. त्यामुळे काही प्रवासी लटकून प्रवास करत होते.

मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ आल्यानंतर सीएसएमटीवरून आलेली दुसरी लोकल प्रवाशांना घासल्यामुळे दरवाज्याजवळ उभे असलेले १३ प्रवासी खाली पडले. त्यातील चार जणांना आपला जीव गमवावा लागला.





**मृतांच्या कुटूंबीयांना ५ लाख रुपये**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ चौकशी करण्याच्या सूचना दिल्या असून अपघातात ज्या ४ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटूंबीयांना मदत म्हणून आम्ही ५ लाख रुपये जाहीर केले आहेत. याशिवाय जखमींना ५० हजार, एक लाख किंवा दोन लाख रुपये दिले जातील. तसेच त्यांचा सर्व उपचार शासनाच्या माध्यमातून केला जाईल. याशिवाय ज्युपिटरला जे दोन रुग्ण गंभीर आहेत, त्यांचा सर्व खर्च शासन करेल, अशी माहिती गिरीश महाजन यांनी दिली आहे.

मुंब्रा दुर्घटनेतील तिघांचे मृतदेह जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले असून, त्यात राहुल संतोष गुप्ता (२८ ) रा. दिवा, सरोज केतन (२३ ) रा. उल्हासनगर, मयूर शाह (४४ ) यांचा समावेश आहे. एकाचे नाव समजू शकले नाही.

अपघातात शिवा गवळी (२३), आदेश भोईर (२६), रिहान शेख (२६), अनिल मोरे (४०), तुषार भगत (२२), मनीष सरोज (२६), मच्छिंद्र गोतारणे (३९), स्नेहा धोंडे (२१) आणि प्रियंका भाटिया (२६) इत्यादी ९ प्रवासी जखमी झाले असून, त्यातील काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी उसळली होती. रेल्वेवर गलथानपणाचा आरोप करीत अनेक प्रवाशांनी संताप व्यक्त केला. ही घटना नेमकी कशामुळे घडली, याची चौकशी रेल्वेने सुरू केली आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात जाऊन अपघातातील जखमींची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. तसेच त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी तातडीने सर्व उपचार करण्याच्या सूचना रुग्णालय प्रशासनाला दिल्या आहेत.

## मुंब्रा लोकल दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांची तत्काळ दखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**



मुंब्रा स्थानकाजवळ दिवा-मुंब्रा दरम्यान घडलेल्या हृदयद्रावक लोकल अपघातानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ दखल घेत दुर्घटनेतील मृत प्रवाशांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, दुर्घटनेतील जखमींवर तातडीने शिवाजी हॉस्पिटल आणि ठाणे सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असून, ज्युपिटर रुग्णालयातही दोन गंभीर जखमींवर उपचार सुरू आहेत. राज्य शासनाने या सर्व उपचारांचा खर्च उचलण्याचा निर्णय घेतला आहे. ही घटना नक्की कशामुळे घडली, याची चौकशी रेल्वे विभागाकडून सुरू झाली असून, स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून सर्व आवश्यक मदत, व्यवस्था करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात अतिरिक्त पोलीस अधीक्षक आकाश गिरीपुंजे शहीद

■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ९ :**
आज सोमवार ९ जून रोजी सकाळी ११ वाजता नक्षलवाद्यांनी छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात घडवून आणलेल्या भूसुरुंग स्फोटात अतिरिक्त पोलीस अधीक्षक आकाश राव गिरीपुंजे (४६) हे शहीद झाले. या हल्ल्यात इतर काही अधिकारी व पोलीस कर्मचारी जखमी झाल्याची माहिती आहे. गिरीपुंजे हे सुकमा जिल्ह्याच्या कोटा विभागात अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते.

सुकमा जिल्ह्यात नक्षलवादविरोधी अभियान राबविण्यात येत होते. या मोहिमेत कोंटा विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक आकाश राव गिरीपुंजे हे स्वतः जवानांसोबत पायदळ गस्तीसाठी रस्त्यावर उतरले होते. कोंटा-एराबीर मार्गावरील डोंड्रा गावाजवळ नक्षलवाद्यांनी आधीच सापळा रचून ठेवलेला होता. नक्षल्यांनी घडवून आणलेल्या स्फोटात गिरीपुंजे यांचा मृत्यू झाला. आणखी काही जवान जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.



## सरकारच्या निष्काळजीपणाचे बळी..

### रेल्वेमंत्र्यांची हकालपट्टी करा : काँग्रेसची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**



मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून सहा प्रवाशांचा मृत्यू झाल्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी थेट रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी करत केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला आहे.

हा केवळ अपघात नाही, तर केंद्रातील भाजपा सरकारच्या निष्क्रियतेचा थेट बळी आहे, असा गंभीर आरोप करत सपकाळ म्हणाले की, जीवाची पर्वा न करता लोकलला लटकून प्रवास करणं हे मुंबईकरांचं दैनंदिन वास्तव बनलं आहे.

पायाभूत सुविधा आणि मुंबईकरांच्या प्रवासाच्या नावाखाली गेल्या अनेक वर्षांपासून टेंडर द्या आणि कमिशन घ्या हा भ्रष्ट कारभार सुरु आहे.

अपघातानंतर लोकलमधून पडणं थांबवण्यासाठी बंद दरवाज्यांची घोषणा होते, पण प्रत्यक्षात कृती शून्य असते, रेल्वे प्रशासन आणि सरकारची झोप मोडत नाही, लोकल सेवा आता मृत्यूचा सापळा बनत चालली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची जबाबदारी ठरवून त्यांची तात्काळ हकालपट्टी झालीच पाहिजे, असा ठाम आग्रह हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या निवेदनात मांडला.

## रेल्वे प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**



मध्य रेल्वेच्या कसारा-सीएसएमटी फास्ट लोकलमध्ये घडलेल्या भीषण अपघातामुळे राज्यात हळहळ व्यक्त होत असतानाच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबाबत गंभीर चिंता व्यक्त करत प्रशासनाला तातडीने ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

दुर्घटनेत प्रवाशांचा झालेला मृत्यू अत्यंत दुर्दैवी आणि क्लेशदायक आहे. या घटनेमुळे उपनगरी रेल्वेवरील गर्दी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे, असे अजित पवार यांनी स्पष्टपणे नमूद केले.

अजित पवार यांनी जोरदार शब्दांत रेल्वे प्रशासनाला उद्देशून सांगितले की, उपनगरीय रेल्वेसेवा ही मुंबईच्या लाखो नागरिकांची जीवनवाहिनी आहे. ही सेवा अधिक प्रभावी व सुरक्षित करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची जबाबदारी रेल्वे प्रशासनाची आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या अपघातानंतर उपमुख्यमंत्र्यांनी घेतलेली स्पष्ट भूमिका ही मुंबईतील लोकल व्यवस्थापनावर दबाव निर्माण करणारी ठरू शकते. दररोज कोट्यवधी प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या मुंबई लोकलमध्ये वाढती गर्दी, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि प्रवाशांच्या समस्यांकडे होणारे दुर्लक्ष हे मुद्दे पुन्हा ऐरणीवर आले आहेत. आजच्या घटनेने विरोधकांना टीकेची संधी मिळाली आहे.

## मुंबई लोकलमधील अपघातानंतर रेल्वे मंत्रालयाचा मोठा निर्णय

## नॉन-एसी लोकलमध्ये येणार 'स्वयंचलित दरवाजे'

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. ९ :**
मुंबईत आज घडलेल्या हृदयद्रावक लोकल अपघाताच्या पार्श्वभूमीवर रेल्वेमंत्री आणि रेल्वे बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इंटीग्रल कोच फॅक्टरीच्या तज्ज्ञांसोबत तातडीची बैठक घेतली. नॉन-एसी लोकल ट्रेन्समध्ये ऑटोमॅटिक डोअर क्लोजिंग लागू करताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर उपाय शोधण्याचा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

नॉन-एसी कोचमध्ये हवा खेळती नसल्याने स्वयंचलित दरवाजे बसवल्यास प्रवाशांचा दम घुटण्याची शक्यता निर्माण होते. ही अडचण लक्षात घेऊन, कोच डिझाइनमध्ये तातडीने तीन मोठे बदल करण्याचा निर्णय घेतला गेला. दरवाज्यांमध्ये 'लूवर्स' (हवादार पट्ट्या) बसवण्यात येणार आहेत, ज्यामुळे दरवाजे बंद असतानाही हवेचा प्रवाह सुरळीत राहील.

कोचच्या छतावर 'व्हेंटिलेशन युनिट्स' बसवण्यात येणार आहेत, जे बाहेरून ताजी हवा आत आणतील आणि गाडीच्या आतले तापमान आणि ऑक्सिजनची पातळी नियंत्रित ठेवतील. प्रत्येक कोचमध्ये 'वेस्टीब्यूल्स' असणार आहेत, जेणेकरून प्रवासी एक कोचमधून दुसऱ्या कोचमध्ये सहजपणे जाऊ शकतील. त्यामुळे गर्दीचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

या नवनिर्मित डिझाईनवर आधारित पहिली ट्रेन नोव्हेंबर २०२५ पर्यंत तयार केली जाईल. आवश्यक चाचण्या आणि प्रमाणन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर जानेवारी २०२६ पासून ती मुंबईच्या उपनगरीय सेवेत दाखल होणार आहे.

हा उपक्रम सध्या सुरू असलेल्या २३८ एसी लोकल गाड्यांच्या निर्मितीच्या बाहेरचा स्वतंत्र प्रयत्न आहे. मुंबईकरांसाठी अधिक सुरक्षित आणि आधुनिक प्रवास देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय महत्वाचा असून, हे आता केवळ स्वप्न नाही, तर धोरणात्मक कृतीच्या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरणार आहे.




भुमिपुजन सोहळा

आर्वी विधानसभा मतदार संघाचे तत्कालीन आमदार मा. श्री. दादाराव केचे साहेब यांच्या अथक प्रयत्नाने आदिवासी विकास उपयोजना क्षेत्रातील अर्थसंकल्पीय बजेट सन २०२४-२५ अंतर्गत रस्ते/पुल बांधकाम, वैशिष्ट्यपूर्ण व जनसुविधा योजना अंतर्गत आर्वी, आष्टी व कारंजा या तालुकायतील एकून रुपये २३ कोटी ४६ लक्ष रुपये निधी मंजूर केलेल्या विकास कामाचे भूमीपूजन दि.१०/०६/२०२५ रोज मंगळवारला मा. श्री. दादाराव केचे आमदार विधानपरिषद महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. श्री. सुमितजी वानखेडे आमदार आर्वी विधानसभा क्षेत्र यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत सौ. सरिताताई वि.गाखरे (मा.जि.प.अध्यक्ष. वर्धा) या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितित खालील दर्शविलेल्या वेळेनुसार भुमीपुजन संपन्न होईल. तरी आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे. हि विनंती.

| अ.क्र. | कामाचे नांव | किमत (कोटी रू.) | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | कोपरा (पु) येथील शंकरराव पत्रे ते गणेश ठाकरे तसेच सुरेश कुकडे ते अवधूत शेंडे यांच्या घरापर्यन्त सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | १०.०० लक्ष | ११.०० | कोपरा.पु |
| २ | कोपरा (पु) येथील श्री. मधुकरराव पोटे ते दिलीप सहारे तसेच मधुकर कातोडे ते प्रमोद विरुळकर यांच्या घरापर्यन्त सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | १०.०० लक्ष | ११.१५ | कोपरा.पु |
| ३ | नांदपूर-शिरपुर-जळगाव प्रजीमा ०२ रस्त्याचे रुंदीकरण-मजबूतीकरण-सिमेंटीकरण व डांबरीकरण करणे. ता. आर्वी | १०.०० कोटी | ११.३० | जळगाव |
| ४ | नांदपूर-चिस्तूर-खडकी-आष्टी प्रजिमा- ०२ वर आष्टी शहरातील सिमेंट रस्ता व दोन नवीन पुलाचे बांधकाम करणे. ता आष्टी | ६.५० कोटी | १२.०० | आष्टी जुन्या पंचयात समिति जवळ |
| ५ | लहानआर्वी-अंतोरा प्रजिमा ०१ ता आष्टी सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | १.५० कोटी | १२.३० | जुना अंतोरा |
| ६ | पोरगव्हाण ते पंचाळा ता. आष्टी रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे. | ३.५० कोटी | ०१.०० | पोरगव्हाण |
| ७ | नगरपंचायत कारंजा प्रभाग १६ मध्ये कारंजा-येनगावरस्ता ते नरेश चोपडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे ता. कारंजा | १५.०० लक्ष | ०२.०० | कारंजा शहर |
| ८ | नगरपंचायत कारंजा प्रभाग १६ येथे हायवे रोड शक्ती गॅरेज ते रेवतकर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | २०.०० लक्ष | ०२.१५ | कारंजा शहर |
| ९ | नगरपंचायत कारंजा प्रभाग १६ येथे श्री रेवतकर ते श्री शिरपुरकर तसेच ईश्वरदास ढोबाळे ते कारंजा- धावडी रस्त्यापर्यत सिमेंट रस्ता बाधकाम करणे. | १७.०० लक्ष | ०२.३० | कारंजा शहर |
| १० | नगरपंचायत कारंजा येयील प्रभाकर सावरकर ते धनराज चोपडे तसेच ॲड. श्री प्रकाश धारपुरे यांचे घराजवळील रस्ता बांधकाम करणे. | १४.०० लक्ष | ०२.४५ | कारंजा शहर |
| ११ | नगरपंचायत कारंजा प्रभाग ९ मध्ये देवेंद्र पालिवाल ते साई श्रद्धा मंगल कारल्यापर्यंत लादीकरण करणे तसेच रामदास सावरकर ते विशाल दिवाने याच्या घरपर्यंत लादीकरण करणे. | १०.०० लक्ष | ०३.०० | कारंजा शहर |
| १२ | सिदिविहीरी ते बुदलागाड ग्रा.मा. ५ रस्त्याची सुधारणा करणे. ता कारंजा. | १ कोटी | ०३.३० | सिंदिविहीरी |
| १३ | ढगा भुवन ते रा.मा २४७ रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे. ता कारंजा. | १ कोटी | ०४.३० | ढगा |

विनीत :- भारतीय जनता पार्टी, आर्वी, आष्टी व कारंजा तालुका

# लोकशाही मूल्ये आत्मसात करण्याची गरज : डॉ. नीलम गोऱ्हे



**पुणे :** अनेक प्रकारच्या सामाजिक प्रवाहांनी, स्थित्यंतरांनी आपले जगणे प्रभावित होत असते. वर्ण, प्रदेश, भाषा अशा कारणांनी समाजात असमानता आढळते. मात्र, मुलांच्या भवितव्यासाठी समाजाने लोकशाही मूल्ये आत्मसात करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे मत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रविवारी व्यक्त केले. सह्याद्री प्रकाशनाच्या वतीने अस्मिता जोशी-राजे शिकणारे पालक, घडणारी मुलं या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे, सह्याद्री प्रतिष्ठानच्या संचालक स्मिता देशपांडे, प्रकाशक डॉ. सागर देशपांडे या वेळी उपस्थित होते. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, समाजात मिसळल्याने अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. दुःखाचा प्रसंग आलेल्या कुटुंबांना आपण भेट देत असतो. त्यांचे सांत्वन करतो. मात्र, त्यांच्या आनंदात, इतर कोणत्याही प्रसंगात कुणीही सहभागी होत नाही. अशा कुटुंबांना समाजात सामावून घ्यायला हवे. त्याने मुलांच्यासमोरचे क्षितिज विस्तारेल. सध्या पालक आणि मुलांच्यातील संवाद कमी होताना दिसतो आहे, तर काही ठिकाणी सुसंवादाऐवजी सांगण्याची सवय मुलांना लागते आहे. पालक आणि मुले यांच्यात खुला संवाद असणे गरजेचे असते.

# माळेगाव निवडणुकीसंदर्भात शरद पवार यांचीही सावध भूमिका



**बारामती :** माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीसंदर्भात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसनेही सावध भूमिका घेत थांबा आणि पाहा हे धोरण स्वीकारले आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते, खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत बारामती येथील गोविंदबाग या पवार यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रविवारी झाली. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आणखी चार दिवस असल्याने पवार यांनी थांबा आणि पाहा हे धोरण स्वीकारले असल्याची माहिती बैठकीनंतर सभासदांकडून देण्यात आली. माळेगाव कारखान्याची निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकीकडे राज्य सरकारमध्ये महायुती एकत्रित सत्तेत असताना भाजपच्या दोन नेत्यांनी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कडवे आव्हान दिले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) बळीराजा सहकार बचाव पॅनेलद्वारे निवडणुकीला सामोरे जाणार, असे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात वरिष्ठांकडून अद्याप त्यांना हिरवा कंदील दिला गेलेला नाही. रविवारच्या बैठकीत यावर ठोस निर्णय होईल, अशी अपेक्षा होती. परंतु, त्यात दोन दिवस वाट पाहून निर्णय घेण्याचे निश्चित करण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

# निवडणूक आयोग मोदी-शहाच्या पिंजऱ्यातील पोपटः संजय राऊत



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी निवडणूक आयोग, भाजप व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कडाडून हल्ला चढवला. निवडणूक आयोग हा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पिंजऱ्यातील पोपट झाला आहे. खरा पोपट विठू विठू तरी बोलतो. पण हा पोपट तेवढाही बोलत नाही. सद्यस्थितीत हा पोपट जिवंत आहे की मेला? हे ही सांगण्याची कुणाची हिंमत होत नाही, असे ते म्हणाले. राहुल गांधी यांनी शनिवारी एका संपादकीय लेखाद्वारे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर संशय व्यक्त केला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा आरोप फेटाळून लावत त्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला. संजय राऊत यांनी सोमवारी पत्रकार परिषदेद्वारे या घटनाक्रमावर भाष्य करताना राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नाला भाजप का उत्तर देत आहे? असा कळीचा प्रश्न उपस्थित केला.

# सुरक्षा यंत्रणांमध्ये मूलगामी बदलांची गरज :ॲड. प्रकाश आंबेडकर



**मुंबई :** उपनगरी रेल्वेच्या दिवा ते मुंब्रा स्थानकादरम्यान घडलेली भीषण दुर्घटना ही अत्यंत दुःखद आणि मन हेलावणारी आहे, असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय रेल्वेच्या कार्यपद्धतीवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. ही केवळ अपघाताची घटना नाही, तर एक गंभीर चेतावणी आहे. सोशल मीडियावर रील्स अपलोड करण्याइतपत वेळ असलेल्या रेल्वे प्रशासनाने जर प्रवाशांच्या सुरक्षेकडे लक्ष दिलं असतं, तर आज निष्पाप प्रवाशांचे प्राण गेले नसते, अशा संतप्त भावना त्यांनी ट्विटरवरून व्यक्त केल्या. आंबेडकर यांनी केलेल्या ट्विटमध्ये भारतीय रेल्वेच्या गोंडस सोशल मीडिया प्रचारावर रोष व्यक्त करत, प्रशासनाने दिखाऊपणा बाजूला ठेवून प्रत्यक्ष सुरक्षेवर लक्ष केंद्रीत करावे, अशी स्पष्ट मागणी केली आहे.

# पाण्याच्या टाकीत पडून बालिकेचा मृत्यू

**नाशिक:** देवळा तालुक्यातील खामखेडा येथे घराच्या अंगणात खेळत असताना पाण्याच्या टाकीत पडून दोन वर्षाच्या बालिकेचा मृत्यू झाला. सोमवारी सकाळी ही घटना घडली. देवांशी सोज्वळ असे या बालिकेचे नाव आहे. खामखेडा येथील कोळीवाडा वस्तीत आकाश सोज्वळ कुटुंबिय वास्तव्यास आहे. आकाश यांची कन्या देवांशी सोमवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास घराच्या अंगणात खेळत होती. आई घरकामात व्यस्त असताना देवांशी घराजवळ असलेल्या पाण्याच्या टाकीकडे कधी गेली, हे कोणालाच समजले नाही.

बराच वेळ मुलीचा आवाज न आल्याने शोधाशोध सुरु झाली असता देवांशी पाण्याच्या टाकीत बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. कुटुंबियांनी तिला तातडीने खामखेडा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तपासणी केल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. नीलेश ठाकरे यांनी तिला मृत घोषित केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सीबीएससी अभ्यासक्रमात समाविष्ट करा
# खासदार रविंद्र वायकर यांची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

छत्रपती शिवाजी महाराज यांचे अद्वितीय कार्य, हिंदवी स्वराज्याची स्थापना, कुशल युद्धनीती आणि धर्मनिरपेक्ष शासनपद्धती यांचा अभ्यास देशभरातील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातून व्हावा, यासाठी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे थेट पत्र पाठवून सीबीएससी अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक १६७४ मध्ये झाला.



तो भारताच्या इतिहासातील सुवर्णक्षण मानला जातो. महाराज हे केवळ मराठा साम्राज्याचे संस्थापक नव्हते, तर दूरदृष्टी असलेले प्रशासक, निर्भीड योद्धा, आणि जनकल्याणवादी नेतृत्वाचं प्रतीक होते.

"त्यांच्या जीवनातून नेतृत्व, देशभक्ती, सामाजिक एकता आणि आत्मनिर्भरतेचे मूल्य शिकता येते. अशा महामानवाचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करणे ही त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल," असे वायकर यांनी पत्रात नमूद केले आहे.

वायकर यांनी स्पष्ट केलं की, सीबीएससी अभ्यासक्रमात आधीही अनेक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. मग भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे मूर्तिमंत उदाहरण असलेले शिवाजी महाराज यांचा इतिहास का नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, "छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सीबीएससीच्या अभ्यासक्रमात आणल्यास, देशभरातील विद्यार्थी भारताचा समृद्ध इतिहास आणि विविधतेतील एकतेचे दर्शन अधिक सखोल पद्धतीने घेऊ शकतील." शिवराज्याभिषेकाच्या ३५२ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ही मागणी केल्याचे त्यांनी नमूद केले असून, आगामी शैक्षणिक वर्षातच या मागणीवर कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा वायकर यांनी व्यक्त केली आहे. हे केवळ इतिहास शिकवण्याचे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनात आत्मगौरव, राष्ट्रभक्ती आणि सशक्त नेतृत्वाचे बीज पेरण्याचे कार्य ठरणार आहे.

# कामाच्या अतिताणामुळे डॉक्टरची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :

गुजरातच्या भावनगर येथील डॉ.श्याम व्होरा (वय- २५) हा तरुण पुण्यातील नामांकित रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात रेडियोलॉजिस्ट म्हणून शिक्षण घेण्यास आला होता. परंतु कामाच्या अतिताणामुळे त्याने रुबी रुग्णालयापासून जवळच असलेल्या ढोले पाटील चौकातील दामोदर भवन या वसतिगृहातील आपल्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन त्याचा मृतदेह ताब्यात घेतला. तसेच तो शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवला. रुग्णालयातील कामाच्या अतिताणामुळे या प्रशिक्षणार्थी डॉक्टरने आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

याबाबत पोलिसांनी डॉ. श्याम व्होरा याच्या कुटुंबियास माहिती दिली. पीडित कुटुंब गुजरात मधील भावनगर येथून सोमवारी पुण्यात दाखल झाले. त्यानंत पोलिसांनी मृत तरुणाचा मृतदेह त्यांच्या स्वाधीन केला. पोलिसांच्या माहितीनुसार, डॉ.शाम व्होरा हा रुबी रुग्णालयात निवासी डॉक्टर म्हणून काम करत होता. रुबी रुग्णालयाचे वतीने चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहात तो अन्य एका डॉक्टर सोबत राहत होता. रविवारी रात्री तो रुममध्ये एकटाच असताना त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्याने लिहून ठेवलेली एक चिठ्ठी पोलिसांना प्राप्त झाली आहे. त्यात कागदावर त्याने आपल्या मोबाईलचा पासवर्ड लिहून ठेवला होता. मृताने कुणावरही आरोप केले नसल्यामुळे त्याच्या आत्महत्या मागील गूढ वाढले आहे. दरम्यान, याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. मयत डॉक्टरयाच्या कुटुंबीयांनी याबाबत कोणती अद्याप तक्रार पोलिसांकडे दाखल केली नाही. कोरेगाव पार्क पोलिस पुढील चौकशी करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# पीओपी मूर्तीवरील बंदी उठली

## सीपीसीबीची उच्च न्यायालयात भूमिका, विसर्जनाचा मुद्दा राज्य सरकारच्या कोर्टात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मूर्ती विरुद्ध शाडूच्या मूर्ती हा वाद सध्या सुरू असताना पीओपी मूर्ती घडवण्यावर आणि त्याची विक्री करण्यावर बंदी नसल्याची सुधारित भूमिका केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) सोमवारी उच्च न्यायालयात मांडली. तथापि, पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतील विसर्जनाला मनाई कायम राहील, असेही सीपीसीबीने स्पष्ट केले.

पीओपी मूर्तीसंदर्भातील आपण आखलेली मार्गदर्शक तत्त्वे ही केवळ सूचना किंवा शिफारसींच्या स्वरूपात आहेत, असे देखील सीपीसीबीतर्फे उपरोक्त भूमिका मांडताना स्पष्ट करण्यात आले. सीपीसीबीच्या भूमिकेनंतर पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतातील विसर्जनाबाबत राज्य सरकारने ३० जूनपर्यंत तोडगा काढावा आणि त्याचा अहवाल सादर करावा, असे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. तथापि, न्यायालयाच्या परवानगीशिवाय पीओपी मूर्ती विसर्जन केले जाणार नाही, असेही न्यायालयाने बजावले.

विशिष्ट परिस्थितीत पीओपीला परवानगी देणे शक्य असल्याचा दावा राज्य सरकारने मागील सुनावणीच्या उच्च न्यायालयात केला होता. वादग्रस्त मुद्याच्या अभ्यासासाठी नियुक्त केलेल्या समितीने केलेल्या शिफारशींचा दाखला देऊन सरकारने हा दावा केला होता. तसेच, समितीचा शिफारशींचा अहवाल निर्णयासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (सीपीसीबी) पाठवल्याचेही न्यायालयात सांगितले. ऑगस्ट महिन्यात गणेशोत्सव असल्याच्या पार्श्वभूमीवर समितीच्या शिफारशींवर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश न्यायालयाने सीपीसीबीला दिले होते. या शिफारसी विचारात घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे पीओपी मूर्ती घडवण्यावर आणि त्याच्या विक्रीवर बंदी नसल्याचे, आपली मार्गदर्शक तत्त्वे सूचना स्वरुपात असल्याची नवी भूमिका सीपीसीबीने न्यायालयात मांडली. परंतु, मूर्तीचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावांत केले जावे, असेही सीपीसीबीने स्पष्ट केले. त्यामुळे, सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींच्या विसर्जनाचा मुद्दा कायम राहिल्याने त्याबाबत सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा, असे आदेश न्यायालयाने दिले. तत्पूर्वी, पीओपीबाबत कुठेतरी मध्यम मार्ग काढायला हवा. त्यामुळे, सरकारने या मुद्यासाठी एक तज्ज्ञांची समिती नेमली होती. या समितीने आपल्या अहवालात समुद्रात पीओपी मूर्तीचे विसर्जन करणे शक्य असल्याचे म्हटले आहे. समितीचा अहवाल सीपीसीबीकडे पाठवण्यात आला असून सीपीसीबीच्या प्रतिसादाची वाट पाहत असल्याचे सरकारच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले होते.



# रेल्वेत विसरलेले सोन्याचे दागिने ४ तासांनी मिळाले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

मुंबई- एका महिलेची लोकल ट्रेनमध्ये राहिलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग वडाळा रेल्वे पोलिसांनी शोधून परत मिळवून दिली. त्या बॅगेत ४ लाखांचे सोन्याचे दागिने होते. मात्र रेल्वेच्या मदत क्रमांकावर संपर्क साधून लवकर प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. साताऱ्यात राहणाऱ्या प्राजक्ता बावधाने आपल्या ४ वर्षाच्या मुलासह मुंबईत भावाकडे आल्या होत्या. त्या भावासह त्या मानसरोवर येथे राहणाऱ्या मोठ्या बहिणीला भेटायला जात होत्या. गावातील घरात चोरी होऊ नये म्हणून त्यांनी घरात असलेले ४ लाखांचे सोन्याचे दागिने घेतले होते. त्यांनी कुर्ल्यावरून पनवेलला जाणारी ट्रेन पकडली. त्यांचा भाऊ उदय शिंदे हा पुरूषांच्या डब्यात होता तर प्राजक्ता या मुलासह महिलांच्या प्रथम श्रेणी डब्यात होत्या. सायंकाळी ६ वाजता ते मानसरोवर रेल्वे स्थानकात उतरले. त्यावेळी गडबडीत बॅग ट्रेनमध्येच विसरल्याचे प्राजक्ता यांच्या लक्षात आले. दुसऱ्या डब्यातून उतरलेला त्यांचा भाऊ उदय शिंदे याला त्यांनी हा प्रकार सांगितला.

# जलसंपदा खात्यातील इंजिनिअर्सच्या बढत्या-बदल्यांना मुख्यमंत्र्यांकडून 'ब्रेक'

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

राज्य सरकारच्या जलसंपदा विभागात इंजिनिअर पदावरील 60 हून अधिक बढत्या आणि बदल्यांमागे आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप होत असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर तात्काळ कारवाई करत संपूर्ण प्रक्रिया स्थगित केली आहे.

या निर्णयामुळे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वतुर्ळात खळबळ उडाली आहे. गोपनीय सूत्रांच्या माहितीनुसार, जलसंपदा खात्यातील महत्त्वाच्या पदांवर बढती किंवा बदली मिळवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे अर्थपूर्ण व्यवहार सुरू होते. यामध्ये मंत्र्यांचे निकटवर्तीय सक्रिय असल्याचे उघड झाले. गिरीश महाजन (तापी, विदर्भ व कोकण खोरे) आणि राधाकृष्ण विखे-पाटील (गोदावरी व कृष्णा खोरे) या दोन जलसंपदा मंत्र्यांच्या नावांसोबतच, विखे-पाटील यांचे पुत्र सांसद डॉ. सुजय विखे पाटील यांचे काही 'करामती' मुख्यमंत्र्यांच्या कानावर गेल्याचे सांगितले जात आहे. जलसंपदा विभागाचे प्रमुख सचिव दीपक कपूर यांनी या बदल्यांमागे सुरू असलेल्या अनियमितता व पैशांचे राजकारण हेरले आणि त्यांनी थेट संबंधित मंत्र्यांना यासंदर्भात सावध केले.

# मुंबई रेल्वे प्रवासी संघाकडून डिआरएम यांच्यावर कारवाईची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

ठाणे -मुंब्रा रेल्वे स्थानक जवळ झालेल्या अपघात प्रवाशांचा मृत्यू झाला. या घटनेने प्रवासी संघ नाराजी व्यक्त करत आहे. गर्दीमुळे लोकलमधून खाली पडल्याची अत्यंत दुःखद घटना घडली आहे. DRM यांचा राजीनामा घ्यायला हवा अशी मागणी मुंबई रेल्वे प्रवासी संघाने केली.

जखमी प्रवाशांना तातडीने वैद्यकीय मदत देणे गरजेचे आहे. मुंबई रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष मधू कोटियन आणि उपाध्यक्ष सिद्धेश देसाई यांनी यापूर्वी अनेक वेळा विभागीय रेल्वे व्यवस्थापक, महाव्यवस्थापक आणि रेल्वे बोर्डकडे दिवा ते कळवा या जीवघेण्या मार्गाबाबत तक्रार केली आहे. या मार्गावर यापूर्वीही अनेक प्रवाशांनी प्राण गमावले आहेत. कल्याण ते ठाणे दरम्यानच्या दोन नवीन मार्गांचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना अधिक लोकल सेवा मिळेल अशी अपेक्षा होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन प्रसंगी अधिक लोकल सेवेचे आश्वासन दिले होते.

# धारावी बचाव आंदोलनाआधीच शिवसेनेचा व्यंगचित्रातून उद्धव ठाकरेंवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ९ :

धारावी पुनर्विकास प्रकल्पाला विरोध करत धारावी बचाव आंदोलन छेडणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या उबाठा गटावर शिवसेनेने आज थेट व्यंगचित्राच्या माध्यमातून जोरदार हल्ला चढवला. शिवसेनेने सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेले हे व्यंगचित्र सध्या चांगलेच व्हायरल झाले असून, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या विरोधकांच्या भूमिकेवर जनतेत टीकेची लाट उसळली आहे.




या व्यंगचित्रात उद्धव ठाकरे स्वतः धारावी बचाव आंदोलनाचा फलक हातात घेऊन उभे आहेत आणि त्यांच्या समोर एक सामान्य धारावीकर, ज्याच्या चेहऱ्यावर हताशपणा स्पष्ट आहे, तो पुनर्विकास प्रकल्पातील घराच्या चावीकडे बोट दाखवत आहे. "घर हवंय साहेब, आंदोलन नाही!" असा व्यथित भाव या चित्रातून प्रतीत होतो.

यातून उबाठा गटावर असा आरोप होतोय की, ते सामान्य धारावीकरांना हक्काचं घर मिळवण्याच्या प्रक्रियेला अडथळा आणत आहेत. शिवसेनेच्या म्हणण्यानुसार, हे व्यंगचित्र म्हणजे धारावीकरांच्या मनातील भावना व्यक्त करणारा आरसा आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सुरु असलेली घरांची नोंदणी सध्या अंतिम टप्प्यात असून, तब्बल ९०% पेक्षा जास्त धारावीकरांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. राज्य सरकारने या प्रकल्पात एक ऐतिहासिक निर्णय घेतला असून, अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांनाही घरे देण्याचं आश्वासन दिलं आहे. याशिवाय पात्र लाभार्थ्यांना ३५० चौ.फुटांची घरे मुंबईतच देण्याची योजना आखण्यात आली आहे. अशा परिस्थितीत उबाठा गटाचे आंदोलन म्हणजे "विकासात अडथळा आणि धारावीकरांच्या हक्कावर घाला" असल्याची भावना शिवसेनेने व्यक्त केली आहे. शिवसेनेचे हे व्यंगचित्र केवळ व्यंग नाही, तर एक सशक्त राजकीय संदेश ठरत आहे. सोशल मीडियावर शिवसैनिकांनी आणि नागरिकांनी उबाठा गटाच्या भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली असून, "धारावीकरांच्या नवजीवनात कोण अडथळा ठरतंय?" यावर चर्चा रंगली आहे. राजकारण, आंदोलनं आणि व्यंगचित्रं यामध्ये अडकलेलं हे प्रकरण सध्या जनतेच्या लक्षात आहे."आम्हाला स्वतःच्या नावावर घर हवंय. आमच्या संधीवर कोणीही राजकारण करू नये." शेवटी शिवसेनेचं हे व्यंगचित्र हे केवळ चित्र नाही, तर धारावीच्या हक्कासाठी लढणाऱ्या लाखो नागरिकांच्या मनातील आवाज असल्याची भावना अनेकांनी सोशल मीडियावर व्यक्त केली आहे.

# बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे पारदर्शकतने पूर्ण करा : नितेश राणे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

कारंजा, आनंदवाडी, मिरकरवाडा व ससून डॉक येथील बंदरे ही कोकणाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असून यातून तेथील लोकांच्या आर्थिक विकासास चालना मिळेल. या बंदरांच्या ठिकाणी सुरू असलेली विकासकामे गती व पारदर्शकतेने पूर्ण करा, अशा सूचना मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.



मंत्रालयात मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाची आढावा बैठक मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला विभागाचे आयुक्त किशोर तावडे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश पाठक, उपसचिव श्री. जकाते, सह आयुक्त दिनेश देवरे, प्रादेशिक उपायुक्त प्रकाश भादुले यासह विभाग व महामंडळातील अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राणे यांनी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाच्यावतीने सुरू असलेल्या बंदरांचा विकास व आधुनिकीकरणाच्या कामांचा आढावा घेतला. यामध्ये मुंबई शहरातील ससून डॉक, रायगड जिल्ह्यातील कारंजा (उरण), सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी व रत्नागिरी जिल्ह्यातील मिरकरवाडा येथील बंदरांच्या विकासकामांची माहिती घेतली.

येथील बंदरांच्या ठिकाणी मासे लिलाव शेड, बर्फ कारखाना, वर्कशॉप, मासेमारीच्या जाळ्यांची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी शेड, प्रसाधनगृह यांसह विविध काम केली जात आहेत. सध्या सुरू असलेल्या कामांसाठी ससून गोदी मच्छीमार बंदर येथील विकास कामांसाठी 92 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, आनंदवाडी येथील विकासकामांसाठी 88 कोटी 44 लाख रुपये, मिरकरवाडा येथील विकासकामांसाठी 26 कोटी 23 लक्ष रुपये, कारंजा येथील विकासकामांसाठी 149 कोटी 80 लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कोकणातील सात ठिकाणी होत असलेल्या मासे उतरवणी केंद्रातील कामांचा देखील यावेळी आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्र सागरी मच्छिमार कल्याणकारी महामंडळ आणि महाराष्ट्र भूजलाशय मच्छीमार कल्याणकारी महामंडळ यांची घोषणा राज्य शासनाने ऑक्टोबर 2024 मध्ये केली आहे. यासाठी मुंबई व नागपूर येथील कार्यालयातील सध्याच्या कार्यरत यंत्रणेमार्फत काम केले जावे. या दोन्ही महामंडळाचे कामकाज तातडीने सुरू होण्यासाठी विभागाने कार्यवाही करावी, असे आदेशही मंत्री राणे यांनी यावेळी दिले.

# वचन एकनिष्ठेच...!

पती पत्नीच्या नात्याची नाळ जन्मोजन्मी जुळून राहावी याकरिता हिंदू धर्मात वटपौर्णिमा हा धार्मिक सण मोठया उत्सवात साजरा होतो. यादिवशी स्त्रिया पतीच्या दीर्घ आयुष्य याची मनोकामना करून वडाच्या झाडाची पूजा अर्चा उपवास करून एकच मागणं मागते की देवा ह्या वडाच्या झाडाप्रमाणे पतीचं दिर्घ आयुष्य,तसेच अवाढव्य संसाराचा डोलारा, तितकंच व्याप, वाढू दे ही मनोमन इच्छा देवाला अर्पण करते.

मुळात एकनिष्ठ पतिपत्नी हे समीकरण खूप आवश्यक आहे विवाहाच्या बंधनात अडकताना सावधान होऊन प्रेम विश्वास सहवास, एकनिष्ठ प्रेम ही कुठल्याही नात्याची आवश्यक अशी बाजू आहे. आजकालच्या जीवनात नाते संबंधात दुरावा तसेच मोजकेच प्रेम शिल्लक राहील आहे. घरातील नाती घट्ट होण्याऐवजी बाहेरच्या विश्वात गुरफटून या पती पत्नीच्या नात्यात दुरावा निर्माण होत आहे. मग कमी असणारा सहवास, संवाद, तडजोड, दुरी निर्माण होऊन काही नाती ही निववळ कागदोपत्री आहेत की काय असा प्रश्न मनात येतो.

पती पत्नीचं नात्यात प्रामाणिक असणं हे सुंदर असण्यापेक्षा ही महत्वाचं आहे. सुंदरता ही वयाप्रमाणे बदलणारी आहे तर प्रामाणिक पणा हा कायम टिकून राहणारा अनमोल दागिना आहे. आपल्या नात्यात प्रामाणिक असणारी खूप मंडळी आनंदी तर आहेतच त्याहूनही त्यांच्या नव्या



पिढीला आदर्श ही आहेत. दुसरं महत्वाचे म्हणजे विश्वास हाही तेवढाच महत्वाचा आहे. दोन जीवांचे नाते हे दृढ विश्वास, यावर आधारित असून त्या विश्वासाला तडा जाणार नाही. यासाठी एकमेकांना समजावून घेणं व नात्याच्या बंधनाला न्याय देणे ही महत्वाचे आहे सहजीवनात असणारा एकमेकांचं सहयोग ही तितकाच प्रामाणिक प्रयत्न आहे प्रत्येक कामात असणारा सहयोग हे नात्यात जोड विश्वास प्रेम आपुलकी ची भावना निर्माण करुन ऋणानुबंध व नात्याची जडणघडण आणखी घट्ट वाढविणारा आहे

काळजाच्या ठोक्याप्रमाणे एकमेकात स्पंदने व्हावी जितकी मोकळीक मिळते तितका विश्वास ही दृढ व्हावा यासाठी निस्वार्थ प्रेम आपल्या पार्टनर वर असलं पाहिजे तेव्हाच कुठे वट सावित्री चें व्रत फळाला लागेल अन्यथा कुठला सात जन्म ....हा जन्म जरी फळाला लागला तरी धन्य....

नोकरी किंवा कामाच्या ठिकानी काम करतांना पुरुष व महिला यांनी काहीस मर्यादित राहून कुटुंब व्यवस्थेला तडा जाणार नाही याची मर्यादा पाळली पाहिजे रोजच्या जीवनात एकमेकांना साथ देऊन कुठल्याही प्रकारचा विवाहबाह्य संबंध वाढीस लागेल इतक्या खालच्या थराला पोहचता कामा नये. आजच्या युगात फास्ट फ्रेंड ही संकल्पना मोठया मोठया सेक्टर व शहरात उदयाला आली आहे मैत्री करणं काही गैर नाही मात्र मैत्रीची मर्यादा न ओलांडून पुढें घडत असणाऱ्या घटना, अनैतिक आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाला प्राधान्य व एक मेकांना जीव लावून एक आदर्श कुटुंब व्यवस्था चालवायची आहे. बऱ्यासच्या कुटुंबात मॉडर्न जीवनशैलीत जगण्याच्या नावाखाली मर्यादा तुटल्याने अनेकांचे जीवन उडवस्त झाले आहे. त्यामुळे प्रामाणिक, संयमी, एकनिष्ठ, राहिल्यास प्रत्येक दिवशीच वटपौर्णिमा साजरी होईल यात शंका नाही, वडाच्या झाडाप्रमाणे उभयतांचे जीवन बहरून त्याचं पारंब्यावर मुलंबाळ हसत खेडत बागडतील व कुटुंब व्यवस्था आनंदी होऊन त्याची जड आणखी खोल जाईल इतपत सुख प्रत्येक उभयतांच्या वाट्याला येईल हीच सदिच्छा.

**उमेश ज्ञानेश्वर ईखे**
**कृष्णा विहार, नागपूर**
**९५१८५७११३८**

# पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना कागदावर

### २३४ पैकी १६० कामे पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ : सध्या जून महिन्यातही उकाडा असून, अनेक ठिकाणी पाणी टंचाई आहेत. मात्र असे असले तरी यांनी मंजूर केलेल्या पाणीटंचाई निवारणाच्या २३४ उपाययोजनांपैकी १६० कामे पूर्ण झाली आहेत. अन्य कामे प्रगतीपथावर आहेत. एकूणच संपूर्ण कामे पूर्ण होण्याची प्रक्रिया तूर्तास तरी कागदावरच आहेत. उन्हाळ्यात जिल्ह्यातील सातही तालुक्यातील ग्रामस्थांना पाणी टंचाईचे चटके सोसावे लागले. काही ठिकाणी तर २३ कि.मी.पर्यंतही पायपीट करुन पाणी आणावे लागले. अनेक ठिकाणी तर पिण्याचे शुद्ध पाणी विकत घ्यावे लागले. मजुरीसाठी फिरावे की पाण्यासाठी भटकंती करावी, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला. सध्या जून महिन्यातही उकाडा वाढला असून, अनेक ठिकाणी पाणी टंचाईच्या झळा ग्रामस्थांना सोसाव्या लागत आहेत. पिण्यासाठी सहज पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पाणीटंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने जिल्ह्यातील ४१५ गावांत पाणीटंचाई सदृश



स्थिती असल्याचे प्रस्तावित केले होते. या गावांतील नागरिकांसाठी ३७१ उपाययोजना सुद्धा प्रस्तावित केल्या. प्रस्तावित उपाययोजनांपैकी जिल्हाधिकाऱ्यांनी २०३ गावांसाठी २३४ उपायोजनांना प्रशासकीय मंजुरी दिली. त्यामध्ये नळ योजना विशेष दुरूस्ती, विंधन विहिर, तात्पुरत्या पूरक नळयोजना, विहिर अधिग्रहण व कूपनलिकेच्या योजनांचा समावेश आहे. सदर योजनांना मंजुरी दिल्यानंतर काही योजना वेळेत पूर्ण करण्याचे लेखी आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. तीव्र उन्हाळा संपत असून पावसाळ्याला सुरुवात होत असतानाच मंजुरी प्राप्त उपाययोजना अपूर्ण आहेत.

कामांना २० जूनची डेडलाईन : कूपनलिका व विंधन विहिरींच्या उपाययोजनांची कामे २० जूनपर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण करून त्याद्वारे प्रत्यक्ष पाणी पुरवठा करण्यात यावा.

योजनेचे काम पूर्ण होताच त्याबाबत कार्यालयास कळवण्यात आहे. आंदोलनानंतर झाले काम सुरू : अकोला तालुक्यातील गावांना ६४ खेडी खांबोरा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पुरवठा होतो. मात्र अनेक ठिकाणी गळतीसह अन्य कारणांमुळे नियमित पाणी पुरवठा होत नाही. यापूर्वी अनेकदा ग्रामस्थ आंदोलनही करतात. योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्चही केले. ही योजना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून चालवण्यात येत असून, देखभाल, दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून होते. काही दिवसांपूर्वी शिवसेनेचा ठाकरे गट व मजलापूर परिसरातील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा ठिय्या आंदोलन केले होते. त्यानंतर जलवाहिनी टाकण्याचे काम सुरु झाले आहे.

मात्र आंदोलन केल्याने गुन्हे दाखल करण्यात आले होते.

अशी आहे स्थिती जिल्हाधिकाऱ्यांनी ३१७ गावांसाठी ४१५ उपाययोजना मंजूर केल्या होत्या. त्यापैकी १६० उपाययोजना पूर्ण झाल्या आहेत. पूर्ण झालेल्या उपाययोजनांमुळे १३६ गावातील ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. पाणी टंचाईच्या उपाययोजना प्रगतीपथावर असून त्यामुळे ६७ गावातील ग्रामस्थांना पाणी टंचाईपासून दिलासा मिळेल.

## रस्त्यासाठी ग्रामस्थांचे मचाण बांधून आंदोलन



**संग्रामपूर :** तालुक्यातील वकाना ते निरोड व वकाना ते भिलखेड रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी वकाना येथील ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय वानखडे यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी ६ जून पासुन निंबाच्या झाडावर मचान बांधून आंदोलन सुरु केले आहे. वकाना ते निरोड व वकाना ते भिलखेड हे दोन्ही रस्ते तालुक्याला जोडणारे आहेत.

परंतु मागील पाच ते सहा वर्षापासुन या दोन्ही रस्त्याचे काम रखडलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह व गावकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी शासकीय कामासाठी तसेच शेतातील शेतमाल घरापर्यंत आणण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. या दोन्ही रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी रितसर रस्त्याचे दानपत्र सुद्धा दिले आहे. परंतु शासनाकडून हेतू पुरस्पर राजकीय दबावापोटी हे दोन्ही रस्ते थांबवण्याचे काम केले.

निवेदन देण्यात आले होते. परंतु अद्याप निवेदनाची कुठलीही दखल न घेतल्यामुळे पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष विजय वानखडे यांच्या नेतृत्वात वकाना येथील ग्रामस्थांनी झाडावर मचाण बांधून आंदोलन सुरू केले.

# एक कि. मी. नाल्यातून ४११८२ घ. मी. गाळ काढणार

### कृषी विद्यापीठाचा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील मुख्य नाल्याचे खोलीकरण तथा गाळ काढण्याचे कामाचा कार्यारंभ झाला आहे. एक किलो मीटर मुख्य नाल्यांचे गाळ काढण्याचे काम होईल व ४११८२.५ घन मीटर गाळ काढण्यात येणार आहे.



यंदाचा खरीप हंगाम लक्षात घेता जलयुक्त शिवार योजनेची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे. माती आणि पाणी संवर्धनाचे उद्दिष्टाने महाराष्ट्र शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागाचे वतीने 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना २०२५' कार्यान्वित करण्यात आली असून सदर योजनेद्वारे धरणे, बंधारे, शेततळे आदींमध्ये जमा झालेला गाळ काढून तो शेत शिवारात टाकणे व पर्यायाने धरण गाळमुक्त करणे करण्याचे धोरण आहे. दरम्यान कृषी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील मुख्य नाल्याचे काम सुरू झाले आहे. या कामाला कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे उपस्थितीत प्रारंभ झाला. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृदा व जलसंधारण विभाग अकोला तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार यांच्याकडून सदर नाला खोलीकरण व गाळ काढण्याचे काम सुरु झाले.

गाळयुक्त शिवार योजना २०२५ यासाठी निधी प्राप्त झाला असून विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिक व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे मृदा व जल संवर्धन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अशोक म्हस्के यांचे नेतृत्वात सदर नाला खोली करणाचे कार्य संपन्न होत आहे.

यापसंगी संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ.धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी डॉ. शामसुंदर माने, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, विभाग प्रमुख डॉ. अशोक मस्के, डॉ. संजय भोयर, डॉ. सुचिता गुप्ता, डॉ. राजीव ईसाळ, डॉ. किशोर घरडे, डॉ. मित्तल सुपे, डॉ. दिनेश पैठणकर, डॉ. शिवाजी, डॉ. नितीन कोष्टी यांचेसह वऱ्हाड विकास सेवा प्रतिष्ठानचे चे पदाधिकारी उपस्थित होते.

गाळयुक्त शिवार योजना २०२५ अंतर्गत साधारणता एक किलो मीटर मुख्य नाल्यांचे गाळ काढण्याचे काम होईल व ४११८२.५ घन मीटर गाळ काढण्यात येईल.

त्यामुळे तेवढ्याच क्षमतेची पावसाचे पाणी साठवण क्षमता वाढेल, असा दावा करण्यात आला आहे. तसेच नाल्यातील जादाचा प्रवाह शेतात जाणार नाही. त्यामुळे शेतातील पिकांचे नुकसान होणार नाही.

गाळ काढण्याचे कार्य झाल्यामुळे आणि पाणी साठवण क्षमता वाढल्याने त्या परिसरातील भुजलाच्या पातळीत वाढ होईल व पीकाना महत्वाचे वाढीच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास संरक्षित सिंचन करुन पिकांचे उत्पादनाचे ५० टक्के पर्यंत होणारे नुकसान टाळता येईल असे डॉ. म्हस्के यांनी याप्रसंगी सांगितले.

# ३.६६ कोटींचे अनुदान थकले

## ३० लाखही गेले परत : शिवभोजन थाळी अडचणीत

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ९ : शिवभोजन योजनेअंतर्गत शिवभोजन थाळीचे दहा महिन्यांपासूनचे अनुदान रखडले असून, पुरवठा विभागाने वित्तीय सल्लागार व उपसचिवांना ३ कोटी ६६ लाख ३१ हजार ९०५ रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. मात्र काही दिवसांपूर्वी तांत्रिक अडचणीमुळे ३० लाख रुपयेही परत गेले आहेत. याबाबत गुरुवारी शिवभोजन चालक संघटनेने पालकमंत्री व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदनही सादर केले होते. एकूणच आर्थिक चणचणीमुळे योजना अडचणीत येण्याची शक्यता आहे. गरीबांना अल्प किंमतीत जेवन मिळावे यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने २६ जानेवारी २०२० पासून शिवभोजन थाळी योजना सुरू केली होती. जिल्ह्यात एकूण ५४ शिवभोजन केंद्र असून, यात एकूण ५ हजार ८०० थाळ्यांचे वितरण होते. सध्या




आर्थिक अडचणींमुळे शिवभोजनावर संकट असून थाळ्या वाटपाला ब्रेक लागू शकतो. असे झाल्यास गरीबांना त्याचा फटका बसणार आहे. गत ९ महिन्यांपासून शिवभोजन केंद्रांचे अनुदान रखडले असून, याबाबत शिवभोजन केंद्र संचालकांनी पालकमंत्र्यांच्या नावे पुरवठा विभागाला निवेदन सादर केले. त्यानंतर पुरवठा विभागाने वित्तीय सल्लागार व उपसचिवांना निधीबाबत पत्र पाठवले. अनुदान वितरीत होत नसल्याने केंद्र चालक वारंवार कार्यालयात चकरा मारत आहेत. त्यांच्यामध्ये रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे मागणीनुसार निधी उपलब्ध करून द्यावा, असेही नमूद केले आहे. काय कारवाई होणार हे पाहणे गरजेचे आहे. सप्टेंबर २०२४ ते मे २०२५ या दरम्यानचे अनुदान शिवभोजन केंद्र धारकांना मिळाले नसल्याचे शिवभोजन चालक संघटनेने पालकमंत्री व पुरवठा विभागाला दिलेल्या निवेदनात नमूद कले आहे. देयक तपासणीमध्ये किचकट अटी टाकून देयके थकित ठेवण्यात आले आहे. ३१ मार्च रोजी शासनाकडे निधी उपलब्ध असतानाही जिल्हा पुरवठा वभागाने आमचे सर्व देयके सादर केले नाहीत. अनुदान थकल्याने केंद्रचालकांना थाळीसाठी लागणाऱ्या किरणासाठी कर्ज काढावे लागले आहे. त्यामुळे तातडीने अनुदान द्या, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष संतोष अनासने व उपाध्यक्ष देवीदास बोदडे यांनी निवेदनात केली आहे.

# जिल्ह्यात पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके होणार वितरित

### १० जूनपासून संच वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. ९ : बुलडाणा जिल्ह्यात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात यंदा एक सकारात्मक पाऊल उचलत होत आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने केलेल्या अचूक आणि सुसंघटित नियोजनामुळे जिल्ह्यातील २ लाख ४४ हजार विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १० जून रोजी पाठ्यपुस्तकाचा संपूर्ण संच वितरित करण्यात येणार आहे.



ही बाब विशेषतः महत्त्वाची ठरते कारण मागील काही वर्षांत पहिल्या आठवड्यात ही अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके मिळत नव्हती. त्यामुळे अभ्यासक्रमाच्या सुरुवातीलाच अडथळे निर्माण होत होते. यंदा मात्र वेळेआधी नियोजन, छपाई, वाहतूक, आणि शाळानिहाय वितरण यामुळे हा त्रास टळणार आहे. ही मोफत पाठ्यपुस्तक योजना समग्र शिक्षण अभियानांतर्गत राबवण्यात येत असून, शिक्षणाचा दर्जा उंचावणे, गळतीचे प्रमाण कमी करणे आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे, हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दरम्यान जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, तसेच खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना एकात्मिक पुस्तक संच शासनामार्फत विनामूल्य प्रदान केला जाणार आहे. संबंधित विभागाच्या वतीने जिल्हयातील २ लाख ४४ हजार २३८ विद्यार्थ्यांसाठी सुमारे १५ लाख १७ हजार पुस्तकांची मागणी करण्यात आली होती. यातील तब्बल १४ लाख ११ हजार ५ पुस्तके उपलब्ध झाली असून शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके उपलब्ध होणार असल्याने पालकांची चिंता मिटली आहे. शाळांमधील उपलब्ध पटसंख्येनुसार पुस्तके वितरीत करण्याचे नियोजन गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून सुरु असल्याचे सांगण्यात आले.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत मिळालेले पुस्तके तालुकास्तरावर आले आहेत. या पुस्तकांचे जिल्हा परिषद शाळांमध्ये वितरण करण्याची जबाबदारी पंचायत समितीमधील गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे देण्यात आली आहे, तसेच जिल्ह्यातील काही शाळांना पुस्तकांचे वितरणही सुरू झाल्याचे चित्र आहे.

## उघड्यावर वर्ग भरवण्यासाठी वॉटरप्रूफ तंबू देण्याची पालकांनी केली मागणी

**डोणगाव:** मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी जिल्हा परिषद उर्दू शाळा असलेल्या डोणगाव येथील शाळेसाठी मंजूर झालेल्या वर्गखोल्यांचे काम अद्यापही झाले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वॉटरप्रूफ तंबू किंवा बुलडाणा जिल्हा परिषदेत शाळा भरवण्यासाठी स्कूल बस देण्याची मागणी पालकांनी केली आहे. डोणगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेत मागील वर्षी ३४७ विद्यार्थी होते. आता नवीन शैक्षणिक सत्रात त्यापेक्षाही जास्त विद्यार्थी असणार आहेत. एकीकडे जिल्हा परिषद शाळांना घरघर लागलेली असताना दुसरीकडे या शाळेतील विद्यार्थी संख्या वाढत आहे.

मात्र, एकूण अकरा तुकड्या असलेल्या या शाळेत केवळ आठच वर्ग खोल्या आहेत, उर्वरित तीन वर्गामधील विद्यार्थ्यांना उघड्यावर झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागते किंवा एकाच वर्गात दाटीवाटीने बसावे लागते. तसेच शाळेत इतरही सुविधांचा अभाव आहे. शाळेतील गैरसोयीच्या पार्श्वभूमीवर दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यार्थ्यांच्या पालकांनी आंदोलन केले होते.

# जिल्ह्यामधील ४ लाख ८९ हजार लाभार्थ्यांची ईकेवायसीकडे पाठ

## १५ लाख ६३ हजार शिधा पत्रिकाधारकांकडून प्रक्रिया पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. ९ : अन्नसुरक्षा योजनेचे लाभार्थी व त्यांचे आधार क्रमांक या आधारे शिधापत्रिकेत नमूद व्यक्तींची खातरजमा ई-केवायसीद्वारे होते. जिल्ह्यातील १५ लाख ६३ हजार ३१ लाभार्थींची ई-केवायसीपूर्ण झाली असून अद्यापही ४ लाख ८९ हजार ९८७ व्यक्तींनी ती पूर्ण केली नाही. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रेशनच्या काळ्या बाजाराला चाप बसणार आहे. आता 'मेरा केवायसी' हे ॲपही उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रक्रिया सोपी-सुलभ झाली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थीना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब कार्डधारकांना शासनाकडून गहू, तांदूळ आदी धान्य वितरीत केले जाते. मात्र, अनेकदा लाभार्थीना धान्य मिळत नसल्याची ओरड होते. शिवाय, काळ्या बाजारात धान्याची विक्री होत असल्याच्या घटनाही राज्यात



समोर येत आहेत. काळ्या बाजाराला लगाम बसावा, याकरिता शासनाकडून लाभार्थीची पडताळणी सुरू केली आहे. शासनाने रेशनच्या धान्याचे वाटप ई-पीओएस पद्धतीने करण्यास सुरुवात केली आहे.

त्या अंतर्गत शिधापत्रिकांमध्ये समाविष्ट नावांचे आधार व्हेरिफिकेशन व ई-केवायसी केल्यानंतरच ई-पीओएसमशीनद्वारे धान्याचा लाभ मिळतो. याचा उपयोग रेशनच्या काळ्याबाजाराला आळा बसण्यासाठी होतो. परंतु अनेक शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी होणे बाकी आहे. जिल्ह्यात २० लाख ५३ हजार लाभार्थी आहेत. ई-केवायसीसाठी ३० जूनपर्यंत मुदत दिली असून ती पूर्ण करणे बंधनकारक आहे. गरजूंना धान्याचा लाभ सुरळीत सुरू राहावा यासाठी शिधापत्रिकाधारक प्रत्येक लाभार्थ्यांची ई-केवायसी बंधनकारक केली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत लाभार्थ्यांनी रास्त भाव दुकानांमध्ये जाऊन ई-पॉस मशिनद्वारे ई-केवायसी प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करून घेण्यात यावी. लाभार्थ्यांना घरबसल्या आता ई-केवायसी करता येणार आहे. लाभार्थी स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबाचे केवायसी पूर्ण करू शकतील.

## विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागात प्रवेश सुरू

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग १९९४ पासून सुरू झाला असून महाराष्ट्र शासनाकडून विभागाला अर्थसहाय्य प्रदान करण्यात आले आहे. देशभरात नावलौकीक असलेल्या जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रमाला हजारोंच्या संख्येने विद्यार्थी प्रवेश घेऊन आपले भविष्य घडवित आहेत व सध्या देशाच्या विविध नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थी कार्यरत आहेत, ही मोठी उपलब्धी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागाने साधली आहे. जैवतंत्रज्ञान हा पदव्युत्तर अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून नवनव्या संशोधनासह एम.एस्सी. अभ्यासक्रमात आण्विक जीवशास्त्र, जेनेटिक अभियांत्रिकी, बायोइन्फॉरमॅटिक्स, वनस्पती ऊती संवर्धन, बायोकेमिकल अभियांत्रिकी, किण्वन जीवशास्त्र, विश्लेषणात्मक तंत्रे, सेल जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, बायोकेमिस्ट्री यांसारख्या विविध शाखांमधील सिद्धांत आणि प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, औषधशोध, फायटोसेकंडरी मेटाबोलाइट्स आणि त्यांची जैवक्रियाशीलता, प्रथिन रचना विश्लेषण, कर्करोग जीवशास्त्र, आयपीआर, नॅनोटेक्नॉलॉजी यांसारख्या वैकल्पिक विषयांचाही समावेश आहे. तिस-याआणि चवथ्या सत्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून प्रकल्प दिले जातात. विभागाच्या प्राध्यापकांनी अनेक पेटंट्स दाखल केले असून त्यांना पुरस्कृत करण्यात आले आहे. विभागात उत्कृष्ट संशोधन सुविधा उपलब्ध असून संशोधन करणा-यविद्यार्थ्यांना फेलोशिप्स मिळाल्या आहेत. विभागाव्दारे विविध प्रकल्पांवर काम करणा-या पोस्ट डॉक्टरल फेलोंना पोस्ट डॉक्टरल संशोधनासाठी सुविधा पुरविल्या जातात. आण्विक जीवशास्त्र, कम्प्यूटेशनल जीवशास्त्रात आवड असलेले अनेक विद्यार्थी ज्ञान-आधारितउद्योगांमध्ये यशस्वीरित्या कार्यरत आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी कृषी-बायोटेक क्षेत्रात प्रवेश केला असून, अंकुर सीड्स नागपूर, जय बायोटेक पुणे, डब्लू पॉंट इंडिया हैदराबाद, माहिको जालना तसेच सेरम इन्स्टिटयूट, लुपिन, सन फार्मा, बायोलॉजिकल ई, इनटस, बायोफार्मा या सारख्या व्हॅक्सीन व बायोफार्मा कंपन्यांमध्ये ते रुजू झाले आहेत. तर संशोधनाची आवड असलेले विद्यार्थी जगभरातील मोठमोठ्या संस्थांमध्ये आपले स्थान निर्माण करीत आहेत. एवढेच नव्हे, तर भारतातील अग्रगण्य संशोधन संस्था आय.आय.एस.सी., बंगळुरू, आय.आय.एस.ई.आर, पुणे, आय.आय.एस.ई.आर. भोपाळ, आय.आय.टी. दिल्ली, एन.सी.सी.एस., आगरकर इन्स्टिटयूट, पुणे, एन.डी.आर.आय. हिसार, आय.आय.टी. मंडी या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळिवला आहे. प्रवेश पात्रता-संतगाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित प्रवेश परीक्षेस बसण्यासाठी विज्ञान, जीवशास्त्र किंवा कृषी, पशू वैद्यकीय आणि मत्स्य विज्ञान, फार्मसी किंवा बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी किंवा बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी किंवा समकक्ष परीक्षेत बॅचलर पदवीधर असलेले उमेदवार पात्र आहेत. प्रवेश क्षमता २० असून प्रवेश परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

# मानवजातीच्या कल्याणाकरिता प्रार्थना

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद , दि. ९ : आजपर्यंत जे महापुरुष होऊन गेले त्यांनी ज्या प्रार्थना केल्या त्या प्रार्थनांचे सार नव्या समाजाला संघटित करावे. त्यांच्या जीवनात नेहमी जागृती राहुन आपले जिवन कृतार्थ करावे, यासाठीच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना समाजाला सांसारिक सुखापासून तो आत्मानुभवाचा आनंद प्रत्यक्षात भोगण्याकरिता आहे. फक्त या प्रार्थनेच्या अर्थाकडे लक्ष ठेऊन आपला आचार बनवण्याची काळजी घेतली तर मानवाचे कल्याण होईल असे प्रतिपादन तळेगाव श्यामजी पंत येथील प्रसिद्ध कीर्तनकार शंतनु महाराज यांनी व्यक्त केले.




गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर येथील प्रार्थना स्थळी ग्रामगीतादास आचार्य अत्रे महाराजांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त भव्य सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले. मौन प्रार्थना, अर्जीपद, नामधुन, सामूहिक नामजप, ग्रामगीता ग्रंथ वाचन, मनोगत,शांतीपाठ, आत्मचिंतन, जयघोष घेण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व अधिष्ठान पूजन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व आचार्य अत्रे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा सेनाधिकारी गणेश धमाळे यांनी आद्य ग्रामगीताचार्य रामकृष्ण दादा बेलुरकर व आचार्य अत्रे महाराज यांच्या भेटीचे अनुभव सांगून आयुष्यभर राष्ट्रसंतांच्या कार्याचा प्रचार प्रसार करणारे निस्सीम सेवक असल्याचे सांगून त्यांच्याकडून मला कार्य करण्याची प्रेरणा मिळाली असे सांगितले. आदरणिय नरेश ढाले साहेबांनी सुद्धा सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शंतनु महाराज पुढे म्हणाले की प्रार्थनेमुळे मनाची एकाग्रता वाढते, मल विक्षेप आवरण दूर होते, सत्व गुणी नाड्या प्रफुल्लित होतात, मानवता जागृत होऊन आपसातील मतभेद दूर होतात त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढते यावेळी त्यांनी प्रचारकांनी ही प्रार्थना गावोगावी करण्याचे आवाहन केले. कोपरा येथील भजनी मंडळाच्या हस्ते शंतनु महाराज धमाळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व ग्रामगीता ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कोपरा येथील लक्ष्मण चव्हान, माधव गव्हाणे, दिगांबर चव्हाण, विनोद पवार, सतीश चव्हान, विष्णू राठोड, दिनेश पवार, गजानन चव्हान, लोणी येथील अक्षय वाघ, अमरावती येथील विशाल धमाळे, वैभव धमाळे,कोल्हा काकडा येथील वसंत धमाळे अशोक भगत महाराज, शिवलिंग पटवे, यशवंत देशमुख, दशरथ सोनटक्के, अनिल अस्वार, सुधाकर कपटे, ग्रामगीताचार्य किसन गरडे, रमेश सरागे, सुभाष कदम, कैलास मस्के, सुभाष जाधव, बाबासाहेब वाघमारे, सुरेश कदम, श्यामराव देशमाने, यशवंत भगत, सुरेश कदम,सुरज केळकर, विठ्ठल येवले, गजानन कवाने, शंकर सोळंके जिल्हा महिला भजन प्रमुख कमला गडदे, अनिता सूर्यवंशी,चंदा गोडसे, साधना पवार, स्मिता धमाळे, मुक्ता काळबांडे, रंजना किन्हेकर, शशिकला सुरडकर, मंदा पाचकोरे सह गुरुदेव प्रचारक उपस्थित होते.

# समाज सुधारण्याची संधी देऊन 'वैष्णवी' कायमची गेली !
# आता तरी मराठा समाजाने सुधारणा करावी

**सर्वच समाजाला व विशेषतः मराठा समाजाला सुधारण्याची जणू एकप्रकारची संधी देऊन 'वैष्णवी' आपल्यातून कायमची निघून गेली. पुण्यातील वैष्णवी हागवणेला तिच्या आई वडिलांनी हुंडा म्हणून दिलेले ५१ तोळे सोनं, चांदीची भांडी, फॉर्च्युनरसारखी आलिशान गाडी अशा अनेक गोष्टी हुंडा म्हणून दिल्यानंतरही तिचे प्राण वाचू शकले नाही. इतकं सगळं दिल्यानंतर देखील तिच्या पतीची लालसा वाढतच होती. वैष्णवीचे वडिल अनिल कस्पटे यांच्याकडे दोन कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती, पण त्यांनी पैसे न दिल्याने हागवणे कुटुंबाने वैष्णवीचा शारीरिक आणि मानसिक छळ वाढवला. सनीज वर्ल्ड या ठिकाणी लग्न करुन देण्याच्या बोलीवर मुलीशी लग्न करुन दिलं होतं. पण हे सर्व काहीच कामी आले नाही. आता वैष्णवीची सासु लता हागवणे, नणंद करीश्मा हागवणे, सासरे राजेंद्र हागवणे, दिर सुशील हागवणे सर्वजण तुरुंगाची हवा चाखत आहे. पण प्रश्न असा पडतो की, हुंड्यात दिलेला पैसा मुलीच्या कधी कामात येतो का? तर नाही ! परंतु मुलीला तिच्या पायावर उभी करण्यासाठी, आई वडीलांनी केलेला खर्च नक्कीच तिला एक मजबुत भविष्य देते. आज प्रत्येक मुलीला व तिच्या आई वडीलांना वाटत की, आपली मुलगी मोठ्या घरात किंवा पैसेवाल्यांच्या घरात दिली तर ती सुखी होईल. पण ते तसं काही नसतं. तुमच्या मुलीला चांगलं शिकवा. तिला तिच्या पायावर उभे करा आणि नंतरच तिचे लग्न करा. जेणे करून भविष्यात वाईट प्रसंगी, तिने कोणाच्या पुढे हात पसरायला नको; सर्वात महत्वाचं म्हणजे, तिच लग्न जमवताना समोरचा परीवार पैशाने श्रीमंत नसला तरी चालेल. पण शिक्षणाने व मनाने मात्र तो खुप श्रीमंत पाहीजे. विवाहाला जीवनातील सोळा संस्कारा पैकी एक पवित्र संस्कार म्हटले आहे. परंतु नवीन पिढी वेगळ्या दिशेने जात असून विवाहसोहळ्याला विकृत स्वरूप येत आहे. प्री वेडींग पासून तर मोठ्या आवाजातील डीजे व त्यावर अनेक तास तरुण मुले व मुली, महिला नाचतात. त्यामुळे लग्न दोन ते तीन तास उशिरा लागते. नाचणारी मंडळी कुणाचेही ऐकत नाही. त्यावरून विनाकारण वाद होतात. परिसरात राहणा?या लोकांना त्रास होतो. काही लोक केवळ आपले वैभव दाखविण्यासाठी लग्नामध्ये पालखी, भालदार, चोपदार, तुता?या असे अनेक प्रकार त्यानंतर पुढा?यांचे सत्कार, भाषणे अश्या अनेक चुकीच्या प्रथा एकमेकाचे पाहून चालू झाल्या आहे. मध्यम व गरीब लोकांना त्यांची ऐपत नसतांना सुद्धा बरोबरी करायची म्हणून प्रसंगी मुलीच्या वडिलांना कर्ज काढावे लागते. हा सर्व प्रकार आता कुठेतरी थांबला पाहिजे. मराठा समाज संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर सुद्धा पसरला आहे. पुणे, नगर, नाशिक, सातारा सारख्या अनेक ठिकाणी समाजातील जाणत्या जेष्ठ, श्रेष्ठ लोकांनी यावर विचार करून मिटींगा घेऊन विवाह सोहळ्याची आदर्श विवाह आचार संहिता तयार केली पाहीजे. ज्या महिलेचा सासरच्यांकडून छळ होत असेल, त्यावेळी तिच्या माहेरचे लोक ठामपणे तिच्यापाठीशी उभे राहतील, अशी व्यवस्था होणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारचे ओंगळवाणे प्रदर्शन न मांडता विवाह सोहळे साधेपणाने आणि वेळेवर केले जातील, तसेच मानपानाचे सामाजिक प्रदर्शन केले जाणार नाही, अशी व्यवस्था तयार झाली पाहीजे.**





सध्या जे संकट मराठा समाजाच्या संदर्भात प्रामुख्याने हुंडा देणे, सोनं चांदी देणे, मोठमोठ्या गाड्या देणे, अवाजवी खर्च करून लाखो रुपए लग्न कार्यात अक्षरशः वाया घालवले जातात. लग्न संस्कार जो आजकाल इव्हेंट झाला आहे.

अन्नाची नासधूस, त्यासोबत मानपान, मोठी वाद्ये अशी अनेक महागडी दर्शने लग्नात घडवली जातात. वेळेत विवाह लागत नाही. समाजातील गरीब कुटुंबातील मुलांना मुली दिल्या जात नाही, मिळत नाही. अश्या कितीतरी मोठ्या संकटात मराठा समाज आहे.

एकीकडे आरक्षण नाही, दुसरीकडे नैसर्गिक अवकाळी संकट. मुलांची मुलींची शिक्षणे, नापिकी, मातीमोल शेतीमाल भाव, जमिनीचे होणारे तुकडे, शिकलेल्या मुलांना नोकऱ्या नाहीत, अश्या अनेक संकटाला मराठा समाज तोंड देत आहे. त्यात मुलांमुलींचे विवाह, त्यातील अनिष्ट प्रथा, खर्चिक लग्ने, वर पक्षाच्या आवास्तव मागण्या, मानपान, श्रीमंती मिरवणे यावर सामाजिक निर्बंध असावेत अशी चर्चा समाजात सुरू झाली.

मराठा समाजाने लग्ना संबंधी आचारसंहिता घालून दिली. पुण्यापाठोपाठ अहिल्या नगर जिल्ह्यातील सकल मराठा समाजातील सामाजिक राजकीय मंडळींनी एकत्र येत असाच निर्णय घेतला. विदर्भ व मराठवाड्यातूनही आता सुरूवात केली पाहीजे.

नाशिक जिल्हा सुद्धा वैचारिक सामाजिक राजकीय पुढारलेला जिल्हा आहे. समाजातील काही लोकांची कोअरकमीटी निश्चित करून समाजाला दिशा देण्याची भुमिका घेतली पाहिजे. मराठा समाजाच्या लग्न समारंभासाठी आता निश्चित अशी आचारसंहिता लागू झाली पाहीजे. मराठा समाजात निर्माण झालेल्या विविध समस्यावर विचार करून समाजाला काही गोष्टी सांगता येतील. लग्न सोहळा शंभर ते दोनशे मर्यादित लोकात केला जावा.

प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये. कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे. कर्ज काढून लग्नात खर्च करू नये, मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत. नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे व इतर सत्कार बंद करावेत. लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.

लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये. लग्नात हुंडा देऊ, घेऊ नये. वडिलांची खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी. लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मोबाईलचा वापर गरजे पुरताच करावा. पैशासाठी सुनेचा छळ करू नये. समाजातील नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे आर्थिक मदतीचा हात द्यावा. नुसत्या शुभेच्छा नकोत.

विविध कार्यक्रमानिमित्त होणाऱ्या भोजन प्रसंगी, अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी. लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आशीर्वाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा. गावाच्या वेशीवर मोठे होर्डिंग उभे करुन त्यावर पत्रिका, नवरा मुलगा-मुलीचे मोठे कटआउट लावण्याची अहमहमिका चालू असते. ही मंडळी फार पैसेवाले असतात असेही नाही. फक्त दिखावा, एकमेकांना तुलनात्मक रित्या कमतरता भासू नये असा दुबळा प्रयत्न करतात इतकेच.

सर्वच जाती धर्मामध्ये हा प्रकार आहे. परंतु मराठा जात ही महाराष्ट्रातील एक महत्वाची जात असल्याने तिथून सुरुवात होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. आता यानंतर सर्वच जातींनी पुढे यावे. त्यातील संघटना यांनी एकत्र येऊन असे निर्णय जाहीर करावेत व अशी लग्न होत असतील तरच आम्ही उपस्थित राहू अशी भूमिका घ्यावी. राजकीय नेत्यांनाही लग्नात आशीर्वाद भाषणे करू नका असे आवाहन करावेसे वाटते.

भारतीय समाजात आजही जातीला महत्व असल्याने जातीतील प्रमुख लोकांनी सांगितले तर लवकर पटते. त्यामुळे या गोष्टीला खूप महत्व आहे. या अवास्तव दलदलीतून बाहेर पडल्याशिवाय आपणा सर्वांना नवीन क्षितीज, नवीन रस्ता सापडणार नाही. या लोकांना सुधारावेच लागेल. फक्त त्यांना त्यांची गती वाढवावी लागेल.

गावा गावांमध्ये मराठा समाजाला याबाबत प्रबोधन करणे गरजेचे आहे. तरच विवाह सोहळे मोठ्या खर्चामध्ये होणार नाही. अलिकडे ठराव




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

होतात, निर्णय होतात, पण त्याची अंमलबजावणी कोण करणार ?

मुळातच मराठा समाजाच्या म्हणाव्या तशा संघटनाच नाही. स्वतःच्या काही लोकांच्या धंदेवाईक संघटना असून त्यातून समाज हितापेक्षा स्वतःकडे पाहण्याकडे अनेकांचा हेतू असतो. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे आदर्श फक्त पुस्तकात व भाषणापुरतेच काही लोकांनी मर्यादित ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची महती जनसामान्यांपर्यंत पोहोचत नाही. छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्राचा अभ्यास केला तर मराठा समाजाला कोणीही काही शिकवण्याची गरज नाही.

या थोर व्यक्तींच्या चरित्रातच राज्य कारभार कसा करावा याचे मूर्तीमंत दर्शन दिसते. मराठा समाजात खरच बदल घडवायचा असेल, तर नुसत्या बैठका, ठराव, मेळावे, अधिवेशने, निर्णय घेऊन उपयोग नाही. मराठा समाजातील व्यक्तींच्या अंतःकरणापर्यंत प्रत्येकाच्या भावना पोहोचवल्या तरच मराठा समाज या पुढील काळात प्रगती करेल.

### समाज सुधारकांनी पुढे आले पाहिजे

मराठा समाजातील उच्चपदस्थ अशा अनेक मान्यवरांशी चर्चा केल्यानंतर मराठा समाजाने काही कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे असे वाटते. महाराष्ट्राचे माजी पोलीस महानिरीक्षक भगवंतराव मोरे, माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अँडव्होकेट भगीरथ शिंदे, महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, छाया मेधणे- झाडे, राजेंद्र खताळे अशा समाजातील जाणकारांमध्ये समाज सुधारण्याची ताकद आहे. लग्नकार्यात आलेल्या काही मोजक्या श्रीमंत पैसेवाले व मोठ्या लोकांचे स्टेजवरून नाव घेऊन स्वागत करण्याची पद्धत म्हणजेच आलेल्या इतर सर्व नातेवाईक व मित्रपरिवाराचा अप्रत्यक्षपणे अपमान समजावा का? माजी आमदार स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांनी कधीही कुणाच्याही लग्नात फेटा किंवा शाल स्वीकारली नव्हती. कारण ते म्हणजे वेळात वेळ काढुन आले आणि बाकीचे येणारे काही रिकामटेकडे आहेत का? अशा फालतू प्रथा बंद करायला पाहिजेत, असे त्यांना सुचवावेसे वाटले. आज ते हयात नाही परंतु त्यांनी सुरू केलेली प्रथा समाजाने आता पुढे नेली पाहिजे. प्रतिष्ठित असोत की पुढारी, कुणाचेही शब्दसुमनानी स्वागत करणे हेही बंद केलं पाहिजे. प्रतिष्ठित मान्यवरांचे नाव घेऊन स्वागत करायचे म्हणजे लग्नाला पैसे खर्चून येणारे बाकीचे हॉलमधील सगळे समाजबांधव अप्रतिष्ठीत असतात का? तर नाही. निमंत्रणाचा स्वीकार करून वधुवरांना शुभेच्छा देण्यासाठी आलेले सर्वच समाज बांधव आणि भगिनी, आप्तेष्ट तसेच मित्रपरिवार देखील आलेले असतात, जे विवाह सोहळ्यास वेळेवर उपस्थित राहून सोहळ्याची प्रतिष्ठा वाढवितात. तेव्हा प्रारंभीच उपस्थित सर्व वऱ्हाडी मंडळींचे शाब्दिक स्वागत करून पुढील विवाह विधी नियोजित वेळेवर पार पाडण्याची काळजी घेतली पाहिजे.

नाशिकमधील मराठा समाजाचा क्रांतिकारी निर्णय नाशिक शहरातील मराठा समाजाने एक चांगला निर्णय घेतला. मराठा समाजातील कोणाच्याही लग्नात सहा पदार्थांपेक्षा जास्त पदार्थ असतील, तर त्या लग्नात वधू वरांना फक्त आशीर्वाद द्यायचे. परंतु जेवण करायचे नाही आणि मग याचे अनुकरण करत इतर काही समाजानेही वरील निर्णय राबवायचे ठरवले आहे. याबरोबरचं लग्नपत्रिका छपायची नाही तर फक्त व्हाट्सअप व फोन द्वारे निमंत्रण द्यायचे. खास निर्णय म्हणजे प्रि- वेडींग व संगीतसंध्या कार्यक्रमावर बंदी घातली आहे. समाजाने विवाह समारंभाचे रुपांतर विवाह संस्कारामध्ये केले पाहिजे. काही दिवसांपूर्वी करोनामुळे गर्दी नको म्हणून शासनाने विवाहाच्या उपस्थितीला मयार्दा घातल्याने त्यावेळी ही बाब प्रकषार्ने लक्षात आली होती, परंतु लोक परत ते सगळं विसरून गेले आणि लाखो करोडो रपये उधळू लागले. आपण विनाकारण लाखो रूपयांची उधळपट्टी करून कर्जबाजारी होत आहोत. आतातरी आपण बदलले पाहिजे. नाही तर काळ आपणांस माफ करणार नाही. कारण दिवसेंदिवस शेतीचे उत्पन्न कमी होत आहे. शेती मालाला भाव नाही. सरकारी नोक?या राहिल्या नाहीत. खाजगी नोकरीत शाश्वती नाही. मुलीच्या लग्नाला १००००००/- रुपये खर्च येत असेल, तर मुलालाही ८००००००/- रुपये खर्च येतो. कर्जात जन्मलो, कर्जात वाढलो व कर्जात मरतो आमच्या काही पिढ्या गेल्या. आता तरी डोळे उघडले पाहिजेत. कितीही मोठं लग्न केलं तरी लोक विसरून जातात. आजवर मोठं लग्न केले म्हणून कोणाला अवॉर्ड मिळाला नाही. आपण शेती विकून गुंठ्यावर आलो, तर व्यापारी एका दुकानाचे चार दुकाने करत आहे. व्यापारीवर्गाला नाव ठेवण्यापेक्षा त्यांचे अर्थशास्त्र समजून घेतले पाहिजे. इर्षा नको तर सुदृढ स्पर्धा असली पाहिजे. भाऊबंदकीतील जीवघेणी स्पर्धा कुठेच नको. विवाह प्रसंगी तर नकोच नको. वर-वधू यांना नेहमीच उपयोगी पडणारा पोशाख घेतला पाहिजे.? वरमाईने सुध्दा रुसवे फुगवे करू नयेत. आपल्यालाही मुलगी आहे. सून उद्याची आपली काळजी घेणारी आपली मुलगीच आहे. ही भावना रुजली पाहिजे. जेवणावळी, मानपान ही पद्धत बंद करून खर्च कमी करून वधू वरांच्या भावी प्रगतीला हातभार लावावा. संसारात कधीच उपयोगी न पडणारी भांडी, फर्नीचर तर नकोच. मेहंदी, वैदिक पध्दत, हळदीच्या कार्यक्रमात होणारी गर्दी टाळावी. स्वागत समारंभात साधेपणा आणावा.??क्रिकेट ५ दिवसाचा, वन-डे वरुन २० - २० वर आला. तर आपण विवाह छोटेखानी आटोपशीर करायला काय हरकत आहे ? मोजक्याच लोकांत सगळ्या पाहुण्यांशी निवांत संवाद साधता येतो. कोणत्याही जातीधर्मांतील चांगल्या गोष्टींचा स्विकार केला पाहिजे.

### मुलगी व आईनेही विचार करावा

मुलींच्या लग्नाचे बहुतेक निर्णय मुलगी व आई दोघीच घेणार, वडीलांनी मध्ये बोलणे आता गुन्हा होत चाललाय. मुलगी आणि तीची आई यांच्यात एक मैत्रीच नात होत चालल आहे, ही चांगली बाब असली तरी, मुलीच्या फॉरवर्ड विचाराला आई कडून चालना मिळते म्हणून ही मैत्री आहे. एखाद्या आईने चालीरीती शिकवायचा प्रयत्न केला, तर लगेच त्या आईला तू जुन्या, मागासलेल्या विचारांची म्हणून हिणवायचे. स्वतःच्या पायावर उभे असलेल्या मुलींची माहेरी, सासरी मनमानी न विचारलेली बरी. फक्त पॅकेज पाहून मुलगा पसंती. एवढे करुनही किती दिवस संसार टिकणार हे कुणी सांगु शकत नाही. कारण एकतर मुलींची सहनशीलता कमी होत चालली, त्यात आईची फुस आणि स्वतःच्या पायावर उभे असल्याचा माज. शहरी मुलींची वागणूक पाहिल्यावर कोणत्याही वडीलांना आपल्या मुलीची लाज वाटेल. त्यामुळे कोणतीही तमा न बाळगता घटस्फोट होत आहेत. एक लक्षात घेतलं पाहीजे की, पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून अलिप्त ठेवलेल्या समाजाला शिक्षणाची दार समाजसुधारकांनी उघडली, गावोगावी शाळा काढल्या. अशा शाळेत जाणारी अडाणी आईबापाची लेकरं ही, जन्म तारीख विचारली तर, 'ह्यो जन्मला तवा संक्रांत चार दिवसावर होती, दिवाळी तोंडावर होती, तवाच्या साली दुष्काळ पडलाता बघा' अशी उत्तरे मिळत. गुरुजींनीच मग शाळेसाठी म्हणून एक जून अशा तारखा टाकल्या. रीतसर शिक्षण घेणारी ही पहिली पिढी आपल्या कर्तृत्वाने यशस्वी झाली. नेटाने संसार केला. आपल्या पोरांना इंजिनिअरिंग, मेडिकल असं उच्चशिक्षण दिलं. म्हणूनच काही न देता घेताही संसार सुरळीत झाले.

### संसार म्हणजे तडजोड हे विसरुन चालणार नाही

शहरी व ग्रामीण आईच्या बारावी नापास मुलीलाही पुण्यातला इंजीनियरच हवा असतो. त्यांच्या आईना इंजीनियरच काम काय असतं ते माहिती नाही, इंजीनियर शब्दाच स्पेलिंग येत नाही. तरीही जावई इंजीनियर पाहिजे तोही दहा लाखा वरील पॅकेजचा. काहींना वाटेल, मग खेड्यातील मुलींना इंजीनियर मिळूच नये का ? तर मिळावा पण त्या मुलाच्या अपेक्षांना तुम्ही उतरा ना! सर्वच महिला अशा आहेत असे अजिबात नाही. अनेक महिलांनी अत्यंत प्रतिकुल स्थितीतही स्वतःच्या हिमतीवर घर तोलून धरलेली उदाहरणे आहेत, तर काही पुरुष अपेक्षांचा डोंगर वाढवतात. बायकोच्या पदरा आडून आपला स्वार्थ साध्य करतात. संसार सुरु करण्यासाठी त्या मुलाची काय दमछाक होत असेल, तोही माणूस आहे. घाण्याच्या बैला पेक्षा जास्त त्याला संसारा भोवती फिरावे लागणार याचा विचार कुणी करीत असेल का? महिलांनो आणि मुलींनो आपल्या अपेक्षांना आवर घाला. मध्यमवर्गीय संसार थाटण्यात काही कमीपणा नाही. घरातील एकच भाकरी अर्धीअर्धी खाल्लात तर नवरा बायकोचे प्रेम नक्कीच वाढेल. जेमतेम बचत करुन एखादी वस्तू खरेदी करुन पहा, तुमच्या आनंदाला पारावार रहाणार नाही. संस्कृती जपा, कुलधर्म कुलाचार, सणवार साजरे करा. मोठ्यांचे मानसन्मान ठेवा, घराचे घरपण सांभाळ. बचत करा, हौसमौज घरच्यां बरोबर करा, आयुष्य फार सुंदर आहे. फक्त पैसा पॅकेज म्हणजेच सर्वकाही, हे मनातून काढून टाका. शेवटी लग्न ही एक व्यवस्था आहे आणि संसार म्हणजे तडजोड आहे हे विसरुन चालणार नाही.

**रविकुमार ढोमसे**

---

# जागतिक नेत्रदान दिन

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो.

डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे.

त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो.

काही असेही दुदैर्वी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे.

अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे.

भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे.

हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी.

मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते.

नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### वटवृक्षाचे महत्त्व !

वटपौर्णिमा हे व्रत ज्येष्ठ पौर्णिमेच्या तिथीला करतात. वटवृक्ष हे ब्रह्मा, श्रीविष्णु, महेश, नृसिंह, नील आणि माधव यांचे निवासस्थान मानले जाते. वटवृक्ष अक्षय्य मानला जातो कारण तो स्वतःपासून अनेक वृक्ष उत्पन्न करतो.

वटवृक्ष २४ तास प्राणवायू देतो. त्यामुळे वायुप्रदूषण कमी होते. हा वृक्ष ढगांना आकर्षित करतो, त्यामुळे पावसाचे प्रमाण वाढते. जगातील कुठल्याही झाडाच्या तुलनेत याचा घेर अधिक असतो, त्यामुळे याखाली भरपूर सावली मिळते. तसेच या वृक्षावर अनेक जीवजंतू वास्तव्यास असतात. त्यांची विष्ठा, मूत्र आणि झाडाची कुजलेली पाने मिळून झाडाखालची भूमी अत्यंत सुपीक बनते. ही माती शेतात वापरल्यास ती भूमीही सुपीक होते.

वटवृक्षाची मुळे, साल, पाने आणि दूध यांचा उपयोग आयुवेर्दात विविध रोगांवर केला जातो. उदाहरणार्थ, मधुमेह, त्वचाविकार, दातदुखी, जखमा इत्यादींवर याचा उपयोग होतो.

आज जंगलतोड आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. त्यावर काही प्रमाणात नियंत्रण मिळवण्यासाठी वटवृक्षाची लागवड अत्यंत गरजेची आहे. वटवृक्षाचे धार्मिक, सामाजिक, औषधी आणि नैसर्गिक महत्त्व लक्षात घेता, प्रत्येकाने या वृक्षाची लागवड आणि संवर्धन करायला हवे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

### वाहतुक कोंडीचे काय करणार?

नागपूर शहराच्या बहुतेक भागात वाहतुक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत असून, मनपा प्रशासन तथा वाहतूक पोलीस विभागाचे कायम दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते . नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागातील गणेशपेठ बसस्थानक परिसरातील वाहतुकीची कोंडी ही जीवघेणी ठरत आहे .या भागात खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसेसचा तर अक्षरशः धिंगाणा असतो . रस्त्यावर कुठेही या बसेस अस्ताव्यस्त उभ्या केल्या जातात. साधी दुचाकी काढणे कठीण झाले आहे. तक्रारी झाल्या की एक दोन दिवस वाहतूक पोलीस दिसतात. नंतर परिस्थिती जशीच्या तशीच. शहराच्या अन्य भागातही अशीच स्थिती असून, शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णतः कोलमडल्याचे दिसते.

■ विशाल बडवाईक, नागपूर.

---



## या भाज्या देखील आहेत प्रथिनांचे मुबलक स्त्रोत

आजकाल बहुतेकजण फिटनेसबद्दल जागरूक होत आहेत. त्यामूळे त्यांच्या आहारात अनेक प्रकारचे पोषक घटक समाविष्ट करत आहेत, त्यापैकी एक म्हणजे प्रथिने. प्रथिनेयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आपल्या शरीराला फायदेशीर ठरते.

परंतु बऱ्याच लोकांचा असा विश्वास असतो की प्रथिने फक्त मांसाहारी आणि दुग्धजन्य पदार्थ जसे की अंडी, मांस किंवा दूध यांमधूनच मिळतात. विशेषतः शाकाहारी लोकं सहसा असे विचार करतात की त्यांच्यासाठी प्रथिनांचा पुरेसा पर्याय नाही. पण तसे नाही, काही भाज्या अशा आहेत ज्या प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत आहेत.

**ब्रोकोली :** ब्रोकोली हे एक सुपरफूड मानले जाते जे केवळ अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरने समृद्ध नाही तर प्रथिने देखील समृद्ध आहे. 100 ग्रॅम ब्रोकोलीमध्ये सुमारे 2.5 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम देखील भरपूर प्रमाणात असते जे हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक असतात.

**हिरवे वाटाणे :** एक कप उकडलेल्या हिरव्या वाटाण्यामध्ये सुमारे 8.58 ग्रॅम प्रथिने असतात, जे एका अंड्यापेक्षा जास्त असतात. यासोबतच हिरवे वटाणे हे व्हिटॅमिन सी, लोह आणि फायबरचा देखील चांगला स्त्रोत आहे. ते केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर हाडे मजबूत करण्यास देखील मदत करतात.

**पालक :** पालक हा बऱ्याचदा लोहाचा चांगला स्त्रोत मानला जातो, परंतु त्यात प्रथिने देखील चांगली असतात. एक कप शिजवलेल्या पालकामध्ये सुमारे 6 ग्रॅम प्रथिने असतात. त्यात असलेले जीवनसत्त्वे अ, उ आणि ङ हाडे आणि त्वचा दोन्हीसाठी फायदेशीर असतात.

**ब्रुसेल्स कोबी :** ब्रुसेल्स स्प्राउट्स लहान कोबीसारखे दिसत असले तरी पोषक तत्वांनी परिपूर्ण आहेत. त्यामध्ये प्रति 100 ग्रॅम सुमारे 3.4 ग्रॅम प्रथिने असतात. ते हाडांची ताकद वाढवण्यास, जळजळ कमी करण्यास आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात.

**ग्रीन बीन्स :** ग्रीन बीन्स केवळ चविष्टच नाहीत तर पौष्टिकतेनेही परिपूर्ण असतात. हेल्थलाइनच्या मते, एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2.7 ग्रॅम फायबर असते. याशिवाय एक कप ग्रीन बीन्समध्ये सुमारे 2 ग्रॅम प्रथिने असतात. हे ग्रीन बीन्स कॅल्शियम, पोटॅशियम आणि फायबरचा देखील चांगला स्त्रोत आहे.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### शिव राज्याभिषेक सोहळा

शिवराज्याभिषेक सोहळा
आजही
कां केला जातो साजरा
'लोकशाहीतील राजे'
यापासून खरचं
बोध घेतील का जरा?

आले किती गेले किती
सांगा कोण करे गणती
शिवबांची तत्वे अंगीकाराल
तर तुमच्याही
राज्याभिषेकाची
अमर राहील स्मृती

# आकाश एज्युकेशनल सादर करत आहे 'एनईईटी रिवाइंड आणि रिबूट'

**नागपूर, ९ जून :** आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) भारतातील टेस्ट प्रिपरेशन सेवा क्षेत्रातील आघाडीची संस्था अभिमानाने सादर करते एनईईटी रिवाइंड आणि रिबूट, ही एक रणनीतीपूर्ण मास्टरक्लास आहे, जी एनईईटी २०२५ पासून एनईईटी २०२६ या प्रवासात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यास, तयारीच्या रणनीतींचे पुनर्मूल्यांकन करण्यास आणि भविष्यासाठी सुजाण निर्णय घेण्यास मदत करणे हा आहे.

विद्यार्थ्यांच्या यशासाठीच्या आपल्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचा एक भाग म्हणून, एईएसएलने कॉन्सेप्ट कुंडली हे अत्याधुनिक, एआय-चालित साधन सुरू केले आहे, जे आकाश एआय-लॅबद्वारे विकसित करण्यात आले आहे. कॉन्सेप्ट कुंडली नीटच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी सखोल आढावा देऊन, सुधारणा करण्याच्या क्षेत्रांची ओळख करून देऊन, आणि खरोखरच महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करून सक्षम करते. हे अधिक हुशार, जलद आणि धोरणात्मक तयारीसाठी डिझाइन करण्यात आले आहे.

एनईईटी रिवाइंड आणि रिबूटची मुख्य वैशिष्ट्ये :

* एनईईटी २०२५ चा एकूण विश्लेषण: या वर्षीच्या परीक्षेतील विषयवार कामगिरी आणि मुख्य प्रवृत्तीचे विश्लेषण.
* एनईईटी धोरणांवर तज्ज्ञ मार्गदर्शन: AESL च्या सर्वोत्तम शिक्षकांकडून २०२६ मध्ये एनईईटी प्रयत्न किंवा पुन:प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्षम टिप्स.
* टॉपर्सची कथा आणि त्यांचा प्रवास: एनईईटी २०२५ च्या टॉपर्सच्या प्रेरणादायी कथा आणि तयारीची माहिती, जे भविष्याच्या इच्छाशक्तीला प्रोत्साहन देईल.



* एनईईटी २०२५ मधील अपेक्षित कट-ऑफ आणि रँक: श्रेणी-आधारित आणि राज्य-आधारित अपेक्षित रँक आणि कट-ऑफ मार्क्सवरील अंतर्दृष्टी.
* एनईईटी २०२५ नंतर काय करावे: करिअर काऊन्सेलिंग सत्रे, वैद्यकीय आणि संबंधित आरोग्य विज्ञानांच्या पर्यायांवर मार्गदर्शन, आणि पुढील पाऊल कसे निवडावे याबाबत सल्ला.

कॉन्सेप्ट कुंडली ही तयारीतील अंदाज वर्तवण्याची गरज दूर करण्यासाठी तयार करण्यात आलेली आहे. ती विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे बारकाईने विश्लेषण करते आणि त्या डेटावर आधारित एक कृतीयोग्य अभ्यास योजना तयार करते.

* अचूक गॅप विश्लेषण: अध्यायानुसार, प्रश्नप्रकारानुसार विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विश्लेषण करते आणि नेमके strengths आणि weaknesses दाखवते, जेणेकरून अभ्यास अधिक केंद्रित करता येईल.
* स्मार्ट सुधारणा आराखडा: जास्त गुण मिळवणाऱ्या अध्यायांना आणि महत्त्वाच्या विषयांना प्राधान्य देते, ज्यामुळे विद्यार्थी स्पष्ट ध्येय ठरवू शकतात आणि प्रगतीला गती मिळते.
* वैयक्तिक अभ्यास यंत्रणा: दररोज अभ्यासासाठी मार्गदर्शन करते आणि सरावासाठी सूचवलेले कृती पद्धती सांगते, ज्याचा थेट परिणाम स्कोअरवर होतो.

याबद्दल बोलताना, डॉ. एच.आर. राव, चीफ ऐकडेमिक आणि बिज़नेस हेड, आकाश एज्युकेशनल सर्विसेस लिमिटेड, म्हणाले, AESL मध्ये, आम्ही केवळ कोचिंग संस्थाच नाही, तर आम्ही विद्यार्थ्यांचे समस्येचे समाधान करणारे, मार्गदर्शक आणि त्यांच्या यशस्वी प्रवासाचे भागीदार आहोत. एनईईटी रिवाइंड आणि रिबूट हा त्याच वचनबद्धतेचा पुढील टप्पा आहे. हे विद्यार्थ्यांना थोडा वेळ घेण्याची, त्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्याची आणि भविष्याच्या संदर्भात सुज्ञ निर्णय घेण्याची संधी देते. एखादा विद्यार्थी यावर्षी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेत असो किंवा एनईईटी २०२६ साठी तयारी करत असो, आमचा मार्गदर्शक नकाशा त्याला प्रत्येक पाऊलावर मार्गदर्शन करण्यासाठी तयार आहे.

एनईईटी ही राष्ट्रीय चाचणी एजन्सीद्वारे प्रत्येक वर्षी घेतली जाते, जी विद्यार्थ्यांना भारतातील सरकारी आणि खासगी संस्थांमध्ये अंडरग्रॅज्युएट वैद्यकीय, दंत आणि आयुष इत्यादी) कोर्सेससाठी पात्रतेची चाचणी करते, तसेच परदेशात प्राथमिक वैद्यकीय पात्रता घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी देखील आहे.

## टेलिव्हिजन अभिनेत्रींचे पावसाळ्यामधील स्किनकेअर सिक्रेट्स जाणून घ्या!



**मुंबई, ९ जून :** पावसाळा अनेकांचा आवडता ऋतू आहे, पण त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक आव्हाने देखील घेऊन येतो. आर्द्रता आणि ओलसरपणा वाढल्याने मुरुमांपासून ते डिहायड्रेटेड त्वचेपर्यंत त्वचेच्या विविध समस्या उद्भवू शकतात. त्वचा टवटवीत, कोमल आणि चमकदार ठेवण्यासाठी एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री पावसाळ्यामध्ये त्वचेची काळजी घेण्यासाठी त्यांचे सर्वोत्तम सिक्रेट सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''आर्द्रतेमुळे माझी त्वचा कोरडी होती, त्वचा वरून चिकचिकित होण्यासह आतून डिहायड्रेटेड राहते. यावर उपाय म्हणून मी पोषक, पण हलक्या-फुलक्या घटकांचा वापर करते, जे माझ्या त्वचेला ओलावा देतात, ज्यामुळे तेलकटपणा येत नाही. दिवसाच्या सुरूवातीला मी मध व दह्याचे साधे क्लीन्सिंग मिश्रण वापरते. मध नैसर्गिक आर्द्रतेप्रमाणे काम करते, तर दही लॅक्टिस ॲसिड देते, जे त्वचेला हळूहळू एक्स्फोलिएट व हायड्रेट करते. या संयोजनामुळे माझी त्वचा स्वच्छ, कोमल व टवटवीत राहते, ज्यामुळे दिवसभर उत्साहित वाटते. क्लीन्सिंगनंतर मी ताज्या काकडीचा रस व ग्लिसरीनसह बनवलेल्या टोनरचा वापर करते. यामुळे त्वचेमधील जळजळ कमी होते, मुरमं न होण्यास मदत होते आणि त्वचेला ओलावा देखील मिळतो, म्हणून हे पावसाळ्यामध्ये त्वचेवर येणाऱ्या चिकटपणाला दूर करण्यासाठी परिपूर्ण आहे. मी आठवड्यातून दोनदा चेहऱ्यावर केळी व मधापासून बनवलेला फेस मास्क लावते. केळ्यांमध्ये पोटॅशियम व व्हिटॅमिन्स मोठ्या प्रमाणात असतात, जे त्वचेला आतून पोषण देतात, तर मध ओलावा कायम ठेवते. हा मास्क माझ्या त्वचेला चमकदार बनवतो आणि मेकअप व स्टुडिओ लाइट्सखाली दीर्घकाळपर्यंत त्वचा कोरडी होण्याला प्रतिबंध करते.''

मालिका 'भाबीजी घर पर है'मधील विदिशा श्रीवास्तव ऊर्फ अनिता भाबी म्हणाल्या, ''पावसाळा त्वचेसाठी आव्हानात्मक ठरू शकतो. सतत आर्द्रतेमुळे त्वचेवर मुरमं, तेलकटपणा येण्यासोबत त्वचा कोरडी होऊ शकते. म्हणून मी या ऋतूदरम्यान माझे स्किनकेअर रूटिन साधे, पण चांगले ठेवते. माझा आवडता उपाय म्हणजे दोन चमचे मीठ, एक चमचा ताज्या लिंबाचा रस आणि काही थेंब ऑलिव्ह ऑइलसह बनवलेले नॅचरल फेशियल स्क्रब. मीठ सौम्य एक्स्फोलिएण्टप्रमाणे काम करते, त्वचेमधील मृत पेशींना दूर करते आणि छिद्रे मोकळी करते, तर लिंबाचा रस त्वचेला उजळवतो आणि तेलकटपणा नियंत्रित करण्यास मदत करतो. ऑलिव्ह ऑइल त्वचेला पोषण देते, एक्सफोलिएशननंतर त्वचा हायड्रेटेड आणि कोमल ठेवते. मी त्वचेला आतून स्वच्छ करण्यासाठी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा या स्क्रबचा वापर करते, ज्यामुळे त्वचा फ्रेश, कोमल व टवटवीत दिसते. पावसाळ्यामधील परिणामांना प्रतिबंध करण्यासाठी माझ्या त्वचेला याच उपायाची गरज आहे.''

# दलित पँथरच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बुद्धभूषण गोटे यांची नियुक्ती



**मुंबई, ९ जून :** दलित समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या दलित पँथर या संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी आंबेडकरी समाजाचे युवा नेतृत्व असलेले बुद्धभूषण कुंदन गोटे यांची, दलित पँथरच्या पक्षश्रेष्ठी मलिका नामदेव ढसाळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. दलित पँथरचे मुख्य प्रवक्ते संदीप जाधव यांनी राष्ट्रीय अध्यक्षपद नियुक्तीची घोषणा केली.

यावेळी मार्गदर्शन करताना मलिका ढसाळ यांनी सांगितले की, बुद्धभूषण गोटे यांचा गेल्या अनेक वर्षांचा सामाजिक कार्याचा अनुभव संघटनेच्या उन्नतीस उपयोगी ठरेल. ही नव्या संघर्षाची तयारी असून दलित पँथरला आज पन्नास वर्षांहून अधिक काळ झाला आहे, तरीही पँथरचे गारूड जनमानसात कायम असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आजही आवेशात लढणारे पँथर्स आहेत. कारण दलित पँथर हा सकारात्मक विचार असून, हे एक हत्यार आणि ज्वाला आहे. ही क्रांतीची ज्वाला बुद्धभूषण गोटे विझू देणार नाही, हा विश्वासही मलिका ढसाळ यांनी व्यक्त केला.

यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. नितीन खैरे यांनी सांगितले की, दलित पँथर इथल्या प्रस्थापित समाजव्यवस्थेला भगदाड पडण्याची ताकद असणारी शक्ती आहे. तसेच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा देणारी ही संघटना असल्याने, बुद्धभूषण गोटे यांच्याकडे या लढाऊ संघटनेचे नेतृत्व आल्याने ही संघटना मोठ्या ताकदीने उभी राहील, हा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच सोलापूर येथील पँथर रायप्पा, संतोष भालेराव आणि कविता मगरे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत, दलित पँथरची आजही गरज आहे असे सांगत दलित पँथरचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष बुद्धभूषण कुंदन गोटे यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला रिपब्लिकन चळवळीचे नेते नितीन मोरे यांनीही समाजावरील होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध आपण खांद्याला खांदा लावून लढा देऊ, असे स्पष्ट केले आणि श्री. गोटे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून संघटनेला नवसंजीवनी मिळेल आणि दलित समाजाच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा संघटनेच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

यावेळी दलित पँथरचे सदस्य जनार्धन धायमुक्ते, कविता मगरे, पारापा डवरे, भुजंग साळवी, संतोष भालेराव, दीपक साळवी, कय्युम सय्यद, किरण मांदळे आणि दलित पँथरचे महाराष्ट्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झी५ तर्फे नवीन ब्रँड आयडेंटिटीचे अनावरण, भाषेला प्राधान्य देणारा, प्रत्येकाला आपलासा वाटणारा कंटेंट देण्यावर भर देणारा प्लॅटफॉर्म बनण्याचे ध्येय

**मुंबई, ९ जून :** झी५ ने आज नवीन ब्रँड ओळख आणि नवे धोरण जाहीर केले असून त्यातून भारतातील आद्य मनोरंजक प्लॅटफॉर्मचे स्थान आणखी बळकट करण्याची योजना आहे. हे रिलाँच झी५ च्या विकासातील महत्त्वाचा टप्पा असून ते आपली भाषा, आपल्या गोष्टीचं (विविध भाषा, अगणित गोष्टी) आश्वासन देणारं आहे. या कॅम्पेनद्वारे सांस्कृतिकदृष्ट्या अस्सल कथा, वेगवेगळ्या भाषांसह स्थानिक स्पर्श आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर जास्त भर दिला जाणार आहे.

नवीन व्हिज्युअल आयडेंटिटी, उत्पादनाचा नवा अनुभव आणि भारतातील प्रमुख भाषांचा समावेश असलेले भाषिक प्लॅन्स यांसह झी५ ने प्रेक्षकांशी असलेले नाते आणखी घट्ट करण्याचे ठरवले आहे. हा धोरणात्मक बदल तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आहे कंटेंट, अनुभव आणि वाजवीपणा. यातून भारताच्या डिजिटल क्षेत्रातील मागणी पूर्ण केली जाणार आहे. झी५च्या भाषिक कंटेंट धोरणामुळे लोककथा, खऱ्या आयुष्यातले हिरोज, प्रादेशिक आख्यायिका यांपासून प्रेरित स्थानिक कथांवर जास्त भर दिला जाणार आहे. प्रत्येक भाषेतील कंटेंटमध्ये व्यापकता आणि अस्सलपणाला प्रमुख स्थान असेल.

भाषिक प्लॅन्स प्रती महिना १२० रुपयांपासून सुरू होतील. हिंदी पॅक (पंजाबी व भोजपुरीसह) प्रती महिना २२० रुपयांना उपलब्ध असेल. ऑल ॲक्सेस पॅक प्रती महिना ३२० रुपयांना उपलब्ध असेल आणि सर्व पॅक्सचे वार्षिक व्हेरिएंट्स दिले जातील. आर्थिक वर्ष २६ मध्ये १३०+नवीन कंटेंट टायटल्स त्यात ओरिजनल्स, सिनेमे, नॉन- फिक्शन तसेच लाइव्ह कंटेंट आणि वेगवेगळ्या भाषिक कंटेंटचा समावेश आहे. आगामी काळात पुढील भाषिक कंटेंट उपलब्ध केला जाणार आहे डिटेक्टिव्ह शेरदिल (हिंदी), छल कपट द डिसेप्शन (हिंदी), सत्तामम नीतीयम (तमिळ), मॉथबारू लव्हस्टोरी (तेलुगू), इन्स्पेक्शन बंगालो (मल्याळम), मारीगुल्लू (कन्नड), आता थांबाया नाय (मराठी) आणि विभिषण (बंगाली) यांचा समावेश असेल.

प्रेक्षकांना आकर्षिक करण्यासाठी प्लॅटफॉर्मद्वारे इन्ट्युटिव्ह डिझाइन आणि एआय- पॉवर्ड पर्सनलायझेशनवर भर दिला जाणार असल्यामुळे भारतातील विविध ठिकाणच्या प्रेक्षकांना त्यांच्या आवडीनुसार कंटेंटची शिफारस मिळेल. डेटावर आधारित इनसाइट्सच्या आधारे झी५ द्वारे अधिक संवादी आणि सोपी सेवा प्रेक्षकांन दिली जाईल. पर्यायाने प्रेक्षकांना सर्व डिव्हायसेसवर आवडीनुसार शिफारसी मिळतील आणि दर्जेदार स्ट्रीमिंगचा आनंद घेता येईल.

झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लि. च्या डिजिटल बिझनेस आणि प्लॅटफॉर्म्सचे अध्यक्ष अमित गोएंका म्हणाले, आमची नवीन ब्रँड आयडेंटिटी भाषेला महत्त्व देणारा प्लॅटफॉर्म बनण्याच्या आमच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे आणि त्यात भारतीय प्रेक्षकांच्या वैविध्यतेचे प्रतिबिंब दिसून येते. आमचा धोरणात्मक दृष्टीकोन स्पष्ट आहे भारतात, जगभरात आमचे अस्तित्व मजबूत करणे, सांस्कृतिकतेला साजेशा कथांसह प्रेक्षकांना आकर्षिक करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने इंट्युटिव्ह आणि वैयक्तिक आवडीनुसार कंटेंट उपलब्ध आहे. आज जगभरात भारतीय मनोरंजनाकडे पाहाण्याचा आणि त्याच्याशी कनेक्ट होण्याचा दृष्टीकोन झपाट्याने बदलत आहे.

# पालकमंत्री बावनकुळे यांनी घेतला मनपाच्या पावसाळ्यापूर्व नियोजन कार्याचा आढावा

**नागपूर, ९ जून :** राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपाच्या पावसाळ्यापूर्व नियोजनासह अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीच्या व क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. पावसाळापूर्वी आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी पुढील आठवड्यात मनपा आयुक्तांनी आमदार व माजी नगरसेवकांसोबत झोननिहाय बैठक घेऊन अहवाल तयार करावा, असे निर्देश यावेळी पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हाधिकारी सभा कक्षात झालेल्या आढावा बैठकीत खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार अभिजीत वंजारी आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार सुधाकर कोहळे, मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, माजी नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंदाडे, सचिन रक्षमवार, विजय गुरुबक्षांनी, श्रीमती अश्विनी एलचटवार, गेडाम यांच्यासह उपअभियंता आदी अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपाद्वारे शहरात सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी. कामांमुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. याशिवाय मंत्रीमहोदयांनी क्षतिग्रस्त नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीच्या बांधकामाचा आणि क्षतिग्रस्त रस्त्यांच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रगतीपथावरील कामांची गती वाढविण्याचे ही निर्देश दिले. आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत असलेली उर्वरित कामे करण्याकरिता वाढीव निधीचा अतिरिक्त प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य सरकारकडे पाठवाव, असे निर्देश यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. बैठकीत आमदारांनी आपल्या मतदार संघातील विविध कामांची माहिती जाणून घेतली.

बैठकीत सर्वप्रथम पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापुढे मनपाद्वारे करण्यात आलेल्या विविध कामाचे सादरीकरण करण्यात आले. याद्वारे अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ५६ नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम आणि क्षतिग्रस्त झालेल्या ४१ रस्त्यांच्या कामांसाठी मंजूर २०४.७१ कोटी निधीची माहिती देण्यात आली. यात क्षतिग्रस्त नदी/नाल्यांच्या सुरक्षा भिंतीची मनपाच्या दहाही झोनमध्ये एकूण ५६ कामे केली जाणार आहे. यात ८९५३ मीटर लांबीच्या कामाचा समावेश आहे. याकरिता १६३.२३ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. याद्वारे ५० कामे पूर्ण करण्यात आली असून, ५ कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले. तर दहाही झोन मध्ये एकूण ४१ क्षतिग्रस्त रस्त्यांची कामे केली जात आहेत. यात ४७६८० मीटर लांबीची कामे केली जाणार आहे. याकरिता ३३.७४ कोटी रुपये निधी मंजूर झाला आले. याद्वारे ४० कामे पूर्ण करण्यात आली असून, १ काम प्रगतीपथावर असल्याचे सादरीकरणाद्वारे सांगण्यात आले.

## कॉमेडियन एहसान कुरेशी 'सरु' या मालिकेतून टेलिव्हिजनवर परत येतोय!




**मुंबई, ९ जून :** झी टीव्हीवरील 'सरु' मालिकेने प्रेक्षकांशी भावनिक नाते तयार केले आहे. हृदयाला स्पर्श करणारी कथा आणि दमदार अभिनयामुळे या मालिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. जसजसा हा शो पुढे जातो आहे तसतसा सरु (मोहक मटकर) चा मोठ्या शहरातला प्रवास तिच्या धैर्य आणि आत्मविश्वासाचे प्रतिबिंब बनत आहे. या प्रवासात अनेक रंगतदार पात्रेही तिच्या सोबत आहेत आणि त्यातलंच एक पात्र म्हणजे नारायणजी ज्याला शोमध्ये एनजे म्हणून ओळखले जाते आणि हे पात्र साकारत आहेत प्रसिद्ध अभिनेता आणि हास्यकलाकार एहसान कुरेशी. टेलिव्हिजनवर पुनरागमन करताना एहसान एका अशा भूमिकेत झळकणार आहेत, जी त्यांच्या हास्यप्रद आणि कवितेतल्या अंगाला अगदी नैसर्गिकरित्या समोर आणते. ते वेद (शगुन पांडे) यांचा बालपणीचा काळजीवाहू आणि आयुष्यभराचा विश्वासू मित्र आहेत. एनजे फक्त साथी नाही तर मार्गदर्शक, सल्लागार आणि वेदच्या आयुष्यात आनंद व ऊब देणारा एक आधारस्तंभ आहे. शायरीने भरलेली त्यांची पंचलाईन आणि कमालीचं वेळेचं भान यामुळे एनजे एक हलकंफुलकं आणि तरीही भावनिकदृष्ट्या मजबूत पात्र म्हणून दिसणार आहे.

आपल्या भूमिकेबद्दल आनंद व्यक्त करताना एहसान कुरेशी म्हणाले, खूप दिवसांनंतर मी पुन्हा कॅमेरासमोर उभा आहे, पण ना माईकपासून दूर गेलोय, ना विनोदाच्या सवयीपासून! झी टीव्हीवरील माझ्या पहिल्याच मालिकेसाठी काम करायला मी उत्सुक आहे आणि शशि सुमीत प्रॉडक्शन्सच्या अद्वितीय टीमसोबत पुन्हा एकदा काम करण्याची संधी मिळाल्यामुळे मी अतिशय आनंदित आहे. सरुच्या जगात पाऊल ठेवताना असं वाटतंय की हे माझ्या आयुष्यातील पुढचे पान आहे. या मालिकेमध्ये अर्थ आहे आणि भावनिक खोलपणाही. एनजे माझ्यासाठी फक्त पात्र नाही तो प्रत्येकाचा आवाज आहे, जो आयुष्यातल्या अवघड वळणांवरही हसणं कसं जपावं हे जाणतो. एनजे वेद आणि सरुच्या आयुष्यात एक सकारात्मक साथ आहे. शायरीद्वारे थोडंसं शहाणपण शेअर करायचं आणि विनोदाच्या माध्यमातून दिलासा द्यायचा हेच मी सरुमध्ये आणू इच्छितोय.

एहसान कुरेशी आता सरु मालिकेत आपला कवितेचा स्पर्श घेऊन येत आहेत आणि मालिकाही नवीन संघर्षांसोबत पुढे जात आहे विशेषत: अनिका सरुच्या मार्गात नवनवीन अडथळे आणत आहे.

# शब्दकोडे क्रमांक २१३३



आडवे शब्द :-
१) निमग्न, गुंग
३) उदा हिंदू, मुस्लीम ख्रिश्चन इ
४) पावसाची धार
६) आर्जव
९) गर्दभ
१०) दाखला
१२) संरक्षक जाड भिंत
१४) घर
१५) शरीरातील वात दूर करणारा
१६) नव्वद अंशाच्या आतील कोन
१७) वेळ वाया घालविणे
१९) दु:खाची छाया
२१) ज्या प्रमाणे
२२) आश्रय, थारा
२४) बेतास बेत
२७) दात
२८) पंख
२९) त्याला (सं)
३०) एका बाजूस झुकणे
३२) नात्यातील मनुष्य
३३) जकात
३६) धनी
३७) लष्करी छावणीतील बाजार
३९) महिना
४०) दरवाजा
४२) डावरा
४४) पंख
४५) एक चतुर्थांश भाग
४६) अपशकुन (करणे)
४८) कातडी
४९) वडिलांचे वडील
५०) साहसी कृत्य, मूर्खपणाचे काम करणारा
५१) पशू
५२) कायदा मोडणे
५५) झकास
५६) पुन्हा
५७) तीन पानांचा एक म्हणीतील वृक्ष
५९) अंबाडीसारखे एक झाड, त्याचा वाख
६०) जावयाला पहिल्या दिवाळीत मिळणारी भेटवस्तू
६१) गावातील नागरिक, गावात राहाणारे
६२) वात्रट
६३) आवाज होणे
६४) काम करण्याची पात्रता
६६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६७) खर्चात कपात, कतरबेत,
६८) पुष्पदल

उभे शब्द :-
१) पहारेकरी
२) होडी
३) श्रीमंत
४) सारखा
५) वाळवंट
६) दोस्त, सूर्याचे एक नाव
७) रागाची चरफड,
८) सभ्यपणाची रीत
१०) निघून जाणे
११) पाणी वाहण्याचे गवंड्याकडील साधन
१३) रोखलेली नजर
१४) भारताचे एक बेट
१५) उत्तराधिकार
१७) शाळेतील फळ्याचा पूर्वीचा रंग
१८) उपस्थित
२०) पुरुषांनी नेसावयाचे रेशमी वस्त्र
२२) निर्यात
२३) मीठ
२५) फक्त, केवळ
२६) संपूर्ण
२८) वेतन
२९) सिद्ध
३१) मागणीचा सततचा हट्ट
३२) अंगरखा
३३) दुखणे, रोग, विकार
३४) मिळवता, कमाई करणारा
३५) उगाच
३६) नारळाचे झाड
३७) खोलवर
३८) पूर्वज
४१) मार्ग
४३) माल साठविण्याची जागा, गुदाम
४५) गवताचे पान
४७) दुर्दशा
४९) लांबट चौकोन
५०) दाह, अग्नी, ज्वाला
५१) कथिल आणि शिसे यांचा मिश्र धातू
५२) राबता, भोगवटा, रिवाज
५३) निमित्त, सबब
५४) अतिशय त्रास देणे, सळो की पळो करणे
५५) नंतर
५६) उथळ, पसरलेला आकार
५७) परीक्षा घेणारा
५८) समानता
५९) तारणारा
६०) वासर
६१) एक रंगीत कंदमूळ
६२) चक्र
६३) गंध
६५) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## श्रीक्षेत्र आंभोरा येथे गंगा दशहार उत्सव साजरा

**वेलतुर :** श्रीक्षेत्र आंभोरा येथे देवस्थान पंचकमेटीच्या वतीने गंगा दशहार उत्सव नुकताच साजरा करण्यात आला. या गंगा दशहार उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त आहे. यावेळी हजारो भाविकांनी आपली उपस्थिती दर्शवली. दहा दिवस चाललेल्या दशहार समाप्ती उत्सवानिमित्त ह.भ.प.योगेश चाकोले महाराज यांच्या वाणीतून गोपालकाल्याचे कीर्तन होऊन दहीहंडी फोडून गोपालकाला वितरित करण्यात आला.यावेळी महाप्रसादचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी देवस्थान व्यवस्थापक पंचकमेटीचे अध्यक्ष रत्नाकर ठवकर, सचिव केशवराव वाडीभस्मे, उपाध्यक्ष नरेश ठवकर, कोषाध्यक्ष मदन खळसिंगे,कमलेश ठवकर, प्रा.सुरेश नखाते, भाष्कर भोंगाडे, प्रा.डॉ. रामेश्वर पाठेकर,बाबाराव तुमसरे, प्रा.डॉ. अविनाश तितरमारे, नामदेव तितरमारे,धनराज कुर्जेकार, जनार्दन बावनकुळे, रामेश्वर भोंगाडे आदी उपस्थित होते.


## कार्यालय नगरपंचायत बेसा पिपळा
### ता.जि.नागपुर

जा.क्र.न.पं.बे. पि./बांध. का. वि. १८०९/२०२५
कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा
दिनांक : २९/०५/२०२४

**निविदा सूचना**

प्रशासक नगर पंचायत बेसा पिपळा, जि. नागपूर यांचा वतीने नगर पंचायत बेसा पिपळा हदीतील सन २०२५-२०२६ नगर पंचायत निधी/विकास निधी अनुदान योजना अंतर्गत ०२ कामाची बि-१ दोन लिफाफा पद्धतीने निविदा पद्धतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून, निविदा मागविण्यात येत आहे. कार्यालयीन वेळेवर संबंधित विभाग मध्ये दिर्नाक ३०/०५/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. करिता कामाची तपशील खालील प्रमाणे आहे.

प्रशासक
नगरपंचायत बेसा पिपळा


## राशीभविष्य

**मेष :** प्रत्येक पावलाचा विचारपूर्वक आढावा घ्या. तुमच्या मनाचा कौल घेणे गरजेचे आहे, कारण तुम्हाला तुमचे अंतर्मन योग्य मार्ग दाखवेल. कोणतीही मोठी जोखीम घेण्यापूर्वी नीट तपासून घ्या.

**वृषभ :** आज तुमच्या समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा. तुमच्या जवळच्या मित्रांसोबत भागीदारीत कोणतेही काम करू नका. कामाच्या क्षेत्रात स्वत: निर्णय घ्या.

**मिथुन :** आज तुमच्यासमोर काही आव्हाने उभी राहतील, पण त्यामुळे तुम्हाला प्रगतीची नवी संधी मिळेल. तुम्हाला आयुष्यात नक्की काय मिळवायचे आहे, यावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी वादविवाद टाळा. आर्थिक बाबतीत थोडी सावधगिरी बाळगा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा, अन्यथा आर्थिक नियोजन बिघडू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या मताला महत्त्व दिले जाईल.

**सिंह :** जेव्हा तुमचे ध्येय स्पष्ट असते, तेव्हा मार्ग आपोआप सापडतो. जीवनातील नवीन संधी स्वीकारण्यासाठी तयार राहा. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवल्यास योग्य निर्णय घेऊ शकाल.

**कन्या :** योग्य व्यक्तीला काम सोपवल्यास तुमचा भार हलका होईल. कोणत्याही समस्येतून मार्ग काढण्याचे कौशल्य आणि क्षमता तुमच्याकडे आहे, फक्त स्वत:वर विश्वास ठेवा.

**तुळ :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक असू शकतो. कामाचा ताण वाढेल. विनाकारण हट्ट करु नका. आपल्या सहकाजयांची किंवा मित्रांची मदत घ्यायला संकोच करू नका.

**धनु :** आज तुमच्या आजूबाजूला बदलाचे वारे वाहतील, ज्यामुळे मनात थोडी अस्वस्थता निर्माण होईल. पण कोणताही निर्णय घेताना विचार करता. अतीघाई करु नका.

**मकर :** आज, तुमच्या प्रिय व्यक्तीकडून पैसे आणि भेटवस्तू मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल. कौटुंबिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. कामाच्या ठिकाणी विरुद्ध लिंगाच्या जोडीदाराची जवळीक तुम्हाला दिलासा देईल.

**कुंभ :** आज तुमच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि ऊर्जा असेल. तुमच्यासमोर कोणतेही आव्हान आलं तरी तुम्ही ते सहजपणे हाताळू शकाल. काही मतभेद असल्यास शांतपणे संवाद साधून ते मिटवा.

**मीन :** व्यवसायात प्रगतीसोबतच तुम्हाला नफाही मिळेल. तुमच्या गुप्त रणनीतीत तुम्हाला यश मिळेल. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांच्या जवळीकतेचा फायदा तुम्हाला मिळेल.

# चांदूर रेल्वेत चार दिवसांत तीन ठिकाणी चोरी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ९ : चांदूर रेल्वे शहरात चोरट्यांनी अक्षरश: धुमाकूळ घातला असून दररोज कुठे ना कुठे चोरीच्या घटना घडत आहेत. पोलिस दप्तरी असलेल्या नोंदीनुसार गेल्या चार दिवसांत येथे सतत चोऱ्या झाल्या. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली असून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे, अशी मागणी पुढे आली आहे. या गोष्टींकडे खुद्द जिल्हा पोलिस अधीक्षकांनी लक्ष देण्याची गरजही त्यामुळेच निर्माण झाली आहे.

पोलिसांच्या नोंदीनुसार ४ जून रोजी रोजी पात्रीकर कॉलनी, ५ जून रोजी आठवडी बाजार व ६ जून रोजी शिक्षक कॉलनी येथे चोरीच्या घटना घडल्या आहेत. तर चांदूर रेल्वे ते पळसखेड मार्गावरील अंबापुर येथील हनुमान मंदिरात दुसऱ्यांदा चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना ७ जून रोजी उघडकीस आली. अशा सततच्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सदर चोर्यांचे सत्र कधी थांबणार ? असा सवाल शहरवासी पोलिस विभागाला करीत आहे. त्यामुळे आता ग्रामीण पोलिस अधीक्षकांनी चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहे. मागील दोन ते तीन महिन्यात चांदूर रेल्वे शहरात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्यामुळे त्रस्त होऊन शेकडो नागरिक काही दिवसांपूर्वी स्थानिक पोलिस स्टेशनवरसुद्धा धडकले होते. यानंतर पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवत पती-पत्नी आरोपीला जेरबंद केले. त्यांनी शहरातील तीन चोरीच्या घटनांची कबुली दिली होती.

पोलिसांनी सदर पती-पत्नी आरोपींना संपूर्ण चांदूर रेल्वे शहरातून पायदळ फिरवून नागरिकांना चोरट्यांची ओळख व्हावी, याकरिता एक प्रकारे रॅलीच काढली होती. यानंतर चोऱ्यांना आळा बसेल असे नागरिकांना वाटत होते. परंतु आता पुन्हा चोरट्यांनी चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यात हैदोस घालायला सुरुवात केली आहे. चांदूर रेल्वे शहरातील पात्रीकर कॉलनी परिसरातील प्रवीण इंगळे यांच्याघरी १ ते ४ जूनच्या दरम्यान चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप उघडून कपाटातील एकूण ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. त्यानंतर आठवडी बाजार परिसरातून ५ जून रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास एका ४१ वर्षीय महिलेच्या पिशवीतील नगदी ४० हजार रुपये व एक साधा मोबाईल असा एकूण ४० हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल लंपास केला.

शिक्षक कॉलनी परिसरात राहणारे कमलाकर भाऊराव आखरे यांच्या घरी ६ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरी कोणी नसताना कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील २४ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला.

# सीईओ संजीता महापात्र यांना स्कॉच पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ९ : अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीइओ) संजीता महापात्र यांना या वर्षाचा प्रतिष्ठेचा 'स्कॉच अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. मेळघाटमधील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यासाठी राबवलेल्या 'मिशन मेळघाट २८' या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. आगामी सप्टेंबर महिन्यात दिल्ली येथे आयोजित एका कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार बहाल केला जाईल. जानेवारी २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे धारणी आणि चिखलदरा तालुक्यांतील कुपोषणाचे प्रमाण कमी झाले असून संस्थात्मक प्रसूतीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचा थेट



परिणाम म्हणून २०२२ पासून आई व बाळाच्या मृत्यूच्या घटनांमध्ये घट झाली आहे. तत्कालीन सीइओ अविश्यांत पंडा यांनी त्यावेळी जाणीवपूर्वक हा उपक्रम सुरु केला होता. यामध्ये आरोग्य विभागातील संपूर्ण यंत्रणेसह अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि इतर घटकांचाही मोठा सहभाग आहे. सहा जून रोजीच्या अंतीम सादरीकरणानंतर अमरावती जिल्हा परिषदेच्या सीइओ संजीता महापात्र यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. स्कॉच अवॉर्ड हा देशासाठी योगदान देणाऱ्या नामवंत व्यक्तींना दिला जाणारा पुरस्कार आहे. पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण, डिजिटल टेक्नोलॉजी आणि जिल्हा प्रशासन आदी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. सीईओ संजीता महापात्र यांच्या दूरदृष्टी, प्रयत्नशीलता आणि सामाजिक बांधिलकीची ही राष्ट्रीय स्तरावर मिळालेली पावती आहे. अमरावती जिल्ह्याच्या नावावर या पुरस्कारामुळे अभिमानाची नोंद झाली आहे.

# नव्या बायपासवर कारच्या अपघातात नऊ जखमी

## ओमनी व्हॅन पुलाच्या सरंक्षण भितींला धडकली



■ महासागर प्रतिनिधी,
तिवसा, दि. ९ : तालुक्यातील शेंदोळा ते मोझरी या नवीन बायपासवर नांदगाव पेठ एमआयडीसी मधील कामगारांना घेवून जाणाऱ्या ओमनी कारचा पुलाला धडकून अपघात झाला. या अपघातात ओमनीमधील नऊ कामगार जखमी झाले आहेत. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ओमनी व्हॅन पुलाच्या सरंक्षण भितींला जाऊन धडकली. हा अपघात रविवारी ८ जूनला सकाळी साडे आठ वाजताच्या सुमारास घडला आहे. आशिष सुधाकर गोपाळकर (२८, आष्टी), मंगेश उद्धव ठाकरे (३५, सुरवाडी), हर्षद सुरेश रुद्रकार (२७, भारसवाडा), वैभव रमेश कुऱ्हाडे (२८, जळगाव आर्वी), ऋषभ भाऊराव सव्वालाखे (२८, आष्टी), आकाश धनराज जाने (२८),अश्विन वामनराव तवर (३१) आणि आकाश घरड (२२) अशी जखमींची नावे आहेत. तिवसा येथून नांदगाव पेठ एमआयडीसी येथे कंपनीत हे कामगार जात होते. मोझरी येथील नवीन बायपासने एका पुलाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व ओमनी व्हॅन रस्त्याच्या कडेला असलेल्या पुलावर जाऊन धडकली. अपघातातची माहीती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जखमीपैकी सहा जणांना उपचारासाठी अमरावतीत आणले होते.

# घरकुलसाठी ८५७०० कुटुंबांचे सर्व्हेक्षण

**अकोला :** प्रधानमंत्री आवास योजने (ग्रामीण) अंतर्गत बेघर आणि कच्च्या घरात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यात गरीब व पात्र लाभार्थी कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. जिल्ह्यात एकूण ८४ हजार ७०० अशा कुटुंबांचे सर्वेक्षण झाले असून, या नागरिकांना घरकुलाचा लाभ देण्याबाबतच्या सूचना शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ग्रामीणअंतर्गत बेघर आणि कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांकडेही स्वत:चे हक्काचे घर असावे, यासाठी पात्र कुटुंबांच्या सर्वेक्षणाला जिल्हा परिषदेच्या यंत्रणेकडून सुरुवात करण्यात आली. ग्रामसेवकांमार्फत व संबंधित कुटुंबप्रमुखांकडून 'महाआवास ॲप'द्वारे सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षण करण्याची मुदत ३० एप्रिलपर्यंत होती. ती १५ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे. मात्र त्यांनंतर तांत्रिक समस्येमुळे नोंदणी होवू शकली नाही. त्यामुळे केंद्र शासनाने पुन्हा मुदतवाढ दिली होती. आता ही मुदत संपली असून, एकूण ८४ हजार ७०० जणांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. आता शासन स्तरावरून पात्र लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध होणार आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनेत १०० दिवसांचे उद्दिष्ट पूर्ण करून अकोला जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. उद्दिष्टाच्या १८३ टक्के काम करून साडेचार हजारावर घरकुले पूर्ण केली आहेत.

# संत्रा फळबागांना स्पेनच्या शास्त्रज्ञांनी दिली भेट

■ महासागर प्रतिनिधी,
मंगरूळपीर , दि. ९ : मंगरूळपीर तालुक्यातील वनोजा गावातील संत्रा फळबागेला ०४ जून रोजी स्पेन आणि पोर्तुगालमधील परदेशी गुंतवणूकदारांनी भेट दिली. नाशिक येथील सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे गुंतवणूकदार असलेले स्पेनमधील संशोधक आणि शास्त्रज्ञ जोस मारिया फोंटान डेल जुन्को आणि पोर्तुगालमधील जेवियर कॅनो पेची यांनी सह्याद्रीच्या तज्ज्ञांसह संत्रा फळबागांची पाहणी केली. भेटीदरम्यान, त्यांनी संत्र्याची लागवड, शेती व्यवस्थापन पद्धती सुधारणे आणि उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना मौल्यवान अंतर्दृष्टी आणि तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच, काळासोबत बदलत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करणे किती गरजेचे आहे, यावर त्यांनी भर दिला. वनोजा हे गाव संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून, येथील शेतकरी चांगल्या दर्जाचे संत्रा उत्पादन घेतात. परदेशी शास्त्रज्ञांनी येथील बागांची पाहणी करून शेतकऱ्यांकडून संत्रा शेतीबाबत सविस्तर माहिती घेतली. बागांची पाहणी करताना, त्यांनी शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, आधी आपण साधा मोबाईल वापरत होतो, आता आपण स्मार्टफोन वापरतो, ज्यात आपल्याला विविध सुविधा उपलब्ध आहेत.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **DINESHKUMAR RAMESHLAL MOTWANI.** NOW MY NEW NAME IS **PAPPAN RAMESHLAL MOTWANI.**
**ADD** : RAMAN CHANDAK NAGAR KATOL NAGPUR 441302.

MY OLD NAME WAS **JYOTI HASHAMATRAY BUDRANI.** NOW MY NEW NAME IS **HEER PAPPANKUMAR MOTWANI.**
**ADD** : RAMAN CHANDAK NAGAR KATOL NAGPUR 441302.

MY OLD NAME WAS **RITESH PARBATH SINGH SOLANKI.** NOW MY NEW NAME IS **RITESH SINGH SOLANKI.**
**ADD** : PLOT NO 10 AMRAVATI ROAD NEAR SAI BEKARI GURUDATTA COLONY AADARSH NAGAR WADI NAGPUR 440023.

MY OLD NAME WAS **PARBATH /PARWAT SINGH.** NOW MY NEW NAME IS **PARWAT SINGH SOLANKI.**
**ADD** : PLOT NO 10 AMRAVATI ROAD NEAR SAI BEKARI GURUDATTA COLONY AADARSH NAGAR WADI NAGPUR 440023.

MY OLD NAME WAS **BABY KUVER/KISMAT KUVER.** NOW MY NEW NAME IS **BEBI KANWAR.**
**ADD** : PLOT NO 10 AMRAVATI ROAD NEAR SAI BEKARI GURUDATTA COLONY AADARSH NAGAR WADI NAGPUR 440023.

MY OLD NAME WAS **SITADEVI.** NOW MY NEW NAME IS **RITA DEVI SHAH.**
**ADD** : 176, OM NAGAR KORADI ROAD NAGPUR -440030.

MY OLD NAME WAS **SHAKUNTALA MAROTI GAURKHEDE.** NOW MY NEW NAME IS **SUNANDA NARENDRA KAPSE.**
**ADD** : NEAR JANTA BEKARI , HANUMAN NAGAR , BHANDEWADI , PARDI , NAGPUR 440035.

MY OLD NAME WAS **SONIA NAYYAR.** NOW MY NEW NAME IS **SONIA HARIKRISHAN BAJAJ.**
**ADD** : P.NO.236/G6 DIXIT NAGAR NAGPUR 440026.

MY OLD NAME WAS **OWAIS TALHA SHAKEEL AHMAD SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **OWAIS SHEIKH.**
**ADD** : PLOT NO 105 MAHENDRA NAGAR NEAR SHITLA MATA MANDIR NAGPUR 440017.

MY OLD NAME WAS **YASMIN ANJUM SYED JAFAR ALI.** NOW MY NEW NAME IS **YASMIN RASHID SHEIKH.**
**ADD** : PLOT NO 12 EKTA COLONY YADAV NAGAR NEAR PETROL PUMP UPPALWADI NAGPUR 440026.

MY OLD NAME WAS **REENA.** NOW MY NEW NAME IS **REENA LILHARE.**
**ADD** : 61, ARADHNA NAGAR, DIGHORI, NAGPUR -440032.

MY OLD NAME WAS **FARVA MEHDI HASAN JETHA.** NOW MY NEW NAME IS **FARVA MEHDI HASAN.**
**ADD** : P.NO. 516 FLAT NO. C-3 NIKHERA APARTMENT NEW COLONY CHHAONI NAGPUR - 440001.

MY OLD NAME WAS **MEHDI HASAN HUSSAIN ALI JETHA.** NOW MY NEW NAME IS **MEHDI HASAN.**
**ADD** : P.NO. 516 FLAT NO. C-3 NIKHERA APARTMENT NEW COLONY CHHAONI NAGPUR - 440001.

MY OLD NAME WAS **PRABHJEET SINGH CHANIANA.** NOW MY NEW NAME IS **PRABHJEET SINGH.**
**ADD** : PLOT NO.301, BABA BUDHAJI NAGAR TEKA NAKA NAGPUR.
PASSPORT NO. **L7774138**.

MY OLD NAME WAS **KERSI RUSTAM HATHIDARU.** NOW MY NEW NAME IS **KERSI RUSTAM MEHTA.**
**ADD** : GANDHI WARD DEWHADI TAL TUMSAR DIST BHANDARA 441913

MY DAUGHTER PASSPORT NO.**R5385039** IS MY INCORRECT NAME WAS **SOHAIL ALI PATEL.** NOW NEW NAME IS **SOHAIL ALI.**
**ADD:** 169, NEAR KALYANESHWAR MANDIR, KILLA ROAD, MAHAL, NAGPUR 440032 MS

MY DAUGHTER PASSPORT NO.**R5385039** IS MY INCORRECT NAME WAS **FIRDAUS SOHAIL ALI PATEL.** NOW NEW NAME IS **FIRDOUS SOHAIL ALI.**
**ADD:** 169, NEAR KALYANESHWAR MANDIR, KILLA ROAD, MAHAL, NAGPUR 440032 MS

MY OLD NAME WAS **SARFUNNISA BEGUM MOHAMMAD SHAMIM.** NOW MY NEW NAME IS **SARFUNNISA MOHAMMAD SHAMIM RAIN.**
**ADD** : PLOT NO.41,NEAR H.K. COMPUTER, SAI BABA NAGAR, SHANTI NAGAR, NAGPUR -440002, (M.S) INDIA


# १० वर्षांत प्रा.अतुल पाटील यांनी घडवले खेळाडू

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ९ :

खेळाबद्दलचे अतुल्य समर्पण काय असते, याचे उदाहरण ॲथलेटिक्स प्रशिक्षक प्रा. अतुल पाटील आहेत. त्यांनी आजवर ५०० पेक्षा जास्त तरुण, तरुणींना मैदानी खेळांचे विनामुल्य प्रशिक्षण देत त्यांची कारकीर्द घडवण्यास मदत केली. पोलिस भरती, पीएसआय, वनरक्षक, सैनिक भरती, एनडीएची तयारी, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील ? खेळाडू घडवण्याचे सेवाकार्य ना पुरस्कार, ना पैशाची अपेक्षा बाळगता खेळबद्दलच्या समर्पण भावनेतून १० वर्षांपासून सुरू ठेवले. त्यांच्या मार्गदर्शनात घडलेले ७० विद्यार्थी अधिकारीपदावर तर २०० विद्यार्थी पोलिस दलात कार्यरत आहेत. यासोबतच त्यांनी ३० राष्ट्रीय, काही आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवले आहेत.



शिंगणापुरात राहणाऱ्या विपुल गुडधेला प्रा. पाटील यांनी मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले. त्याचे फिटनेस, कौशल्य वाढवले. परिणामी त्याला सेनादलात नोकरी मिळाली. येथेच थांबू नकोस तू कोणताही खेळ सुरू ठेव, असे मार्गदर्शन केले. त्यानंतर त्याने कयाकिंग या खेळाचा सराव सुरू केला. सध्या तो भारताचा अग्रणी आंतरराष्ट्रीय कयाकिंग खेळाडू बनला आहे. तो निश्चितपणे ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व करेल, असा विश्वास प्रा. पाटील यांनी व्यक्त केला आहे. याच विपुल गुडधेला यंदा प्रतिष्ठेचा शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला आहे. प्रा. अतुल पाटील हे जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव तर आहेतच सोबतच बडनेरा येथील बॅरि.आरडीआयके महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक आहेत. ऋतू कोणताही असो, ते महाविद्यालयीन विद्यार्थी, बालकांसह तरुण, तरुणींना धावणे, चालणे, अडथळ्याची शर्यत, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, हातोडाफेक अशा खेळांचे तांत्रिक प्रशिक्षण देत असतात. जिल्ह्यातून उत्तम आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत हेच स्वप्न असल्याची भावना प्रा. पाटील यांनी व्यक्त केली. यासाठीच मी मुलांना मैदानी खेळाचे बेसिक, फिटनेस, अचूक ॲक्शन कशी असावी, याचे प्रशिक्षण देतो. त्यांचा पाया मजबूत व्हावा, याकडेही लक्ष देतो. नंतर ते कोणत्याही खेळाकडे वळू शकतात, असेही प्रा. पाटील यांनी सांगितले. मैदानी खेळ हे माझे जीवन आहे. त्यामुळेच मी जास्त वेळ मैदानावर देतो, असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाची मैदानी स्पर्धा असो, शालेय जिल्हा, विभाग, राज्यस्तरीय मैदानी स्पर्धा असो किंवा कोणतीही क्रॉसकंट्री, मॅरेथॉन, खेळासाठी झपाटलेले प्रा. अतुल पाटील यांच्याशिवाय ती पूर्णच होत नाही. ते उपस्थित असल्याशिवाय या स्पर्धांना पूर्णत्वच येत नाही. ऊन, वारा, पाऊस, पहाट, सकाळ, सायंकाळ अशी कोणतीही वेळ असली तरी ते तेथे आवर्जुन उपस्थित असतात.

## अवैध दारूविक्री बंदीसाठी लोणार पोलिस ठाण्यावर एल्गार मोर्चा

**लोणार :** येवती येथे सुरू असलेली अवैध दारूविक्री बंद करावी, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज, दि. ७ जून रोजी लोणार पोलिस ठाण्यावर एल्गार मोर्चा काढण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव यांच्या नेतृत्वात हा एल्गार मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान अवैध दारूविक्रीच्या विरोधात घोषणा देण्यात आला. मोर्चा पोलिस ठाण्यावर पोहोचल्यानंतर ठाणेदार निमिष मेहेत्रे यांना निवेदन देण्यात आले. अवैध दारूविक्रीमुळे येवती गावातील अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळी या गावातील व तालुक्यातील अवैध दारूविक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. या एल्गार मोर्चात पक्षाचे शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, सुदन अंभोरे, शहर संघटक तानाजी मापारी, युवा सेना शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, अल्पसंख्यांक विभागाचे अशपाक खान, इकबाल कुरेशी, फहीम खान, सहभागी होत्या.

# नरसिंगपूरच्या वीर जवानाला साश्रू नयनांनी अखेरचा निरोप



■ महासागर प्रतिनिधी,
दर्यापूर, दि. ९ : तालुक्यातील नरसिंगपूर येथील वीर जवान ईश्वर रामेश्वर खडसे यांचा शुक्रवारी आसाम येथील सिलीगुडी येथे आकस्मिक मृत्यू झाला होता. सैन्य दलाचे जवान ईश्वर खडसे यांच्या पार्थिवासह नरसिंगपूर येथे पोहोचले. त्यावेळी वीर जवानाच्या पार्थिवावर रविवारी ८ जूनला शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करुन साश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला. भारत मातेच्या रक्षणासाठी १४ वर्षांपासून ईश्वर खडसे हे सैन्य दलात कार्यरत होते. ईश्वर यांचा शुक्रवारी सिलीगुडी येथे शासकीय निवासस्थानात आकस्मिक मृत्यू झाला. रविवारी वीर जवानाचे पार्थीव नरसिंगपूरातील निवासस्थानी पोहचले. या वेळी त्यांची आई, पत्नी, नातेवाईक यांनी हंबरडा फोडून अश्रूंना वाट मोकळी करून दिली. याक्षणी उपस्थितांचेही मन गहिवरले होते. पुष्पहाराने सजलेल्या शासकीय वाहनातून अंत्ययात्रा काढली. त्यानंतर सैन्य दलातील जवानांच्या तुकडीने ईश्वर खडसे यांच्या पार्थीवाला मानवंदना दिली. त्यानंतर ईश्वर यांचा चिरंजीव विक्रांत याने वीरपित्याच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. या वेळी एसडीओ राजेश्वर हांडे, तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडाजे, ठाणेदार सुनील वानखेडे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे विष्णू मोंढे, प्रशांत भड, जी.बी. कोळसक, भूतपूर्व सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष मनोहर सरदार , आठ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे सुभेदार सुशील कुमार, आमदार गजानन लवटे, नायब तहसीलदार प्रमोद काळे, मोहन बायसकार, नितेश वानखडे, साहेबराव वाकपांजर आदी उपस्थित होते.

# नगरपंचायतीचा २५ हजार वृक्षांच्या लागवडीचा संकल्प




**मारेगाव :** पर्यावरण दिनानिमित्त नगरपंचायत मारेगाव द्वारे लोकप्रतिनिधिंच्या उपस्थितीत वृक्षारोपण मोहिमेस सुरवात करण्यात आली. यादरम्यान ग्रामपंचायतीने संकल्प केला आहे. यातून शहरात विविध ठिकाणी जवळपास २५ हजार वृक्षांची लागवड करणार असून त्याचे संवर्धन करण्यात येणार आहे. नगरपंचायत आवारात वृक्षारोपण करून मोहिमेची सुरवात करण्यात आली. नगरपंचायतीने शहरात विविध ठिकाणी तब्बल २५ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. याप्रसंगी नगरपंचायतच्या उपाध्यक्षा हर्षा महाकुलकर, नगरसेविका छाया किनाके, नगरसेवक नंदेश्वर असुटकर, नगरसेवक हेमंत नरांजे, मुख्याधिकारी शशिकांत बाबर व नगरपंचायतीचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शहरास हरित करणे व पर्यावरणाचे संवर्धन करणे याकरिता नगरपंचायत लोकसहभागातून प्रयत्न करत आहे. नागरिकांनी देखील जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याकरिता सहकार्य करावे, तसेच लावलेल्या वृक्षाची आपल्या अपत्याप्रमाणे देखभाल देखील करावी असे आवाहन यानिमित्ताने मुख्याधिकारी यांनी समस्त शहरवासियांना केले.

# जिल्ह्यातील अंगोडात ४० पैकी २० घरात बैलजोड्या

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ९ : ग्रामीण भागात बैलांना शेतकऱ्यांचा खरा मित्र समजले जाते. ट्रॅक्टरचा वापर होत असला तरी अंगोडातील ४० पैकी २० घरांत बैलजोड्या आहेत. त्यांना विशेष सन्मान दिला जाते, त्यांचा वापर शेतीच्या कामासाठीच आम्ही करतो, अशी माहिती गावकरी गौरव पंडित यांनी दिली. या गावात बैलजोड्या सांभाळण्याची, त्यांची देखभाल, जतन करण्याची परंपरा राहिली आहे. शेतीसाठी ट्रॅक्टरचा वापर केला जात असला तरी या २०० लोकसंख्येच्या गावात ३ ट्रॅक्टर असून, त्यांचा वापरही बैलांना उन्हाळ्यात विश्रांती मिळावी म्हणून केला जातो, असेही पंडित यांनी सांगितले. वर्षभर बैलजोड्या शेतात राबतात त्यांनाही विश्रांतीची आवश्यकता असते. त्यामुळे आम्ही या बैलजोड्यांच वैरण, खुराक याकडे विशेष लक्ष देतो. या देखण्या बैलजोड्या कोणालाही आपल्याशा वाटतील, अशा आहेत. ज्यांच्याकडे बैलजोड्या नाहीत, त्यांना शेतीच्या



मशागतीसाठी दिवस ठरवून बैलजोडी दिली जाते. या बैलजोड्यांना गावात वाहतुकीसाठी वापरले जात नाही. एका बैलजोडीची किंमत ही १ लाखापेक्षा जास्त आहे. गावातील २० बैलजोडया म्हणजे प्रत्येकाच्या जीवाभावाचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांच्याकडे सर्वाचेच विशेष लक्ष असते. शहरापासून गाव जवळच असल्यामुळे त्यांना पशूंच्या दवाखान्यात आणणे किंवा पशू वैद्याला गावात बोलावून त्यांची नियमित तपाणी करणे, हे नित्याचेच आहे. विशेष बाब म्हणजे या बैलजोड्यांची घरातील सदस्यांप्रमाणेच काळजी घेतली जाते. त्यांना नियमितपणे चारा, पाणी दिले जाते. बरेचदा घरातील विशेष खाद्य पदार्थही या बैलजोड्या चवीने खातात. त्यांच्या स्वच्छतेकडेही प्रकर्षाने लक्ष दिले जाते. बैलजोड्यांना वर्षभर पुरेल इतपत चाऱ्याची सोय करून ठेवली जाते. कारण, एखादवेळी चाऱ्याची टंचाई भासू शकते. एकूणच अंगोडा गावाची या बैलजोड्या म्हणजे शान आहेत. म्हणूनच त्यांची सरबराई मनापासून गावकरी करतात.

## संत गाडगेबाबा विद्यापीठाद्वारे एक हजार वृक्षारोपण मोहिमेला सुरुवात

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यावर्षी पावसाळी हंगामात विद्यापीठ परिसरात एक हजारापेक्षा जास्त नवीन वृक्षांचे रोपण करणार आहे. विद्यापीठाचा निसर्गरम्य परिसर ४५० एकरमध्ये पसरलेला असून, सध्या येथे ४.५ लाखांहून अधिक वृक्ष डौलदारपणे उभे आहेत. ते बघता अमरावती शहराच्या पर्यावरण संवर्धनात विद्यापीठाचे मोठे योगदान मिळत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाला यापूर्वी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पाच नामांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी यावेळी नमूद केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात गुरूवार ५ जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कर्मचारी संघाचे अध्यक्ष अजय देशमुख, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उद्यान अधीक्षक अनिल घोम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# गरमागरम मुगडाळ भजी

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, आता प्रत्येकाला पावसाचे वेध लागले आहेत. रिमझिम पावसात गरमागरम भजीचा आस्वाद घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. हॉस्टेलमध्ये गप्पांचा फड जमवताना मस्त मूग डाळ भजी समोर असतील तर दोस्तांची मैफल छान रंगेल. मूग डाळ भजीची रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** अर्धा किलो मूग डाळ,चमचाभर आलं-लसूण पेस्ट, बारीक चिरलेली हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबिर, अर्धा टी स्पून चाट मसाला, एक चमचा गरम मसाला, चिमूटभर हिंग, मीठ आणि तेल.

**कृती:** मूग डाळ रात्रभर भिजत घाला. सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये रवाळ वाटून घ्या. एका भांड्यात काढून त्यात हिंग, गरम मसाला, चाट मसाला, आलं-लसूण पेस्ट, मिरचीचे तुकडे, कोथिंबिर आणि मीठ घालून नीट मिक्स करा. कढईत तेल गरम करा. भजीचं पीठ या तेलात हळूच सोडा. नीट तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# जोश

# सीएची तयारी सोडून रमला मसाला शेतीत

**अचिव्हर**

बिहारमधील मुझफ्फरपूरमधून एक अनोखी यशोगाथा समोर आली आहे. पारंपारिक शेतीपासून दूर जाऊन, एक तरुण मसाल्याच्या शेतीकडे वळला. सीएची तयारी सोडून त्याने शेती करण्याचा विचार केला. त्याच्या प्रयत्नांना फळ आलेले दिसत आहे. एवढेच नाही, तर तो जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा देत आहे. मुजफ्फरपूरमध्ये शेतीने प्रेरित होऊन विकास कुमार नावाच्या एका तरुणाने आपली सीएची तयारी सोडून मसाल्यांची शेती सुरु केली.



**सुरुवातीला त्रास**

विकास कुमारला सुरुवातीला अनेक अडचणी आल्या. हळूहळू त्याचे उत्पन्न वाढत गेले. सध्या तो दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये कमावत आहे. शेतीतून उत्पन्न वाढवण्यासाठी त्याने एक रोपवाटिकादेखील सुरु केली आहे. तिथून तो मसाल्याच्या पिकांच्या रोपांची विक्री करतो. विकास कुमार या कामावर खूप खूश आहे. तो म्हणतो, एवढी कमाई गावात कुटुंबासह राहण्यासाठी पुरेशी आहे. आता त्याची मोठ्या प्रमाणात मसाले वाढवण्याची तयारी सुरु आहे.

**मसाल्यांच्या पिकाने बदलले आयुष्य**

विकास कुमार मुशारी ब्लॉकमधील रोहुआ गावचा रहिवासी आहे. त्याने वाणिज्य शाखेत पदवी प्राप्त केली आहे. त्याचे स्वप्न सीए होण्याचे होते. वडील शेतकरी आहेत. शेती आणि बागकामातील त्यांचे समर्पण आणि कठोर परिश्रम पाहून विकास कुमारने आपला विचार बदलला. सीएची तयारी सोडून दिली. घरी शेती आणि बागकामाला प्रोत्साहन देण्यासाठी मसाल्यांवर संशोधन केले. रात्री झोपताना त्याच्या मनात मसाल्यांच्या शेतीचा विचार आला.

**मसाल्याच्या पिकांची रोपवाटिका**

विकास कुमार म्हणतो, त्याने पश्चिम बंगालमधून दालचिनी, वेलची, लवंग यासह सर्व प्रकारच्या मसाल्याच्या वनस्पती आणल्या आणि त्यांची लागवड करून त्याचे उत्पन्न वाढवले. मसाल्याची लागवड ही जिल्ह्यातील एक अनोखी गोष्ट आहे. जवळच्या शेतकऱ्यांना मसाल्याच्या शेतीबद्दल कळले तेव्हा तेही ते मागण्यासाठी येऊ लागले. मसाल्याच्या वनस्पतींची मागणी पाहून त्याने रोपवाटिका सुरु केली. आता दरमहा किमान १ ते १.५ लाख रुपये उत्पन्न आहे. उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

**गॅजेटच्या दुनियेत**

### गुगलचा 'एआय' चष्मा साधणार संवाद

'गुगल'ने त्यांच्या गुगल आय/ओ २०२५ या वार्षिक डेव्हलपर कॉन्फरन्समध्ये अनेक मोठ्या आणि आश्चर्यकारक घोषणा केल्या आहेत. या वेळी कंपनीचे संपूर्ण लक्ष 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' (एआय) वर होते. या परिषदेत सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे गुगलचे नवीन स्मार्ट चष्मे. ते 'अँड्रॉइड एक्सआर' तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या चष्म्यांमध्ये 'गुगल'चा शक्तिशाली 'जेमिनी एआय' वापरण्यात आला आहे. एका कार्यक्रमात 'स्मार्ट ग्लास'चे प्रदर्शन करण्यात आले. तिथे दोन गुगल प्रतिनिधी, एक हिंदी बोलणारा आणि दुसरा फारसी होते. कोणत्याही भाषेच्या अडथळ्याशिवाय ते संवाद साधू शकले. हे सर्व शक्य झाले ते चष्म्यातील 'एआय फीचर'मुळे. ते दोघांनाही संभाषण इंग्रजीत भाषांतरित करून समजण्यास मदत करत होते. म्हणजे आता संवादात भाषा अडथळा ठरणार नाहीत. हे चष्मे केवळ भाषांतरच करत नाहीत, तर वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरेदेखील देऊ शकतात. म्हणजे आता तुम्हाला काही माहिती हवी असेल तर फक्त प्रश्न विचारा. चष्मा तुम्हाला लगेच उत्तर देईल.




**टेक टॉक**

### अँड्रॉइड एक्सआर



या कार्यक्रमात 'गुगल'ने 'अँड्रॉइड एक्सआर प्लॅटफॉर्म'ची घोषणा केली. तो क्वालकॉम आणि सॅमसंगच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. या नवीन प्लॅटफॉर्मचा उद्देश स्मार्टफोनच्या पलीकडे जाऊन 'स्मार्ट ग्लासेस'सारख्या उपकरणांमध्येदेखील अँड्रॉइड अनुभव प्रदान करणे हा आहे. 'गुगल'च्या म्हणण्यानुसार प्रोजेक्ट मोहन अंतर्गत अँड्रॉइड एक्सआर या वर्षीच लाँच केला जाईल. कंपनीने 'स्मार्ट चष्म्या'च्या किंमतीबद्दल अद्याप कोणतीही माहिती दिलेली नसली तरी लवकरच त्याची किंमतदेखील उघड होईल.

**ॲप वर्ल्ड**

### 'मेटा'शी थेट स्पर्धा

'गुगल'चे हे पाऊल 'स्मार्ट ग्लासेस' आणि 'मेटाव्हर्स' सारख्या प्रकल्पांमध्ये आधीच सहभागी असलेल्या 'मेटा'शी थेट स्पर्धा मानले जात आहे. गुगल ग्लास आणि अँड्रॉइड एक्सआर दोन्ही प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांना एक नवीन डिजिटल अनुभव देण्याचा दावा करतात. या कार्यक्रमात 'गुगल'ने 'एचपी'च्या सहकार्याने 'गुगल बीम' हे नवीन व्हिडीओ कम्युनिकेशन डिव्हाइस सादर केले. याशिवाय 'गुगल मीट'मध्ये लाईव्ह ट्रान्सलेशनची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भाषांमधील लोक एकमेकांशी सहजपणे बोलू शकतील. एवढेच नाही तर कंपनीने व्हिडीओ जनरेशन प्लॅटफॉर्म व्हीओ ३ ची एक नवीन आवृत्ती देखील लाँच केली आहे. त्यात आता नेटिव्ह साउंड सपोर्ट असेल आणि व्हिडीओ बनवणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. कंपनीला फक्त स्मार्ट फोनपुरते मर्यादित राहायचे नाही.




# डेटा वाचवायचाय?

**टेक्नोहेल्थ**


हुशार युजर्स काही सोप्या पद्धतींचा अवलंब करतात. त्यामुळे इंटरनेटचा वापर कमी होऊनही त्यांचे काम सुरळीत होते. यासाठी प्रत्येक हुशार युजर पुढील ५ सोप्या आणि प्रभावी युक्त्या वापरतो.

**✻ ॲप्सना ऑटो-अपडेट होण्यापासून थांबवा**

अनेक ॲप्स तुमच्या नकळत बॅकग्राउंडमध्ये अपडेट होतात. त्यामुळे डेटा खूप लवकर खर्च होतो. हुशार युजर्स ऑटो-अपडेट्स बंद करतात आणि ते फक्त वाय-फायवरून अपडेट करण्यासाठी सेट करतात. यामुळे मोबाईल डेटाची बचत होईल आणि 'वाय-फाय'शी कनेक्ट झाल्यावर आवश्यक अपडेट्स मिळतील.

**✻ डेटा सदोदित सुरु ठेवू नका**

तुमचा फोन हवामान ॲप्स, सोशल मीडिया ॲप्स किंवा ईमेल सारख्या अनेक ॲप्सना न विचारता इंटरनेटशी कनेक्ट करत राहतो. हे सर्व बॅकग्राउंडमध्ये डेटा वापरत राहतात. अशा परिस्थितीत, तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही फोन सेटिंग्जमध्ये जाऊन या ॲप्सचा बॅकग्राउंड डेटा बंद करू शकता. त्यामुळे डेटा फक्त गरजेनुसार वापरला जातो.




**✻ व्हिडीओच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या**

बहुतेक ॲप्स आपोआप उच्च-गुणवत्तेचे व्हिडीओ प्ले करतात. त्यामुळे जास्त डेटा वापरला जातो; परंतु इंटरनेट योग्य प्रकार वापरणारे व्हिडीओची गुणवत्ता ४८० डीपीआय किंवा त्यापेक्षा कमी वर सेट करतात. युट्यूब, इंस्टाग्राम किंवा फेसबुकवरील व्हिडीओची गुणवत्ता मॅन्युअली कमी करता येते.

**✻ डेटा सेव्हर मोड चालू करा**

डेटा वाचवण्यासाठी तुम्ही तुमच्या फोनमध्ये 'डेटा सेव्हर मोड' देखील चालू ठेवू शकता. यामुळे फोन स्वतःच अनावश्यक ॲप्सना डेटा देण्यापासून थांबवतो. तुम्ही क्रोम ब्राउझर वापरत असाल, तर त्यात 'डेटा सेव्हिंग फीचर'देखील आहे. त्यामुळे 'वेबपेज' हलके होते आणि कमी डेटामध्ये लोड करते.

**✻ वाय-फायचा योग्य वापर**

मोफत वाय-फाय उपलब्ध असेल तर मोबाईल डेटा बंद करा आणि वाय-फायशी कनेक्ट व्हा.

# उन्हाळ्यात हे कपडे देतात थंडावा आणि आरामही !

**फॅशन पॅशन**

उन्हाळ्याच्या काळात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी, बहुतेक लोक घरीच राहणे पसंत करतात. या ऋतूतील कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी योग्य कपडे निवडणे खूप महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात घरी राहून, लोकांना हलके आणि जुने कपडे घालायला आवडते. अशा कपड्यांमध्ये कमी गरम होते.



**उन्हाळ्यासाठी पाच सर्वोत्तम कापड प्रकार**

**✻ कॉटन फॅब्रिक:** हे सर्वात प्रसिद्ध नैसर्गिक फॅब्रिकपैकी एक आहे. ते उन्हाळ्यासाठी सर्वोत्तम मानले जाते. कापसाच्या रोपात आढळणाऱ्या तंतुमय गोळ्यांपासून बनवलेले हे कापड घाम सहजपणे शोषण्यास मदत करते. सुती कापडामुळे तंतूंमधून हवा वाहू लागते. त्यामुळे शरीर थंड राहते. हे नैसर्गिक आणि हलके कापड उन्हाळ्यात घालण्यासाठी सर्वोत्तम आहे.

**✻ शीअर फॅब्रिक:** उन्हाळ्यात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या कापडांपैकी एक म्हणजे शीअर फॅब्रिक. हे पूर्णपणे सुती कापड आहे. इतर जड कापडांप्रमाणे, हे कापड उन्हाळ्यात तुमच्या शरीराला चिकटत नाही.

**✻ लिनन फॅब्रिक:** लिनन हे कपाशीच्या तंतूंपासून बनवलेले एक नैसर्गिक कापड आहे. हे जगातील सर्वात जुन्या कपड्यांपैकी एक मानले जाते. हे कापड सुती कापडापेक्षा मजबूत असते. तथापि, त्याची किंमत सुती कापडापेक्षा जास्त असते.


**✻ रायन रेयॉन:** हे उन्हाळ्यासाठी चांगले कापड आहे. त्याच्या कृत्रिम स्वरूपामुळे ते हलके असते आणि उष्ण हवामानात शरीराला चिकटत नाही. उन्हाळ्यात हे कापड घालण्यास खूप आरामदायी आहे.

**✻ शिफॉन कापड:** हे सर्व कापडांमध्ये सर्वात हलके आणि मऊ असते. स्टाईलचा विचार केला तर, शिफॉन फॅब्रिक तुमचा उन्हाळा अधिक आरामदायी बनवते. साडी, ब्लाउज, शर्ट, कुर्ती बनवण्यासाठी शिफॉन फॅब्रिक चांगले आहे.

# आईला नातं मान्य नाही

**मॅच मेकिंग**

मी २६ वर्षांची तरुणी असून उत्तम करीअर करते आहे. माझ्या वडिलांच्या मद्यपानाच्या व्यसनामुळे आई त्यांच्यापासून वेगळी झाली. तिनेच मला आणि बहिणीला वाढवलं. तारुण्यातही मला वाईट अनुभव आले. नोकरी लागल्यानंतर माझ्या आयुष्याला एक दिशा मिळाली. माझी आई आम्हा बहिणींची खूप काळजी करते. ती थोड्या जुन्या वळणाची आहे. मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर आईने माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरुवात केली. लग्नाला माझी ना नव्हती. पण तिने माझ्या पसंतीकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. तिला योग्य वाटणाऱ्या मुलाशी माझं लग्न लावून द्यायचं होतं. मधल्या काळात मी एका मुलाच्या प्रेमात पडले. दीड वर्ष एकत्र घालवल्यानंतर आईला याबद्दल सांगितलं. पण तिला हे नातं मान्य नाही. तो ख्रिश्चन आणि मी हिंदू आहे. त्यातच तो माझ्यापेक्षा सहा महिन्यांनी लहान आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे तो माझ्यासाठी योग्य नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती माझा मानसिक आणि शारीरिक छळ करते आहे. माझ्यासाठी तोच योग्य असल्याचं अनेकदा समजावूनही ती ऐकत नाही. आमचं नेहमी भांडण होतं. मी काय करू?



**उत्तर :** आईने तुम्हा दोघा बहिणींना एकटीने वाढवलं. त्यामुळे तिला तुमची खूप काळजी वाटते. तिच्याप्रमाणे तुझं आयुष्य उध्वस्त होऊ नये, असंही तिला वाटत असावं. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या बाबतीत ती खूपच जपून पावलं टाकत आहे. महत्त्वाचं म्हणजे या मुलाबद्दल तुला खात्री वाटते का, तो तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा आदर करेल का, याचा विचार कर. आईशी मनमोकळा संवाद साध. या नात्याला तिचा का नकार आहे, हे जाणून घे. हा मुलगा कसा योग्य आहे हे तिला पटवून दे. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घेता येईल.



# आवर्जून पाहा 'ही' ठिकाणे

**भटकंती**

राजस्थान शाही वारशासाठी, भव्य किल्ल्यांसाठी आणि वाळवंटासाठी जगभर प्रसिद्ध आहे. पण येथील तलाव स्वर्गापेक्षा कमी नाहीत. दरवर्षी लाखो देशी तसेच परदेशी पर्यटक केवळ किल्ले आणि राजवाडे पाहण्यासाठीच नव्हे तर येथील तलावांच्या सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी येतात. येथील किल्ल्यांसोबतच सुंदर तलावही लोकांना आकर्षित करतात. राजस्थानमधील उदयपूर जिल्ह्याला तलावांचे शहर म्हटले जाते. या ठिकाणचे तलाव अवश्य पाहा

**✻ पिछोला तलाव**

पिछोला तलाव राजस्थानातील उदयपूर जिल्ह्यात आहे. हा तलाव उदयपूरच्या सौंदर्याचा आणि ऐतिहासिक वारश्याचा महत्त्वाचा भाग आहे. उदयपूर शहराच्या मध्यभागी असलेला हा तलाव अरवली पर्वतरांगांनी वेढलेला आहे. त्यामुळे त्याचे नैसर्गिक सौंदर्य आणखी खुलते. त्याच्या सभोवतालचे टेकड्या, राजवाडे आणि घाट खूपच आकर्षक दिसतात. पर्यटकांसाठी या तलावात बोटिंगची सुविधा आहे. सूर्यास्ताच्या वेळची बोट सफर विशेष लोकप्रिय आहे. इथे बोटीतून प्रवास करण्याची मजा वेगळीच असते. हा तलाव अंदाजे ६.९६ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेला आहे. तलाव परिसरात किंगफिशर, इग्रेट्स, टर्न्स, कूट आणि बगळे असे विविध प्रजातींचे पक्षी आढळतात. त्यामुळे पक्षी निरीक्षकांसाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. पिछोला तलावाच्या मध्यभागी चार बेटे आहेत. जग मंदिर हे तलावाच्या मध्यभागी बांधलेले आहे. २०१९ पासून उदयपूरमध्ये मुंबई आणि गोवाच्या धर्तीवर क्रूझ सेवा सुरू झाली आहे. तलावाच्या काठावर सिटी पॅलेस, बागोर की हवेली आणि इतर ऐतिहासिक इमारती आहेत. त्या पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात.

**✻ फतेहसागर तलाव**

उदयपूरच्या 'लेक सिटी' या नावाला सार्थ ठरवणारा फतेहसागर हा तलाव पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. अरवली टेकड्यांनी वेढलेला हा तलाव शांत वातावरणासाठी खूप प्रसिद्ध आहे. येथे भेट देण्यासाठी दूरदूरहून पर्यटक येतात. फतेहसागर तलाव बोटिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. सुमारे चार चौरस किलोमीटर क्षेत्रावर हा तलाव पसरलेला आहे. हा तलाव प्रामुख्याने पाणीपुरवठा आणि शेतीसाठी बांधला गेला. परंतु आता तो पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. तलावाच्या काठावरील रस्त्यावर ड्राइव्ह करणे किंवा सायकलिंग करणे यात वेगळी मजा आहे. हा रस्ता स्थानिकांमध्ये 'फतेहसागर ड्राइव्ह' म्हणून ओळखला जातो.

# कमी गुणांची काळजी नको

**वेगळ्या वाटा**

बारावी तसंच पदवी परीक्षेत कमी गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांचा चांगलाच हिरमोड होतो. अशावेळी आपल्या आवडीनिवडींना मुरड घालावी लागते. वेगळे अभ्यासक्रम निवडावे लागतात. काही तडजोडी कराव्या लागतात. पण मित्रांनो, कमी गुण मिळाले म्हणून निराश होण्याची आवश्यकता नाही. आज करीअरचे अनेक मार्ग तुमच्यापुढे आहेत. आपली गुणवत्ता, आवड, कौशल्यं या बाबींचा विचार करून योग्य अभ्यासक्रमाची निवड तुम्ही करू शकता.




✻ पदवीला प्रवेश घेण्याऐवजी पॉलिटेक्निक डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. यासोबतच इंटिरिअर डेकोरेशन, एअरलाईन क्रू ट्रेनिंग, मास कम्युनिकेशन अँड व्हिडिओ प्रॉडक्शन, ट्रॅव्हल अँड टूरिझम मॅनेजमेंट, फॅशन टेक्नॉलॉजी, इव्हेंट मॅनेजमेंट, टेक्सटाईल ग्राफिक डिझाइन यांसारख्या विषयांशी संबंधित डिप्लोमा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

✻ पब्लिक रिलेशन्स, कलिनरी आर्टस,ॲडव्हेंचर स्पोर्टस, फिटनेस ट्रेनिंग, वेब डिझायनिंग, व्हिडिओ एडिटिंग, टूर गाईड, सोशल मीडिया मार्केटिंग, ई-कॉमर्स, फॅशन स्टायलिंग, इव्हेंट मॅनेजमेंटसारख्या क्षेत्रांमध्येही अनेक संधी आहेत.

✻ आवडत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही तर तुम्ही दूरस्थ शिक्षण पद्धतीने पदवी मिळवू शकता. बरीच विद्यापीठं ही सुविधा उपलब्ध करून देतात.

✻ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी वेगळ्या प्रवेश परीक्षा असतात.

# पीओपी गणेश मूर्तीवरील बंदी न्यायालयाकडून रद्दबातल





■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिस (ढडढ) गणेश मूर्ती तयार करण्यावरील आणि विक्री करण्यावरील बंदी उठवली आहे.

या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावांमध्येच करण्याची सक्ती कायम राहणार असून, नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जनास सक्त मनाई करण्यात आली आहे.

न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान, मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी दिली जाणार नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ञ समितीनेही हीच शिफारस केली होती, त्यानुसार पीओपी मूर्ती केवळ कृत्रिम जलसाठ्यातच विसर्जित करता येतील.

उच्च न्यायालयाने राज्य सरकारला पुढील तीन आठवड्यांत एक समिती नेमून पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातील, यावर सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या अहवालात विसर्जनासाठीच्या पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापनाविषयीची माहिती असणे अपेक्षित आहे.

या निर्णयामुळे आता घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवासाठी पीओपी मूर्ती साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी कृत्रिम तलावांमध्येच विसर्जन करण्याच्या अटीचे पालन अनिवार्य राहील. यामुळे ज्या मूतीर्कारांनी आधीच पीओपी मूर्ती तयार करण्यास सुरुवात केली होती, त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सांगितले की, ते कोणत्याही पीओपी मूतीर्चे नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ञ समितीने शिफारस केली आहे की, पीओपी मूर्ती तयार करता येतील. परंतु नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जित करता येणार नाहीत. सीपीसीबी समितीने असे म्हटले आहे की, अशा मूर्ती फक्त कृत्रिम जलसाठ्यात विसर्जित केल्या जाऊ शकतात.

पीओपी बनवलेल्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत आता राज्य सरकारला विवेकबुद्धी वापरावी लागेल आणि निर्णय घ्यावा लागेल, असे खंडपीठाने म्हटले आहे.

## १४ जूनपर्यंत तापमानात वाढ कायमच : तूर्त पाऊस अपेक्षित नसल्याचा इशारा

# पेरणीची लगबग नको

## कृषी खात्याचे शेतकऱ्यांनाआवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
मागील दोन आठवड्यांपासून राज्यातील मान्सूनचा प्रवास थांबला आहे. ही स्थिती १४ जूनपर्यंत अशीच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी व लागवडीची कोणतीही घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी खात्याने केले आहे.

मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यानंतर राज्यातील बहुतांश भागांत मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे यंदा वेळेवर पेरण्या होतील असा दावा केला जात होता. पण त्यानंतर पावसाने अचानक ओढ दिली. यामुळे शेतकरी पावसासाठी आकाशाकडे डोळे लावून बसलेत. या पार्श्वभूमीवर कृषी खात्याने शेतकऱ्यांना पेरणीसाठी कोणतीही घाई न करण्याचे आवाहन केले आहे.

कृषी खात्याच्या माहितीनुसार, मागील जवळपास दोन आठवड्यापासून राज्यातील मान्सूनचा प्रवास पूर्णपणे थांबल्यासारखा झाला आहे. किमान 14 जूनपर्यंत अशीच स्थिती राहण्याची शक्यता आहे. प्रादेशिक हवामान खात्याने



१४ जूनपर्यंत पश्चिम किनारपट्टी वगळता राज्यातील विविध भागांमधील तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तवला आहे. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कमाल तापमान अधिक राहण्याचा अंदाज आहे. या दरम्यान पूर्व विदर्भात कमाल तापमानात अजून वाढ होऊन ते ४५ अंशापर्यंत जाण्याचा अंदाज आहे, तर विदर्भातील बऱ्याच भागात कमाल तापमान ४० अंश तसेच त्यापेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज आहे.

मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागात कमाल तापमान ४० अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज देखील आहे. १४ जूनपर्यंत राज्यात सार्वत्रिक आणि मान्सूनचा पाऊस अपेक्षित नाही.

पाऊस हा प्रामुख्याने दुपारनंतर आणि मेघ गर्जनेसह काही भागातच पडेल. याची शक्यता या आठवड्याच्या सुरुवातीला दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य-महाराष्ट्रात अधिक राहील. तुलनेत राज्यातील इतर भागात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. या दरम्यान कमाल तापमान अधिक राहणार असल्यामुळे आणि सार्वत्रिक मान्सूनचा पाऊस अपेक्षित नसल्यामुळे शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाच्यावतिने करण्यात आले आहे.

## आठवडाभरात तिसरी हत्या

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ :
जिल्ह्यात खुनाचे सत्र सातत्याने सुरू असल्याने नागरिकांत दहशत पसरली आहे. मंगळवारी आणि शुक्रवारी यवतमाळ शहरात पूर्व वैमनस्यातून दोन खून झाले. या खुनाची शाई वाळते न वाळते तोच उमरखेडमध्ये रविवारी रात्री एका तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला.

शेख अजहर शेख अकबर (२७, रा. अब्दुल रहमान कॉलनी, उमरखेड) असे मृताचे नाव आहे. उमरखेड शहरातील आठवडी बाजार परिसरात रविवारी मध्यरात्री दोन गटांमध्ये भीषण हाणामारी झाली. या चकमकीत तलवार, चाकू, लोखंडी रॉडने सपासप हल्ला करून शेख अजहर शेख अकबर या युवकाचा खून करण्यात आला. या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात पाच आरोपींच्या विरोधात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आणखी तीन ते चार संशयितांचा शोध सुरु आहे.

शेख अजहर शेख अकबर हा मजुरीचे काम करत होता. मृताचा मोठा भाऊ शेख खालीद शेख अकबर (३५), याने पोलिसात भावाच्या खुनाची तक्रार दाखल केली. ताजपुरा वॉर्डात संध्याकाळी दोन गटांत वाद झाला होता. त्याचेच पर्यवसान मध्यरात्री आठवडी बाजार परिसरात पुन्हा एकदा गटगटातल्या हाणामारीत झाले. या प्रकरणी आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

## निवडणुकीतील आश्वासनांचे काय झाले?

### हर्षवर्धन सपकाळ यांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :
मोदी सरकारचा कारभार म्हणजे बोलाचीच कढी बोलाचाच भात'अशी स्थिती आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे माध्यमांशी बोलताना केली.

हॅपी इंडेक्स, बेरोजगार, गरीब गरीब का झाला, २०१४ मध्ये २ कोटी नोकऱ्या देऊ, शेतकरी उत्पन्न दुप्पट करू, स्वामीनाथन आयोग, स्मार्ट सिटी, या पलीकडे जाऊन प्रत्येक माणसाच्या खिशात १५ लाख देणार याचा लेखाजोखा दिला पाहिजे असे सपकाळ म्हणाले.

अण्णा हजारे, बाबा रामदेव यांनी पेट्रोल दर, लोकपाल यांचे काय झाले याचे उत्तर दिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेने अहवाल दिला, त्यात हेट स्पीच म्हणून मोदींच नाव आहे. ऑपरेशन सिंदूर नंतरचा लेखा जोखा, अदानी अंबानी यांची संपत्ती किती वाढली हेही सांगायला पाहिजे असे ते म्हणाले. राष्ट्रवादी एकत्री करणाबाबत काय निर्णय घ्यायचा हा दोन्ही राष्ट्रवादीचा प्रश्न आहे. येतील त्यांना सोबत घेऊन जाऊ. ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याबद्दल तेच चांगल्या पद्धतीने सांगतील.

शेतकरी मुद्दे आहे, पीक कर्ज, पीक कर्ज माफी, संदर्भात कुठलाही निर्णय झालेला नाही. बी बियाण्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपये दिले गेले पाहिजे. या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हे सगळे सुरू आहे, असा पलटवार सपकाळ यांनी केला.आम्ही निर्णय घेतलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्थानिक पातळीवर आमचे नेते आणि संघटितपणे निर्णय घेतील, ते आम्ही कळवले सुद्धा आहे. किरण कुलकर्णीची नार्को टेस्ट करायला हवी. मतांवर डल्ला मारला त्याचे सूत्रधार हे कुलकर्णी आहेत.

संध्याकाळी सहा नंतर ७४ लाख मतदान कसे वाढले, हे ओपन सिक्रेट आहे.निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार अगोदर सुद्धा केलेली आहे. निवडणूक आयोग अमित शहा यांच्या सूचनेनुसार काम करीत असल्याचे स्पष्ट होत आहे, अशी टीका सुद्धा हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

# अंतिम लकी ड्रॉ १० जून रोजी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :
महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा तिसरा व अंतिम लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने १० जून २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे.

प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे.

७ एप्रिल व ७ मे रोजीच्या पहिल्या व दुसऱ्या लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले आहे. महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणा?या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे.

१ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरणाऱ्या सर्व लघुदाब वीज ग्राहकांना या योजनेचा फायदा होणार आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी १ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या mahadiscom.in याअधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ?पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे.

ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

## : हॅलो डॉक्टर :

# नेत्रदान एक आशेचा किरण



लोकारोग्य

आपल्या शारीरिक व्याधींवर मात करण्यासाठी विविध प्रकारच्या शारीरिक अवयवांचं दान हल्ली मोठ्या प्रमाणात केले जाते. यामध्ये शरीराचा अत्यंत महत्वाचा भाग ज्याने आपण हि सृष्टी पाहू शकतो असे नेत्र दान अत्यंत महत्वाचे मानले गेले आहे. मृत व्यक्तीचे नेत्रदान केल्याने अनेंक अंध व्यक्तींना दृष्टी मिळून ते हे जग त्या मृत व्यक्तीच्या डोळ्याने पुन्हा पाहू शकतात. परंतु नेत्रदानाविषयी आपल्याकडे अद्यापही पाहिजे तितक्या प्रमाणात जनजागृती झालेली नाही. म्हणूनच, नेत्रदान म्हणजे नेमकं काय? नेत्रदानाचे महत्व काय आहे? नेत्रदान कोण आणि केंव्हा करू शकतो? या सर्व प्रश्नांचा वेध घेण्यासाठी नेत्रतज्ज्ञ डॉक्टर अभय आगाशे यांच्याशी साधलेला संवाद.

**आपल्या डोळ्यांची रचना कशी असते?**

■ आपल्या डोळ्याची रचना हि अगदी साधी असते. समोरचा सफेद रंगाचा भाग म्हणजे आपले बुबुळ असते. मधला पिवळा भाग म्हणजे रेटिना आणि मागच्या बाजूला ओप्टिव्ह नर्व्ह असते. बाहेरचा प्रकाश हा परावर्तित होऊन रेटिना पर्यंत पोहचतो. नंतर इलेक्ट्रिक सेन्समध्ये परावर्तित होऊन तो आपल्या मेंदूपर्यंत पोहचतो आणि आपण पाहू शकतो.

आपले बुबुळ हे अगदी संवेदनशील असते त्याला इजा पोहचली तर दृष्टी जाते. मात्र नेत्रदानामध्ये बुबुळाचा हाच सफेद भाग काढून तो दुसऱ्या व्यक्तीला परावर्तित करून त्याला दृष्टी मिळू शकते. नेत्रदानामध्ये केवळ बुबुळाचा हा भाग किंवा संपूर्ण डोळा कट करून तो दुसऱ्याला लावू शकतो. फक्त मृत व्यक्तीचे डोळे काढताना त्या व्यक्तीचे वय, आजार लक्षात घेऊन हि प्रक्रिया केली जाते.

**मरणोप्रांत नेत्रदान साधारण किती तासात करता येते?**

■ एखाद्याने अगोदर नेत्रदानाकरिता नोंदणीकरण केलेलं असेल किंवा नसेल तरीही त्या मृत व्यक्तीच्या मृत्यूपश्चात ६ तासांच्या आत डोळे काढता येतात. नेत्रदाना करीत सर्व शासकीय महाविद्यालय,रुग्णालय आणि नेत्रपेढ्यांमध्ये प्रतिज्ञापत्र उपलब्ध असते.

व्यक्ती मृत झाल्यानंतर त्याचे नातेवाईक आप्तस्वकीय देखील नेत्रदानाचा निर्णय घेऊ शकतात. फक्त मृत व्यक्तीचे डोळे बंद करावेत. त्याच्या डोक्याखाली उशी ठेवावी आणि आजूबाजूला पंखे किंवा एसी असेल तर तो बंद ठेवावा ज्यामुळे ते डोळे सूकत नाहीत हि काळजी घ्यावी.

**नेत्रदान कोण कोण करू शकतो?**

कोणतीही मृत व्यक्ती अगदी १८ वर्षांच्या तरुणांपासून ते ८० वर्षांच्या वृद्धापर्यंत कुणीही नेत्रदान करू शकतो. फक्त काही व्यक्ती ज्यांच्या संपूर्ण शरीरात काही कारणामुळे एखाद्या आजारामुळे संसर्ग पसरलेला असेल,ज्या व्यक्तीला मॅनिन्जायटिस म्हणजे मेंदूचा विकार असेल अशी व्यक्ती किंवा कावीळ झालेली व्यक्ती असेल आणि कोरोना झालेल्या व्यक्तीच फक्त नेत्रदान करू शकत नाही. अन्यथा मधुमेह प्रमाणत असलेल्या व्यक्ती,उच्चरक्तदाब असलेल्या व्यक्ती, अगदी कर्करोग झालेल्या व्यक्ती देखील नेत्रदान करू शकतात.

**नेत्रदान करताना काही चाचण्या असतात का?आणि नेत्रदानाची प्रक्रिया साधारण किती वेळेत पूर्ण होते?**

■ नेत्रदान करण्यासाठी चाचण्या नसतात. आपल्या डोळ्यांच्या बुबुळाला रक्तपुरवठा होत नसतो त्यामुळे कोणत्याही रक्तगटाचे व्यक्ती नेत्रदान करू शकतात.एखाद्या तरुण मृत व्यक्तीचे डोळेच साधारण पने सशक्त असल्यामुळे ते अंध व्यक्तीला लावले जातात.

नेत्रदानाची प्रक्रिया हि १५ ते २ मिनिटांची असते. आणि ज्या व्यक्तीला डोळ्यांचं दान दिलेले आहे हि, शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्याला दोन दिवसात घरी पाठवले जाते.हे डोळे दुसऱ्यांचे असल्याने त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आणि डोळ्यांचा संसर्ग टाळण्यासाठी त्यांना औषध आणि काही ट्यूब डोळ्यात टाकण्यासाठी आम्ही देतो. मात्र त्यांना सतत फॉलो अप करिता आम्ही बोलवतो.

■ ■ ■



लठ्ठपणा हा भारतीय स्त्रियांमध्ये वेगाने एक अबोल महामारी बनत आहे. जीवनशैलीतील बदल, उच्च तणावाचे वातावरण आणि बसून काम करणाऱ्या दिनचर्या चिंताजनक प्रवृत्तींना कारणीभूत ठरणाऱ्या शहरी भागांमध्ये दिसून येत आहे.

इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रॉडक्शन ने समर्थन पुरविलेल्या इंडियन जर्नल ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनोकॉलॉजी रिसर्च मध्ये नुकत्याच प्रकाशित केल्या गेलेल्या एका पेपरमध्ये दक्षिण आशियाई स्त्रियांमध्ये मुख्य लठ्ठपणाचे प्रमाण असंतुलितरित्या जास्त असल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

35 ते 49 वय असलेल्या सुमारे 50% भारतीय स्त्रिया आता वजन जास्त असणे किंवा लठ्ठपणा यांच्यासोबत आयुष्य जगत आहेत. हे त्यांच्या प्रजनन काळात सार्वजनिक आरोग्याची वाढती चिंता ठळक करून दाखवत आहे. असेही लक्षात आणून दिले गेले आले आहे की, 18-30 वय असलेल्या स्त्रिया तेवढेच वय असलेल्या पुरुषांच्या तुलनेत जास्त दराने लठ्ठपणाशी संबंधित आरोग्याच्या जोखमींप्रती असुरक्षित असल्याचे दर्शवित आहेत आणि हे पिढ्यानपिढ्या पसरलेल्या संकटाचा मुद्दा मांडत आहे.

एन.एफ.एच.एस-5 च्या आकडेवारीनुसार, भारतातील 33.5% शहरी स्त्रिया आणि 19.7% ग्रामीण स्त्रिया लठ्ठ असून आयुष्य जगत आहेत आणि जीवनशैलीतील बदल, तणाव आणि बसून काम करणाऱ्या सवयी या वाढीस कारणीभूत आहेत. आहार घेण्याच्या सवयी खराब असणे, शारीरिक हालचाली कमी करणे आणि पी.सी.ओ.एस व गर्भावस्थेतील मधुमेहासारख्या चयापचय विकारांचे प्रमाण वाढणे, यांच्यातील दुव्यावर अहवालात भर देण्यात आला आहे आणि त्यात लठ्ठपणाने ग्रस्त 23.1% स्त्रियांना गरोदरपणात गर्भावस्थेतील मधुमेह होतो आणि त्यामुळे माता व बाळ दोघांनाही धोका निर्माण होतो.संततीला नवजात आय.सी.यू मध्ये दाखल करण्याची आणि दीर्घकालीन आरोग्याच्या समस्यांचा तोंड देण्याची शक्यता जास्त होते. ■ ■

## सत्वयुक्त अंबाडी



जागतिक आरोग्य संघटनेनं लोकांना कोरोना काळात आपल्या आहारावर विशेष लक्ष द्यावं, असा सल्ला दिला आहे. जे लोक संतुलित आहार घेतात त्यांची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असते, पालेभाज्यांचे महत्व व त्यांचे पोषण मूल्य सर्वज्ञानीत आहे.अंबाडी ही भारतात आढळणारी एक बहुगुणी औषधी वनस्पती आहे. जी पालेभाज्यांच्या प्रकारामध्ये मोडते. आंबट चवीची अंबाडीची भाजी ही चविष्ट तर असतेच शिवाय अनेक पोषकतत्त्वांनीही परिपूर्ण असते. यात टेट्राहायड्रोकॅनॉनिबॉल (टीएचसी) या रसायनाचे प्रमाण जास्त असते. त्यात ओमेगा ३ व ओमेगा ६ ही मेदाम्ले भरपूर प्रमाणात असतात. मानवी शरीरासाठी आवश्यक ते गुणधर्म अंबाडीच्या पानांमध्ये असते. अंबाडीच्या भाजीत आयर्न(लोह), व्हिटॅमिन-उ, व्हिटॅमिन-अ, व्हिटॅमिन-इ6, फोलेट, कॅल्शियम, झिंक आणि अँटीऑक्सिडंटसारखे अनेक पोषकतत्वे भरपूर प्रमाणात असतात. भरपूर क जीवनसत्व असणाऱ्या अंबाडीच्या भाजीत १८ ते २० टक्के तेलाचे प्रमाण असतेएस्कॉर्बिक ॲसिड म्हणजेच व्हिटॅमिन सी हा घटक रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्यात आणि शरीरातील पांढऱ्या रक्त पेशींची संख्या वाढविण्यात मोठी भूमिका बजावते. अंबाडीची भाजी उच्च रक्तदाब कमी करून नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. अंबाडी भाजीत अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात त्यामुळे कोलेस्टेरॉल कमी होते व रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते.अंबाडी भाजीतील फायबर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी मदत करतो. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre

# शास्त्रज्ञांच्या माध्यमातून शेती तंत्रज्ञान समजून घ्या



## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ९ :
विकसित कृषी संकल्प अभियान शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यामधील संवाद अधिक बळकट करण्याकरिता मोहिम राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यापीठ आणि कृषी शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले विविध संशोधन, तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत अधिक जलद गतीने पोहोचविण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन संशोधनाला नवीन दिशा मिळणार आहे. त्याचा लाभ शेतकरी बांधवानी घ्यावा, असे आवाहन आयुष्य राज्यमंत्री व आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियानाच्या आयोजित कार्यक्रमात प्रतापराव जाधव बोलत होते.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे, कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, तहसीलदार संतोष काकडे, कृषि विज्ञान केंद्राच्या डॉ. भारती तिजारे (कृषिविद्या विभाग), डॉ. वाडकर (विस्तार शिक्षण), केळवद येथील प्रगतशील शेतकरी प्रतापराव पाटील आणि शेतकरी उपस्थित होते.

जाधव म्हणाले की, महाराष्ट्रात आणि भारतामध्ये सुरू असलेल्या विकसित कृषी संकल्प अभियानाची माहिती देत शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यामधील संवाद अधिक बळकट करण्याकरिता हे अभियान असल्याचे सांगितले. शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे. मृदा परीक्षण, मृदा आरोग्य पत्रिकेचे वाचन, बियाण्यांची निवड, खतांचा योग्य वापर, लागवड पद्धती, शेतीमधील नवीन तंत्रज्ञान जसे ड्रोनचा फवारणीसाठी वापर, रासायनिक कीटकनाशकांच्या ऐवजी जैविक कीटकनाशक व बुरशीनाशकांचा वापर शेतीमध्ये करावा, असेही त्यांनी सांगितले.

कृषी विज्ञान केंद्रात दरवर्षी खरीप आणि रब्बी हंगामामध्ये पिकांचे प्रात्यक्षिक लावले जाते. या प्रात्यक्षिकामध्ये खरीप हंगामातील आणि रब्बी हंगामातील पिकांच्या विविध जातींची लागवड करून शेतकऱ्यांना माहिती मिळावी, असा त्याचा उद्देश असतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी या कृषी विज्ञान केंद्राला खरीप आणि रब्बी हंगामामध्ये भेट देऊन त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या वानांची माहिती आवर्जून घ्यावी आणि या केंद्राकडे उपलब्ध असलेले तंत्रज्ञान समजून घेऊन कमी खर्चामध्ये अधिक फायद्याची, नफ्याची शेती कशी करता येईल यांचे तंत्र शास्त्रज्ञांकडून समजावून घ्यावे, असे आवाहनही ना. प्रतापराव जाधव यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. मान्यवरांनी कृषि विज्ञान केंद्र, कृषी विभाग, बुलढाणाच्या वतीने जैविक निविष्ठा, वाचन साहित्य आणि बीजप्रक्रिया प्रात्यक्षिकाचे आयोजन केलेल्या दालनाची पाहणी केली.

प्रास्ताविक कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. अमोल झापे यांनी केले. यावेळी त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेले तंत्रज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून शेतकऱ्यांनी अवगत करून घ्यावे. जेणेकरून कमी खर्चामध्ये उत्तम उत्पादन देणारी शेती करता येईल आणि नफ्याची शेती शेतकरी करू शकतील. या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कृषी महाविद्यालय, बुलढाणा, कृषी विभाग आणि आत्मा, बुलढाणा यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या अभियानामध्ये शेतकरी सक्रियतेने सहभाग घेत असून शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाची माहिती घेत असल्याबाबत सांगितले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांनी कृषी विभागाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांनी ऑनलाइन पद्धतीने या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ती नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन केले. कृषि विज्ञान केंद्राच्या ठिकाणी सातत्याने भेट देऊन नवीन तंत्रज्ञान अवगत करून घ्यावे, जेणेकरून शेती करणे फायद्याचे होईल, असेही त्यांनी सांगितले.

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सायन्स नागपूर या संस्थेच्या वतीने डॉ. निर्मल कुमार यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षण, बीज आणि खत व्यवस्थापन, ओलीत व्यवस्थापन आणि जमिनीच्या सुपीकतेचे व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले. कृषी सखी सौ. वंदना टेकाळे यांनी विविध प्रक्रिया उद्योगाबाबत माहिती दिली. योगेश सरोदे यांनी संचालन करून आभार मानले.

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १०, जुन २०२५ ■

# मित्राची दगडाने ठेचून हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

कचरा वेचून उदरनिर्वाह चालवायचा आणि फुटपाथवर रात्र काढायची. त्यांच्यासोबत एक महिलाही होती. त्या महिलेवर दोघेही हक्क सांगायचे. यातूनच वाद विकोपाला गेला. ती केवळ माझी आहे, असे म्हणत एका मित्राने दुसऱ्याची दगडाने ठेचून हत्या केली. ही थरार घटना रविवारी रात्री तहसील ठाण्यांतर्गत घडली. अण्णा ऊर्फ शैलेष हिरालाल सडाक (40) असे मृताचे नाव आहे.

याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शुभांगी देशमुख यांच्या नेतृत्वातील पथकाने केवळ तीन तासांत या गुन्ह्याचा छडा लावला आणि आरोपीला अटक केली. अनुराग ऊर्फ घोडा सुनील बोरकर (33) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. अण्णा हा मूळचा सिहोर (मध्यप्रदेश) येथील रहिवासी आहे. सात वर्षांपासून तो नागपुरात फुटपाथवर राहतो. आरोपी अनुराग हा मूळचा शांतीनगरचा रहिवासी आहे. तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. त्यामुळे कुटुंबीयांनी त्याला घरबाहेर काढले आहे. अनेक वर्षांपासून तो फुटपाथवर राहतो. अण्णाही त्याच्यासोबतच राहतो. दोघेही कचरा वेचून आपला उदरनिर्वाह चालवत होते. या दरम्यान ते एका निराधार महिलेच्या संपर्कात आले. ती महिलाही त्यांच्यासोबतच राहू लागली. सांगण्यात येते की, महिलेची दोघांसोबतही जवळीक होती. महिलेला अनुरागपासून एक 3 वर्षांचा मुलगा आहे. मात्र, त्याला नाव अण्णाने दिले होते.

# कामठी मतदार संघात बोगस मतदाराची नोंदणी

## राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केलेले आरोप खरे : सुरेश भोयर




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेता व लोकसभेचे विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकी झाल्या. या निवडणूकीमध्ये निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणात मतदार यादीत हेराफेरी केली. संपूर्ण महाराष्ट्राच्या मतदार यादीमध्ये बोगस मतदार समाविष्ट करण्यात आले. ऑनलाईनच्या नावावर मोठ्या प्रमाणात कोणत्याही प्रकारची कागदपत्रे न पाहता मतदार समाविष्ट करण्यात आले. राहुल गांधी यांनी महाराष्ट्राची मतदाराची माहिती देतांना उदाहरण दिले की, कामठी मतदार संघामध्ये ३५ हजार मतदार वाढल्याची माहिती त्यांनी दिली. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर जे आरोप केले ते तत्थ्य व खरे आहेत. त्यांची माहिती कामठी मतदार संघात काँग्रेस पक्षाचा व महाविकास आघाडीचा उमेदवार होतो.

या मतदार संघामध्ये बोगस मतदान कशाप्रकारे निवडणूक आयोगाकडून करण्यात आले त्याची संपूर्ण माहिती अशी माहिती सुरेश भोयर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये ज्या निवडणूकी झाल्या त्यामध्ये कामठी मतदार संघामध्ये ४,६६,२३१ मतदार होते. त्यानंतर ६ महिण्याने विधानसभेच्या निवडणूकी झाल्या. तेंव्हा ५,०१,७७० मतदारांची संख्या झाली. या कालावधीत ३५,५३९ मतदार संख्यामध्ये वाढ झाली. ही वाढ कशा पद्धतीने केली ही माहिती निवडणूक आयोगाला माहित आहे. २९/१०/२०२४ जिल्हाधिकारी, नागपूर यांनी विधानसभेची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली, तेंव्हा कामठी मतदार संघातील मतदार संख्या २३,००० वाढ झाली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने २९/१०/२०२४ रोजी मतदाराची संख्या ४,८८,००० होती. अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ऑनलाईन प्रसिद्धीने दि. ३०/१०/२०२४ पासून ते मतदानाच्या ३ दिवसाअगोदर पर्यंत १२,००० वर मतदार संख्येमध्ये वाढ झाली. म्हणजे १५ दिवसात १२,००० वर मतदार नोंदणी निवडणूक आयोगाने कशी केली.

माहितीच्या अधिकार तर्फे त्यांना विचारणा केली की आपण हे मतदार कसे नोंदविले. त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र नाही. फक्त आयडी प्रुफ मार्फत नोंदणी केली. त्यामध्ये निवडणूक आयोगाने कामठी मतदार संघात मोठ्या प्रमाणात बोगस मतदाराची नोंदणी केली. मतदार नोंदणी ऑनलाईन प्रसिद्ध केली. फक्त आधार कार्डच्या शिवाय कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दिले नाही. उदा. शाळा सोडल्याचा दाखला, सचिवाचा दाखला इत्यादी. संपूर्ण कामठी मतदार संघात ३५,००० नविन मतदार बोगस नोंदणी करण्यात आली. यातील अनेक मतदार कामगार वर्ग, मध्यप्रदेश व इतर राज्यातील मतदार नोंदणी केल्या गेली आहे.

# पैशांच्या वादातून तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

उसणे दिलेल्या पैशांच्या वादातून गुन्हेगारीत सक्रीय दोन भावंडांनी मित्रासोबत मिळून एका तरुणाची निर्घृण हत्या केली. पैसे परत करण्याच्या बहाण्याने आरोपींनी त्या तरुणाला भेटायला बोलावले आणि तीक्ष्ण शस्त्रांनी सपासप वार करून त्याचा खून केला. ही थरारक घटना रविवारी रात्री कोतवाली ठाण्यांतर्गत लकडापूलजवळ घडली. राहुल मोहन पांडे (24) रा. भूतेश्वरनगर असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोन्ही मुख्य आरोपींना अटक केली. रोहित उर्फ मारी नामदेव चांदेकर (29) आणि विक्की नामदेव चांदेकर (33) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. परिसरातच राहणारा त्यांचा साथीदार नीरज लारोकर हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

राहुल हा आरटीओमध्ये दलालीचे काम करीत होता. चांदेकर बंधू हे गुन्हेगारीत सक्रीय असून त्यांच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. फेब्रुवारी महिन्यात कोतवाली पोलिसांनी रोहितकडून देशीकट्टाही जप्त केला होता. या प्रकरणात जामीनावर बाहेर आल्यानंतर तो पुन्हा गुन्हेगारीत सक्रीय झाला. मृतक राहुल याच्यावर सुद्धा मारहाणीचे गुन्हे नोंद आहेत.

त्याची रोहितशी मैत्री होती. काही दिवसांपूर्वी राहुलने रोहितला 8 हजार रुपये उसणे दिले होते. वारंवार पैसे परत मागूनही रोहित बहाणेबाजी करीत होता. यावरून राहुल आणि रोहित यांच्यात वाद सुद्धा झाला होता. रविवारी रात्री 11 वाजताच्या सुमारास रोहितने राहुलला फोन केला. त्याला पैसे घेण्यासाठी लकडापूलजवळ बोलावले. राहुल तेथे गेला असता रोहितसोबत विक्की आणि नीरजही होते. राहुलने पैशांची मागणी केली असता आरोपीने वाद घातला. बाचाबाचीचे रुपांतर हाणामारीत झाले. तिन्ही आरोपींनी मिळून राहुलला जबर मारहाण सुरू केली. त्याच दरम्यान रोहितने चाकू काढून राहुलवर हल्ला केला. सपासप वार करून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. राहुलला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी राहुलची आई सुनीता पांडेच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा नोंदविला. मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी चांदेकर बंधूंना अटक केली. नीरज फरार आहे. रोहित आणि विक्कीला पोलिसांनी सोमवारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# भारताच्या वनस्थिती अहवालाचे वास्तव मृगजळासारखे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

देशातील जंगल जवळपास 5 टक्क्याने वाढल्याचे केंद्र सरकारने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या वनस्थिती अहवालाची आकडेवारी सांगते. या मूल्यांकनानुसार, एकूण वन आणि वृक्षाच्छादन 8 लाख 27 हजार 357 चौरस किमी. आहे. जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या 25.17% आहे. वनक्षेत्राचे क्षेत्रफळ सुमारे 7 लाख 15 हजार 343 चौरस किमी. (21.76%) आहे तर वृक्षाच्छदनाचे क्षेत्रफळ 1 लाख 12 हजार 14 चौरस किलोमीटर (3.41%) आहे. पण ही आकडेवारी वास्तवापासून दूर असून चुकीच्या पद्धतीने मूल्यमापन यात केले आहे. त्यामुळे हा अहवाल मृगजळाप्रमाणे असल्याचा सूर महाराष्ट्र वनक्षेत्र सत्य व भ्रामक चर्चेतुन निघाला.

हा अहवाल प्रसिद्ध होताच वनक्षेत्रात काम करणारे अभ्यासक व संस्थांनी चुकीचे मूल्यांकन करून ही आकडेवारी गोळा केल्याची टीका केली. त्यामुळे या अहवालातील सत्य जाणून घेण्यासाठी वनराई फाऊंडेशनच्या वतीने चर्चेचे आयोजन केल्या गेले होते.

वनक्षेत्रातील गाढे अभ्यासक डॉ.योगेश्वर दुधपचारे, राज्य वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य यादव तरटे पाटील आणि ज्येष्ठ पत्रकार राखी चव्हाण यांनी सखोल चर्चेतुन या विषयाचे अनेक कंगोरे उलगडले. राखी चव्हाण यांनी वनक्षेत्राचे मोजमाप हे आधुनिक तंत्रज्ञानासह पारंपारिक पद्धतीने होण्याची गरज व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात गिरीश गांधी म्हणाले विकासाचे आकडे ? हे काही घटनांभोवती फिरत असतात. सोयीच्या दृष्टीने आकडे फिरविल्या जातात. हा अहवालही त्याला अपवाद नाही. याला उत्तर देण्यासाठी प्रत्येकाने वनांचा अभ्यास आणि वनजीवन समजून घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

डॉ. योगेश्वर दूधपचारे यांनी हा अहवाल फसवा असल्याचे प्रारंभिक सांगितले. ते म्हणाले भारतातील जंगल 1952 पासूनच्या वनधोरणानुसार 20% आहे. पण 2024 मध्ये जंगलाची व्याख्या व्यापक करताना वनाखालील क्षेत्र आणि वृक्षाच्छादीत क्षेत्र असे दोन प्रकार करण्यात आले आहेत. त्यामुळे तब्बल 3.41% वनक्षेत्र वाढल्याचे अहवाल सांगतो. पण ही व्याख्या आणि जंगल मापनाची पद्धत दोषपूर्ण असल्यामुळे हा पुरवठा असल्याचे ते म्हणाले. तसेच उपग्रहाद्वारे केलेले सर्वेक्षण हे जुने तंत्रज्ञान वापरून करण्यात आले. ही माहिती 2019 ची असून ती आज सुसंगत नसल्याचे ते म्हणाले.

# सेप्टिक टँकमध्ये बुडून चिमुकल्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

घरामागील सेप्टिक टँकमध्ये बुडून एका 3 वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. भौमिक ब्रिजेश बिसेन (3) रा. समतानगर, नारी रोड असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. ब्रिजेश समतानगरच्या गुडलक सोसायटीमध्ये कुटुंबासह राहतात. सकाळी 9 वाजताच्या सुमारास भौमिक घरीच खेळत होता. घरातील सर्वजण आप-आपल्या कामात व्यस्त होते. खेळता-खेळता भौमिक घराच्या मागच्या भागात गेला. तेथे सेप्टिक टँक उघडेच होते. टँकमध्ये वाकून पाहताना भौमिकचा तोल गेला आणि तो आत पडला. काही वेळातच बुडाल्याने त्याचा करूण अंत झाला. बराच वेळ पासून भौमिक दिसत नसल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला. भौमिक टँकमध्ये बेशुद्धावस्थेत आढळला. तत्काळ त्याला बाहेर काढून उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# शिक्षण संस्थाचालक पोलिसांच्या रडारवर

## शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी शिक्षण संस्थाचालक पुन्हा पोलिसांच्या रडावर आहेत. पोलिसांनी भक्कम पुरावे गोळा केले आहेत. त्यामुळे कुठल्याही क्षणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना अटक केली जाईल. त्याअनुषंगाने पोलिसांची तयारी आहे. दरम्यान राजश्री शिक्षण संस्था व नवोदय शिक्षण संस्थेचा अध्यक्ष चरण नारायण चेटूले (63) याची न्यायालयाच्या आदेशाने कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. पोलिस आणि चेटूले यांच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला. दोघांचीही बाजू ऐकल्यावर न्यायालयाने चेटूलेला न्यायालयीन कोठडी सुनावली.

शालार्थ आयडी घोटाळा प्रकरण खोलपर्यंत जात आहे. या प्रकणात आणखी किती लोक अडकतील याचा नेमका अंदाज कोणी लावू शकत नाही. पोलिसांकडे अनेकांची नावे आहेत. अधिकारी त्याच प्रमाणे शिक्षण संस्थेचे अध्यक्षांची कुंडलीच पोलिसांनी घेतली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासह गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. त्यामुळे केवळ शालार्थ आयडी घोटाळ्यावर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले तर दुसरी कामे रखडतील. त्यामुळे पोलिस टप्याटप्याने अटक करीत असल्याची सुत्रांची माहिती आहे. लवकरच पोलिस शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना अटक करणार आहेत. तशी कुणकुणही त्यांना लागली आहे. त्यामुळे काही जामीनासाठी प्रयत्नशील आहेत तर काही भूमिगत झाले आहेत. यापूर्वी केवलराम शिक्षण संस्थेचा सचिव राजू मेश्राम याला अटक करण्यात आली. तो 34 दिवस कारागृहात होता. न्यायालयाने आधीच त्याला जामीन दिला आहे. चेटूले याची स्वाक्षरी असलेला मुळ प्रस्ताव सदर पोलिसांनी आधीच ताब्यात घेतला आहे. चेटूलेच्या स्वाक्षरीने आणखी काही प्रस्ताव पाठविले होते काय? यादिशेने सुद्धा पोलिसांनी तपास केला.

### असा आहे घटनाक्रम

चरण चेटूले हा भंडारा जिल्ह्यातील दोन शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहे. आरोपी पराग पुंडके (मुख्याद्यापक) याने एस.के.बी. उच्च प्राथमिक, माध्यमिक विद्यामंदिर, यादवनगरची बनावट कागदपत्रे तयार करून त्याआधारावर उपसंचालक उल्हास नरड यांनी शाळेच्या मुख्याद्यापक पदासाठी मंजुरी दिली. मुन्ना वाघमारेच्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले. बनावट प्रस्तावावर चेटूले याची स्वाक्षरी होती. याप्रकरणी सदर पोलिसांनी चेटुलेला गुरूवारी रात्री भंडाऱ्याहून ताब्यात घेतले.

# थोडा पाऊस अन् प्रचंड ऊकाडा

## नागपूर दुसरे हॉट शहर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

यंदा ढगाळ वातावरण आणि मे महिन्यात अकाली पडलेल्या पावसाने नवतपाच्या अनुभूतीपासून नागपूरकर दूरच राहिले. पण गेल्या काही दिवसांपासून उकाड्याचा नवतपा नागपूरकरांना सहन करावा लागत आहे. काल दुपारी नागपूर शहर चांगलेच तापले असताना काही भागात पावसाचा शिरवा पडला आणि नागपूरकरांच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. रविवारी तापमान 43 अंशापर्यंत पोहोचल्याने दुपारी नागरिकांची बिकट अवस्था झाली. विदर्भात नागपूर दुसरे हॉट शहर ठरले असून सर्वाधिक तापमान ब्रह्मपुरीत 43.6 अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून सकाळी उठताच आकाशात ढग दिसून येत आहेत. मात्र दुपारी चांगले तापत आहे. त्यानंतर पुन्हा ढगाळ वातावरणामुळे मागील आठवड्याभरात पारा 40 अंश सेल्सिअसच्या जवळपास होता. त्यामुळे नागपूरकरांना त्रास सहन करावा लागला. रविवारी किमान तापमानाचेही चटके नागपूरकरांना सहन करावे लागले. काल या चटक्यांची तीव्रता वाढली. काल दुपारी तीनच्या सुमारास काही वेळ पावसाच्या सरी कोसळल्या. त्यानंतर पाऊस नाहीसा झाला. प्रचंड उकाड्याने प्रत्येक जण हैराण झाला होता. प्रचंड उकाडा व पाऊस यामुळे वातावरण उम्मस झाले असून कुलर व फॅनने माना खाली घातलेल्या आहेत.

### ११ पासून जोरदार पाऊस

दरम्यान राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. राज्याच्या काही भागात जोरदार पाऊस झाला. शहरात सायंकाळी काही भागात पाऊस पडला. तर काही भाग कोरडाच होता. मात्र नागपूर व विदर्भात 11 जून पासून विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. 11 व 12 जूनला जोरदार वादळासह पाऊस येण्याची शक्यता असून हवामान खात्याने येलो अलर्ट ही जारी केला आहे.

# बुटीबोरीतील चार उपकेंद्रांना आयएसओ मानांकन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

महावितरणच्या नागपूर परिमंडळाने ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा देण्याच्या वचनबद्धतेत आणखी एक मैलाचा दगड गाठला आहे. सावनेर विभागातील धापेवाडा उपकेंद्रानंतर आता बुटीबोरी विभागातील तब्बल चार 33/11 केव्ही उपकेंद्रांना एकाचवेळी आयएसओ 9001:2015 गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे मानांकन प्राप्त झाले आहे. या यशामुळे महावितरणच्या ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनावर शिक्कामोर्तब झाले आहे.




या मानांकनामुळे निलडोह, सोनेगाव, मोहगाव आणि डोंगरगाव या चारही उपकेंद्रांची गुणवत्ता व सेवा अधिकृतपणे प्रमाणित झाली आहे. 24७7 वीज वितरण, 33/11 केव्ही उपकेंद्रे, उच्चदाब व लघुदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रांची देखभाल व संचालन या सेवांमध्ये आता आयएसओ मानकांचे पालन केले जाणार आहे. या उपकेंद्रांचे सक्षमीकरण आणि नूतनीकरण केल्यामुळे हे यश शक्य झाले आहे.

महावितरणसाठी ग्राहकांचे जीवनमान उंचावण्याच्या इज ऑफ लिव्हिंग या संकल्पनेनुसार दर्जेदार वीजपुरवठा ही प्राथमिक जबाबदारी आहे. आयएसओ मानकांनुसार काम झाल्यामुळे ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा मिळणार आहेत. नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी कर्मचाऱ्यांच्या स्वयंस्फूर्तीने केलेल्या कार्याचे यावेळी कौतुक केले. तसेच इतर विभागांनाही प्रेरणा घेऊन आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

महावितरणच्या अलीकडेच पार पडलेल्या 20 व्या वर्धापनदिन कार्यक्रमात या यशाचे शिल्पकार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत, सुप्रसिद्ध टीव्ही कलाकार अजित कोष्टी, संचालक (ग्राहक व्यवहार) ॲड. गौरी चंद्रायण यांच्या उपस्थितीत व मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे आणि नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे उपस्थित होते.

बुटीबोरी विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील गोतमारे यांच्या नेतृत्वाखालील निलडोह, सोनेगाव, मोहगाव व डोंगरगाव उपकेंद्रातील अधिकाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यामध्ये एमआयडीसी-2 उपविभागाचे अति. कार्यकारी अभियंते फिरोज कनोजे व पराग फाटे, सहायक अभियंते प्रणय काळे व शैलेश निमकर; हिंगणा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते भूपेंद्र रंधे, कनिष्ठ अभियंता सुमित पिसे; बुटीबोरी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते प्रशांत चरपे, सहायक अभियंते मनोज पुरी तसेच यंत्रचालक प्रशांत ओसवाल, सारंग चापले, महेंद्र वेठी, गणेश शंभरकर, नितीन वैद्य, संजय सिरसाम, गोविंद मानेकर, निलेश जाधव, मनोज चौधरी, हरीश झिले, राहुल शेंडे, प्रजापती व नीता काकडे यांचा समावेश होता. बुटीबोरी विभागाचे अति. कार्यकारी अभियंते अशोक गाणार यांचा विशेष उल्लेख करून त्यांच्या सततच्या पाठपुराव्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.

धापेवाडा उपकेंद्रासाठी, ज्याला पूर्वीच आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे, सावनेर विभागाचे कार्यकारी अभियंते सुधीर हेडाऊ, अति. कार्यकारी अभियंते जयंत ठाकरे, कळमेश्वर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते रोशन शेंद्रे, कनिष्ठ अभियंते रजत पवार व यंत्रचालक योगेश खिरडकर यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

महासागर
: प्रभाग मित्र :




धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?
पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?
या... महासागर प्रभाग मित्र व्हा!

अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.

आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.
महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.
अर्जाच्या पाकिटावर 'महासागर प्रभाग मित्र' असा उल्लेख आवर्जून करा.
आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.

: अधिक माहितीसाठी :
9881717811, 9881717816

# परवान्यापेक्षा जास्त वाळुची वाहतुक करणारे चार टिप्पर ट्रक पकडले

## चार आरोपी अटक, टिप्पर ट्रक आणि वाळुसह एकुण १,३१,१०,००० रूपयांचा मुद्देमाल जप्त



■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. ९ : कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत राष्ट्रीय महामार्गाने मनसर कडुन कन्हान कडे अवैद्यरित्या गौण खनिज वाळुची चोरटी वाहतुक करणाऱ्या चार टिप्पर ट्रक ला कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने पकडुन कारवाईत चार आरोपींना अटक करुन १,३१,१०,००० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे . प्राप्त माहिती नुसार बुधवार (दि.४) जुन रोजी कन्हान पोलीस डीबी पथक अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि मनसर कडुन कन्हान कडे अवैद्यरित्या गौण खनिज वाळुची चोरटी वाहतुक केली जात आहे . अश्या मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी महामार्ग एन एच ४४ वर संदेश ले आऊट समोर नाकाबंदी केली असता टिप्पर ट्रक क्रमांक ३६ एबी ७५७६ , एम एच ४० सीटी १४२५ , एम एच ३६ ए ए ००८२ , एम एच ३६ ए एफ ३४४७ असे चार ट्रक मिळुन आले . वाहन थांबवुन पाहणी केली असता ट्रक मध्ये परवान्यापेक्षा जास्त वाळु मिळुन आली . पोलीसांनी चार वाहन चालकांना अटक करुन त्याचा जवळुन २०.५ ब्रॉस वाळु किंमत १,१०,००० रुपए आणि चार ट्रक किंमत १३,०००,००० रुपए असा एकुण १,३१,१०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड , पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात , सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान , हरिष सोनभद्रे , अमोल नागरे , अश्विन गजभिए , जीवन विघे , मोहित झाडे , आकाश सिरसाट सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली

# छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले : नितेश वांगे

## वांजरा येथे शिवराज्याभिषेक सोहळा थाटात साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
मौदा, दि. ९ : छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. पिकाच्या देठालाही धक्का लागणार नाही याची काळजी घेतली. हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. दिल्लीवर भगवा फडकविला.

असे मत शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी केले. तालुक्यातील वांजरा येथे शिवसेना मौदा तालुका प्रमुख नितेश वांगे व मित्र परिवारातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण, व शिवराज्याभिषेक सोहळा, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सार्वजनिक वाचनालयचे उद्घाटन, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार सोहळा.

मुलींना स्कॉलरशिप व सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा घेण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार कृपाल तुमाने, मुख्य अतिथी म्हणून उप जिल्हा पुरवठा अधिकारी भंडारा रतनलाल ठाकरे , सदुकर हटवार, मनोज गैरवार , बंडू सारवे, महेंद्र चकोले, दशरथ ठोंबरे , पुष्पा कांबळे. संजय चौधरी, दिलीप मानकर , बाबूलाल शहारे , सतीश ठाकरे, मंगेश ठाकरे , दीपक पिकलमुंडे, अजय पाटील, भाऊराव केवट, व आदी उपस्थित होते. पुढे बोलताना नितेश वांगे म्हणाले की राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी दूरदृष्टी ठेवून समाजातील सर्व घटकांच्या कल्याणाचे कार्य केल्यामुळे आज ३०० वर्षांनंतरसुद्धा त्यांच्या कार्याची ओळख, त्यांची आठवण सर्व समाजाला येते.

शिवाजी महाराजांनी केवळ किल्ले जिंकले नाही तर जनतेची मने जिंकली आज त्यांची वैभवशाली परंपरा आधुनिक क्रिया समजेल अशा भाषेत पोहोचवण्याचे काम महायुती सरकार करीत असल्याचेही शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे. अमित भोयर, प्रणय भोयर, श्रीकांत भोयर, प्रज्वल भोयर ,मंचित भोयर, विशाल बोंबाटे, अमित वांगे, आदित्य भोयर, आकाश निशाने, विशाल निशाने , स्वप्निल भोयर, हर्षल भोयर, व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका प्रमुख शिवसेना नितेश वांगे यांनी तर आणि आभार प्रदर्शन अमित भोयर यांनी मानले

# गुरुजनांसोबत आठवणीचा तो क्षण आज पंचेचाळीस वर्षानंतर उजळला

## दहावी वर्गाचा स्नेहमिलन सोहळा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
नरखेड , दि. ९ : गं. भं. नगरपरिषद उच्च माध्यमिक शाळा मोवाड येथे सन १९८०-१९८१ मध्ये एकत्र दहावी शिकलेले सर्व मित्र मैत्रिणीं पुन्हा एकदा एका दिवसासाच्या जुन्या आठवणीना उजाळा देण्यासाठी महात्मा फुले सभागृह बाजार चौक मोवाड येथे एकत्र जमले. स्नेहमिलन सोळ्यात जमलेल्या सर्व मित्र मैत्रिणींनी आपल्या गुरुजनाकडून प्रवेशव्दारावर छडीची शिक्षा घेऊनच प्रवेश दारावरच आनंद उत्सव साजरा करण्यात आला. श्यामसुदंर पालीवाल माजी मुख्याध्यापक तसेच कुलगुरू सुभाष पुरी यांच्या हस्ते कार्यक्रमाचा उद्धघाटन सोहळा संपन्न झाला.

पाहुण्यांचे स्वागत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ,स्मृती चिन्ह देऊन गुरुजनाचा सत्कार करण्यात आला. गुरूंच्या मार्गदर्शनामुळे आज आपण कोणी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, व्यावसायिक, उत्कृष्ट शेतकरी म्हणून आपल्या कार्य क्षेत्रात कार्यरत आहे. तर काही सेवानिवृत्त पण झाले. आईवडीलाचे नाव मोठे करत ते आज उपस्थित असलेल्या समस्त गुरुजनांमुळे शक्य होवू शकले हे आपल्या मनोगतातुन मान्यवरांनी अवगत केले.

समस्त गुरुजनानी आपल्या भावना भावूक होवून मनसोक्तपणे उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यां समोर मार्गदर्शन केले. शिक्षक धर्मे, हिवरकर ,उतखडे ,भंडिगे, बोरकर , बेलसरे, बालपांडे, आदी उपस्थित होते. तर पत्रकार राजेंद्र बागडे, अनिल ढोके, श्रीकांत मालदुरे ,अविनाश गजभिये, ललित खंडेलवाल, उपस्थित राहून त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

मैत्रिणींनी आपल्या भावना भावूक होवून मनसोक्तपणे आपल्या पंचेचाळीस वर्षांनंतर भेटलेल्या सवंगड्याजवळ भावना व्यक्त केल्या. पुन्हा कधीतरी भेटू हा संकल्प मनात धरून भोजनाचा आस्वाद घेऊन निरोप घेतता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत घरत, प्रास्ताविक विश्वनाथ कटारे तर आभार संजय अंबुलकर यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीवी करण्यासाठी अफसर पठाण, अशोक ढोरे, लक्ष्मीनारायण चव्हाण, भालचंद्र ढोरे, आदींनी सहकार्य केले.

# ३७ दिवसांपासून सुरु असलेले आंदोलन अखेर स्थगित



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ९ : दवलामेटी ग्रामपंचायत परिसरातील अतिक्रमणधारकांना शासनाच्या नियमानुसार मालकी भूखंड देण्याच्या मागणीसाठी सुरु असलेले आंदोलन अखेर ३७व्या दिवशी स्थगित करण्यात आले. २ मेपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर हे आंदोलन सुरु होते. दरम्यान, सोमवार २ जूनपासून ग्रामपंचायत सदस्य प्रकाश मेश्राम यांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणामुळे प्रशासनात हालचाल झाली. शुक्रवार ६ जून रोजी उपविभागीय अधिकारी वंदना सवारंपपते यांनी आंदोलकांशी भेट घेऊन संवाद साधला. मात्र, लिखित आश्वासनाच्या मागणीवर आंदोलक ठाम राहिले. यानंतर रविवार ८ जून रोजी आमदार समीर मेघे यांनी सरपंच गजानन रामेकर, उपसरपंच अर्चना चौधरी, वाडी न.प.माजी नगराध्यक्ष नरेश चरडे, माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे व इतर पदाधिकाऱ्यांसह आंदोलनस्थळी भेट दिली. दरम्यान, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन सभागृहातही यासंदर्भात बैठक घेण्यात आली होती.

त्यांनी प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून समस्येचे निराकरण करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, कार्यवाहीच्या गतीबाबत आंदोलकांमध्ये नाराजी होती. या पार्श्वभूमीवर, आमदार समीर मेघे यांनी येत्या बुधवार ११ जून रोजी पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन मार्ग काढण्याचे आश्वासन दिले, त्यावर विश्वास ठेवत उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आमदार समीर मेघे यांनी प्रकाश मेश्राम यांना ज्युस पाजून आंदोलनाची सांगता केली. या वेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मनीष बोरकर, श्रीकांत रामटेके, सोनू बोरकर, माजी सरपंच तथा ग्रा.पं. सदस्य रिता उमरेडकर, ग्रा.पं. सदस्य शुभांगी रविंद्र पाखरे, प्राचार्य रविंद्र पाखरे, दर्शन बेले, राजेश वानखेडे, स्वप्नील चारभे, पुंडलिक बोरकर, दीपक कोरे, राहुल लामसोंगे, सिद्धार्थ मेश्राम, वामन वाहने, कुमेंद्र भालाधरे, अर्चना बनसोड, सुषमा भालाधरे, दीपाली कांबळे, संघमित्रा कांबळे, चैत्रा पाटील, चंदा बोबडे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तडीपार आरोपीला अटक



नागपूर : एका वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार केलेला आरोपी हा शहरात बिनधोकपणे वावरत असल्याचे पोलिसांच्या पेट्रोलिंग दरम्यान आढळून आला. धंतोली पोलिसांनी लागलीच ताब्यात घेऊन अटक केली. कार्तिक ऊर्फ काल्या राजू ऐलपूलवार (२४) रा. राहुलनगर झोपडपट्टी, धंतोली असे आरोपीचे नाव आहे.

धंतोली पोलिसांचे पथक शनिवारी रात्री हद्दीत गस्त घालत असताना राहुलनगर नाल्याजवळ एक व्यक्ती फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी लागलीच घटनास्थळ गाठून पाहणी केली असता कार्तिक हा पोलिसांना पाहून पळू लागला.

पाठलाग करून पोलिसांनी त्याला पकडले. ठाण्यात आणून गुन्हेगारी रेकॉर्ड तपासला असता परिमंडळ क्रमांक २ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला एक वर्षासाठी नागपूर जिल्ह्यातून हद्दपार केल्याचे दिसून आले. तरी सुद्धा तो शहरात वावरत होता. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# शासकीय बालगृहातील मुलांना मारहाण

## कनिष्ठ काळजीवाहकासह सुरक्षा रक्षकांविरूध्द गुन्हा दाखल

## बालकल्याण समितीसमोर मुलांच्या तक्रारी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : शासकीय बालगृहातील अल्पवयीन मुलांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी कपिलनगर पोलिसांनी प्र परिविक्षा अधिकारी धनंजय करंबे यांच्या तक्रारीवरून कनिष्ठ काळजीवाहकासह दोन सुरक्षा रक्षकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. राजेंद्र वासनिक (केअरटेकर), इंजमामअली सय्यद व सोहेल पठाण अशी त्यांची नावे आहेत.

कपिलनगर हद्दीतील पाटणकर चौकात शासकीय मुलांचे बालगृह आहे. धनंजय करंबे यांच्याकडे तेथील अतिरिक्त प्रभार आहे. ज्या मुलांना संरक्षणाची आवश्यकता आहे तसेच पोलिसांना सापडलेली बालके तेथे ठेवण्यात येतात. त्यांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक नियुक्त करण्यात आले आहेत. ३० मे रोजी सदर पोलिस ठाण्याच्या पथकाने १४ ते १६ वयोगटातील सहा मुलांना कायदेशीर प्रक्रिया करून बालगृहात दाखल केले होते. २ जून रोजी त्यांचे पालक त्यांना घेऊन जाण्यासाठी उपस्थित झाले. नियमानुसार मुलांना बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले. त्यावेळी दोन मुलांनी त्यांना या तीनही आरोपींनी मारहाण केल्याची माहिती दिली. या मुलांना इतके मारण्यात आले की त्यांच्या अंगावर व्रण देखील उमटले. हे व्रन यावेळी मुलांनी दाखविले. एका मुलाच्या उजव्या मांडीवर तसेच एकाच्या पोटरीवर मारल्याचे व्रन होते. त्यांना काठीने आणि हातबुक्कीने मारले तसेच पोलिसांत खोटा गुन्हा दाखल करण्याचीदेखील धमकी दिल्याचेही समितीसमोर सांगितले. ही बाब समोर आल्यावर समितीने बालगृहातील अधिकाऱ्यांना पोलिसांत तक्रार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार करंबे यांच्या तक्रारीवरून तीनही आरोपींविरोधात कपिलनगर पोलीस ठाण्यात कलम ११८ (१), २९६, ११५(२), ३५१ (२), ३ (५) बीएनएस सहकलम ७५ बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. त्या तिघांनी इतरही मुलांना मारहाण केली होती का याचा तपास सुरू आहे.

# घरफोडीत सोन्याचे दागिने लंपास

नागपूर : घरी कुणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी दाराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले पावणे दोन लाखाचे सोन्याचे दागिने चोरी केले. ही घटना कपिलनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली.

कामगार नगर चौक, बँक कॉलनी येथे राहणारे अनिल राघोजी इंदोरकर (५२) शनिवारी घराला कुलूप लाऊन कुटुंबासह एका कार्यक्रमाला गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले. अलमारीत ठेवलेले १ लाख ७६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरी केले. अनिल घरी परतले तेव्हा त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. घरातील सीसीटीव्हीमध्ये चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्या आहेत. अनिल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंदवून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# अँक्टीव्हा दुचाकीला ट्रॅव्हल्स बस चालकाने मारली जोरदार धडक

## अँक्टीव्हा चालक शेख आशिफ शेख वकिल शेख याचा घटनास्थळीच मृत्यु

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. ९ : टेकाडी शिवारातील राष्ट्रीय महामार्ग नागपुर बॉयपास रोड च्या वळणाजवळ अँक्टीव्हा दुचाकीला ट्रॅव्हल्स बस चालकाने जोरदार धडक मारली . या भीषण अपघातात अँक्टीव्हा चालक शेख आशिफ शेख वकिल शेख याचा घटनास्थळीच मृत्यु झाला , तर मागे स्वार नरेंद्र नायक हा गंभीर जख्मी झाल्याने त्याचा उपचार मेयो रूग्णालय नागपुर येथे

प्राप्त माहिती नुसार शनिवार (दि.७) जुन २०२५ रोजी फिर्यादी मो.इकबाल मो.इब्राहिन (वय ३७) रा.कामठी यांचा काकांचा जवाई आशिफ शेख वकिल शेख (वय ४५) रा.कामठी व मित्र नरेंद्र नायक (वय ४५) रा.कन्हान हे दोघे दावतासाठी लाल रंगाच्या




अँक्टीव्हा दुचाकी क्रमांक एम एच ४० बीटी ६१७४ ने कामठी, कन्हान वरून मध्यप्रदेश च्या शिवनी येथे जात होते . टेकडी शिवारात राष्ट्रीय महामार्गावरील नागपुर बायपास रोड वळणाजवळ आनंद इंगोले यांच्या शेतीसमोर दुपारी १:३० ते २ वाजता च्या दरम्यान मनसर कडुन वर्धा कडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्स बस क्रमांक बीआर ०६ पीजी ३५६७ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवुन अँक्टीव्हा दुचाकीला जोरदार धडक दिली . या भीषण अपघातात दुचाकी चालक आशिफ शेख वकिल शेख यांचा घटनास्थळी मृत्यु झाला आणि मागे स्वार मित्र नरेंद्र नायक गंभीर जख्मी झाला .

सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील स्टाफ सह घटनास्थळी पोहचले , महामार्ग टोल प्लाझा च्या रूग्णवाहिकेने दोघांना कामठी उपजिल्हा रूग्णालयात नेण्यात आले. मित्र नरेंद्र गंभीर जख्मी असल्याने त्याला मेयो रूग्णालय नागपुर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले , त्यांची ही परिस्थिती चिंताजनक असल्याचे बोलल्या जात आहे . कन्हान पोलीसांनी फिर्यादी ऑटो चालक मो इकबाल मो इब्राहिम यांच्या तक्रारी वरून आरोपी ट्रॅव्हल्स बस चालका विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .


## सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १५/२०२५**

पेशी दिनांक : १७-०६-२०२५ — प्रोसेस क्रं. ५६८/२०२५
दिनांक : ३१-०५-२०२५

अर्जदार : १. स्वप्नील गोविंद जैस्वाल, वय ४० वर्षे, रा. पो. मौदा, तह. मौदा,जि. नागपूर.
२. सागर गोविंद जैस्वाल, वय ४३ वर्षे, रा. पो. मौदा, तह. मौदा, जि. नागपूर.
३. समीर गोविंद जैस्वाल, वय ४२ वर्षे, रा. पो. मौदा, तह. मौदा, जि. नागपूर.
---- विरूध्द ----
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : गोविंद लक्ष्मीनारायण जैस्वाल

सदरहू अर्जदारांनी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. गोविंद लक्ष्मीनारायण जैस्वाल, हे मौजा-मौदा, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार गोविंद लक्ष्मीनारायण जैस्वाल ह्यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. गोविंद लक्ष्मीनारायण जैस्वाल यांचा मृत्यु दि. २०.०१.२०२५ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर. मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक १७.०६.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि ३१-०५-२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.


आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
मौदा, जि. नागपूर


# बसपाने बिरसा मुंडाला केले अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : क्रांतिकारक बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला जल, जमीन, जंगल यावर हक्क प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांशी संघर्ष केला. वयाच्या २५ व्या वर्षी आपल्या जीवाचे बलिदान दिले. ते धरती आबा व उलगुलान आंदोलनाचे प्रणेते बिरसा मुंडा यांच्या १२५ व्या स्मृतीदिन निमित्त बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश चे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, नागपूर जिल्हा प्रभारी राहुल सोनटक्के व राजकुमार बोरकर, जिला महासचिव चंद्रशेखर कांबळे, एड वीरेश वरखडे, महिला नेता बबीता डोंगरवार यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले. बहुजन समाज पार्टीच्या कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत फुटाळा तलावा शेजारी असलेल्या बहुजन महापुरुष बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बसपाचे अभिलेश वाहने, अंकित थुल, अभय डोंगरे, शंभू गोंड, बामसेफचे मिलिंद वासनिक आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# ४५ वर्षीय महिलेचा सर्पदंशामुळे मृत्यु



■ महासागर प्रतिनिधी,
भिवापूर, दि. ९ : माळीपुरा येथील रेखाबाई धनराज नंदरधने ह्या जोगीखेडा परिसरातील शेतात असलेला भाजीपाला तोडण्यासाठी आज ८ जुनला सकाळी १० वाजता गेल्या होत्या. परंतु भाजीपाला तोडत असताना लगत असलेल्या ओल्या जागी एका विषारी सापाने दंश केल्यामुळे त्याची प्रकृती चांगलीच खालवली. अशा अवस्थेत त्यांना भिवापूर ग्रामीण रुग्णालय येथे बेसुद्ध अवस्थेत आणण्यात आले. त्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालय नागपूर येथे नेण्यात आले. उपचारादरम्यान रेखा नंदरधने हिचा आज ८ जून रविवारला दुपारी चार वाजता दुर्दैवी मृत्यु झाला. त्यांचे शवविच्छेदन मेडीकल कॉलेज नागपूर येथे करण्यात आले. त्या नंतर त्याचे शव भिवापूर येथे आणण्यात आले.

# 'वटसावित्री: एक व्रत, एक संस्कृती, एक स्त्रीचा संकल्प'

**भारती**य संस्कृतीत व्रत-उपवास्ही केवळ धार्मिक परंपरा नसून, त्यामागे एक सामाजिक, मानसिक आणि नैतिक विचारधारा दडलेली असते. त्याच पंक्तीत असलेलं वटसावित्री व्रत हे केवळ पतीस दीर्घायुष्य मिळावं म्हणून केलेलं व्रत नाही, तर स्त्रीच्या धैर्य, निष्ठा आणि आत्मबलाचं प्रतीक आहे.

आजच्या आधुनिक युगात आपण या व्रताकडे केवळ एक कर्मकांड म्हणून पाहू लागलो आहोत. पण यामागचं मूळ समजून घेतल्यास, वटसावित्री व्रत हे स्त्रीच्या संघर्षशील प्रवासाची गोष्ट सांगतं.

**सावित्री -एका स्त्रीची अमर गाथा**

सावित्री ही केवळ पतीव्रता नव्हे, तर ती नियतीलाही आव्हान देणारी स्त्री आहे. यमराजासमोर आपल्या पतीचा जीव मागताना तिच्या चेहऱ्यावर ना भीती होती ना विनवणी; होती ती केवळ श्रद्धा, शौर्य आणि बुद्धिमत्ता. तिच्या संवादातून आणि युक्तिवादातून अखेर यमराजालाही नमते घ्यावे लागले.

आज जेव्हा एक स्त्री वडाच्या झाडाभोवती प्रदक्षिणा घालते, तेव्हा ती फक्त पारंपरिक स्त्री नाही, तर ती सावित्रीच्या रूपात जगाशी, नियतीशी आणि प्रसंगांशी लढणारी नवी स्त्री आहे.

**वडाचे झाड -निसर्गाशी जोडणारी नाळ**

वडाचे झाड हे आयुष्य, बळ आणि अखंडतेचे प्रतीक आहे. वटसावित्रीला वडाच्या झाडाशी जोडणं म्हणजे स्त्रीने केवळ आपल्या पतीसाठी नव्हे, तर आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि पर्यावरणासाठी बांधिलकी दर्शवणं.

या झाडाभोवती केलेल्या प्रदक्षिणा म्हणजे तिचं जीवनचक्र, तिचा आत्मसंवाद आणि तिचा निर्धार.

**आजच्या स्त्रीसाठी वटसावित्री व्रताचं महत्त्व**

आजच्या काळात सावित्रीसारखीच अनेक स्त्रिया घराच्या उंबऱ्याबाहेर पडून आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी झगडत आहेत. शिक्षिका, डॉक्टर, शेतकरी, पोलीस, अग्निशमन दलातल्या महिलाः त्या सगळ्याच सावित्री आहेत.

या व्रताच्या निमित्ताने आपण त्यांच्या जिद्दीला, त्यागाला आणि निष्ठेला सलाम केला पाहिजे.

व्रताच्या बाहेरचाही अर्थः

वटसावित्री ही केवळ व्रत नव्हे, ती आपल्या संस्कृतीतील स्त्री-शक्तीचा गौरव आहे. आज जर आपण व्रत करताना एक झाड लावलं, एक स्त्रीचं मन जाणून घेतलं, किंवा तिच्या निर्णयांना पाठिंबा दिला -तर खरं वटसावित्री व्रत तेच ठरेल.

**उपसंहार:** वटसावित्री हे व्रत नाही, तर आपल्या जीवनातील एका स्त्रीच्या संघर्षाची, श्रद्धेची आणि प्रेमाची अमरकथा आहे. आज तिच्या रूपानं प्रत्येक स्त्री सावित्री आहे -शौर्य, संयम आणि श्रद्धेचं मूर्तिमंत रूप.

**अरूण सोपानराव कराळे**
**मो.न.९०९६३२७२**
**दत्तवाडी ,नागपूर**

# नारा पार्क येथील साखळी उपोषणाचा २५० वा दिवस



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल पार्क बचाव कृति समिति च्यावतीने रविवारी २५० वा, साखळी उपोषणचा दिवस पार्क नारा येथे साजरा करण्यात आला. अध्यक्ष चंदू पाटील यांनी आंदोलन स्थळी सांगितले की आज २५० दिवस झाले परंतु नारा पार्क चा विकास किंवा भूमिपूजन सुद्धा झाले नाही. जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत हि लढाई चालूच राहील असे पाटील यांनी म्हटले. त्याच दिवशी सकाळी बुद्ध वंदना झाल्यावर सुमधुर भीम गीतांचा करावोके आर्केस्ट्रा चा आनंद घेतला. समितिच्या सदस्य लोकांनी आपले स्वलिखित गाने आपल्या स्वताच्या आवाजात गायले. ज्या मध्ये शशिकला चालखुरे, आनंद रक्षित, सुषमा नागरे कांबळे, पंचशीला गजभिये, चंदाताई वाघमारे, भारती वानखेड़े यांनी आपले गाने गायले. याप्रसंगी समितिचे अध्यक्ष चंदू पाटिल आणि सर्व सदस्य डॉ. मोरे साहेब, ॲड. नारनवरे, शशिकला चालखुरे, प्रिया चालखुरे, यमुनाबाई रामटेके, विजया ताई पाटिल, आणि इतर सर्व सदस्य गण उपस्थित होते.

**महसूलमंत्री बावनकुळे यांनी प्रश्न मार्गी लावणार असे आश्वासन देऊन सुद्धा आजपर्यंत आंदोलन सुरूच...**

# काटोल नगरपालिकेची करवाढ, जनतेची डोकेदुखी

## शेकाप, वंचित बहुजन आघाडी, विविध सामाजिक संघटनेकडून निवेदन



■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. ९ : काटोल न प चे मुख्याधिकारी तथा प्रशासकांनी २५ मार्च २०२५ रोजी ठराव क्रं १३१० नुसार काटोल शहरातील खाजगी पाणीपट्टी कर कॉन्व्हेन्टची फी मालमत्ता कर लिजं हस्तांतरण शुल्क, पाणी पुरवठा टँकर, वाचनालय फी, रुग्णवाहिका शुल्क, अशा आवश्यक सेवा मध्ये भरमसाठ करवाढ करण्यात आली आहे. नगरपालिका प्रशासनाने शहरातील गोरगरीब जनतेचा विचार करावा.

ही करवाढ अन्यायकारक असून ती रद्द करण्यात यावी. अन्यथा नगर पालिकेच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. हि वाढ म्हणजे गोरगरीब जनतेचे कंबरडे मोडणारी आहे. प्रशासक अधिकाऱ्यांनी भाववाढीचा लादलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा अन्यथा काटोल शहरात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनातून बहुजन वंचित क्रांती सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे, शेकापचे नेते राहुल देशमुख माजी नगरसेवक संदीप वंजारी यांनी प्रशासनाला दिला.

# महाराष्ट्र नाट्य परिषदद्वारा आयोजित शिबिराचे उद्घाटन



**नागपुर:** महाराष्ट्र? नाट्य परिषद नागपूर द्वारा बालनाट्य अभिनय आणि नृत्य तसेच व्यक्ती महत्व विकास शिबीराचे आज गुरुदेव सेवा मंडळ, आगाराम देवी चौक येथे उद्?घाटन झाले. शिबिराचे उदघाटन अशोक ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले, या सोहळ्याला राजेश कुंभलकर, कैलाश तानकर, तसेच नगर सेवीका हर्षला साबळे आणि महाराष्ट्र नाट्य परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र टेकाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. शिबीराचे प्रशिक्षक तथा आयोजिका प्रा. डॉ.सौ संगीता टेकाडे आणि अदिती (निर्मिती) टेकाडे यांनी शिबीराचे आयोजन केले दि.५ ते २० जून पर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले असुन ४ वर्षापासून तर १५ वर्ष वयातील मुल यात सहभागी आहेत.

या शिबिराला यशस्वी करण्याकरिता नताशा ओगानिया, रोशणी ओगानिया कोमल ओगानिया, मयूर तांगडे, भुमिका मसराम, अक्षय चवडे, राजू दैवतकर यांनी परिश्रम घेतले.

# घातक शस्त्र घेऊन दहशत माजविणाऱ्याला अटक

**नागपुर :** घातक शस्त्र हातात घेऊन वस्तीत दहशत माजविणाऱ्याला बजाजनगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली. सुनील रामराव नेहारे (४६) रा. कैकाडी नगर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

सुनील हा मुळचा वर्धा जिल्ह्यातील कारंजा येथे राहणारा आहे. तो नागपूरमध्ये कैकाडी भागात सध्या वास्तव्याला आहे. बजाजनगर पोलिसांचे पथक शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास पेट्रोलिंग करीत असताना पथकाला गुप्त माहिती मिळाली की, कैकाडी भागात एक व्यक्ती हातात धारदार शस्त्र घेऊन दहशत माजवीत आहे. या माहितीवरून पोलिसांनी लागलीच घटनास्थळ गाठले. पोलिसांना तो हातात शस्त्र घेऊन धुमधाम करताना आढळून आला. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी लोखंडी तलवार जप्त केली. तो कोणतातरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने तलवार घेऊन फिरत असल्याचे प्राथमिक तपासात पोलिसांना निदर्शनास आले. त्याच्या विरुद्ध पोलिसांना गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे.

# बिरसा मुंडाला अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ९ : आदिवासी समाजाला आपले हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी स्वतःच्या प्राणाची बाजी लावणारे बिरसा मुंडा यांना त्यांच्या १२५ व्या स्मृतिदिना निमित्त वाडी च्या सोनबा नगरातील पुतळ्याला बहुजन समाज पार्टी च्या वतीने माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. सुरुवातीला शारदा मरसकोल्हे, सुरेखा खंडाते, माधुरी गोडांगे, दुर्गा भलावी, गीता धुर्वे आदि आदिवासी महिला कार्यकर्त्यांनी बिरसा मुंडा चे पूजन केले. त्यानंतर आदिवासी समाजातील प्रमुख कैलास मसराम, बसपा नेते उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, नगरसेवक नरेंद्र मेंढे, जिला महासचिव चंद्रशेखर कांबळे यांनी माल्यार्पण केले. सव्वाशे वर्षांपूर्वी बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वात इंग्रजा विरुद्ध आपल्या हक्क व अधिकारासाठी लढणाऱ्या आदिवासी समाजाला प्रस्थापित सरकार विरुद्ध सुद्धा संघर्ष करावा लागत असल्याचे मनोगत बसपा नेते उत्तम शेवडे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर सोनपिपळे यांनी तर समारोप रितेश झटाले यांनी केला केला.

याप्रसंगी प्रामुख्याने अभिलेश वाहने, वीरेंद्र कापसे, सुशील गजभिये, अभय डोंगरे, अंकित थूल, सुभाष सुखदेवे, किशोर इंगळे, मंगेश नागदेवे, रेखलाल खंडाते, कुणाल मेश्राम, आयुष खंडारे, मनीष रामटेके, अरमान तीसके आदी प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्काउट्स आणि गाईड्स जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'पर्यावरण सायकल रॅली'



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : पर्यावरण जागरूकता आणि युवा उर्जेचे एक उत्साही प्रदर्शन म्हणून, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील भारत स्काउट्स आणि गाईड्सच्या अजनी येथील विक्रांत सी ग्रुपने ८ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिन (५ जून) साजरा करण्यासाठी ङ्गपर्यावरण सायकल रॅलीङ्घ आयोजित केली. रॅलीची सुरुवात शंकर धीमान मेमोरियल स्काउट गाईड डेन, अजनी येथून झाली आणि सुरुवातीच्या ठिकाणी परत येण्यापूर्वी सातपुडा ऑफिसर्स रेस्ट हाऊस, सिव्हिल लाइन्स येथे झाली. या कार्यक्रमात विक्रांत सी ग्रुप, सरोजिनी नायडू ग्रुप आणि कमला नेहरू ग्रुपच्या स्काउट्स, गाईड्स, रोव्हर्स आणि युनिट लीडर्सचा उत्साही सहभाग दिसून आला. प्रत्येक पेडलसह, तरुण सहभागींनी पर्यावरण संवर्धन आणि सामुदायिक जबाबदारीचा संदेश दिला, जो स्वच्छ आणि हिरव्या भविष्यासाठी त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. अशा उपक्रमांमुळे तरुणांमध्ये पर्यावरणीय जाणीव निर्माण होतेच, शिवाय समुदायाला आपल्या ग्रहाचे रक्षण करण्यासाठी हातमिळवणी करण्यास देखील प्रेरित केले जाते.

## आरपीएफकडून बेकायदेशीर रेल्वे तिकिट व्यवहारांवर कठोर कारवाई

**नागपूर, दि. ९ :** रेल्वे सुरक्षा बल , नागपूर विभागाने ऑपरेशन उपलब्धङ्घ अंतर्गत विश्वासार्ह गुप्त माहितीवरून नागपूर स्थानकाच्या पूर्व भागातील संत्रा मार्केटजवळील रेल्वे आरक्षण केंद्रावर लक्ष केंद्रित करत छापा टाकला. या कारवाईदरम्यान आरपीएफ गुन्हे अन्वेषण शाखेच्या एएसआय पंकज शर्मा आणि कॉन्स्टेबल हरविंदर सिंग यांनी तिकिट असलेल्या एका व्यक्तीला अडवले. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्तीने तिकिट स्वतःच्या प्रवासासाठी नसून इतरांच्या वतीने कमिशनसाठी बुक केल्याचे कबूल केले. संपूर्ण तपासादरम्यान त्याच्या मोबाईलमध्ये पूर्वी बुक केलेली २९,००० पेक्षा जास्त किमतीची तिकिटे आढळली, जे बेकायदेशीरपणे तिकिटांचे काळाबाजार करणाऱ्या सिस्टिमॅटिक पद्धतीचा भाग असल्याचे निदर्शनास आले.

# कर्करोग आणि डोळ्यांच्या शिबीरात १०६ नागरिकांची तपासणी




**कन्हान :** अनुकंपा बहुउद्देशीय संस्था कन्हान च्या वतीने दिवटे हाऊस तारसा रोड येथे शनिवार (दि.७) जुन रोजी मोफत कर्करोग आणि डोळे तापासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले . एचसीजी कैंसर सेंटर नागपुर चे डॉ.कमलजीत कौर , हेड ऑफिसर डॉ.जगताप मॅडम , आरोग्य अधिकारी डॉ श्रद्धा भगत , डॉ जयश्री मेश्राम यांचा सहकार्याने शिबिरात नागपूर येथील एचसीजी कर्करोग केंद्राच्या अनुभवी डॉक्टरांकडून अत्याधुनिक मशीनच्या मदतीने कर्करोगाची तपासणी करण्यात आली .

तसेच तोंडी तपासणी , रक्त तपासणी , स्तनाच्या कर्करोगाची आणि डोळ्यांची तपासणी केली . संभाव्य आजारांचे निदान आणि उपचार याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली . कर्करोगापासून बचाव करणे शक्य व्हावे म्हणून एचपीव्ही लसीकरणाशी संबंधित महत्त्वाची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली . या मोफत शिबीराचा १०६ नागरिकांनी लाभ घेतला . शिबीराचे आयोजन समाजसेविका सुनंदा दिवटे , संस्था सचिव स्वर्णलता सहारे , सदस्य राहुल सोमकुवर यांनी केले . शिबीरात खासदार श्यामकुमार बर्वे , जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सौ.रश्मी बर्वे , माजी नगरसेवक राजेंद्र शेंदरे , माजी नगरसेविका सुषमा चोपकर , संगीता खोब्रागडे , अनिता पाटील , राखी परते , स्वाती पाठक , प्रतिक्षा चवरे , रंजना किरपान , ॲड. आशा पनिकर , मीना कळंबे , बिरेंद्र सिंह , शैलेश शेळके , आशिष दिवटे , संजय रंगारी , नेवालाल सहारे सह आदि नागरिक उपस्थित होते . शिबीर यशस्वी करण्याकरिता आरोग्य सेविका शालिनी वाल्दे , मंजुषा पडवेकर , धनश्री खेडेकर , प्रियंका सोनबोईर , हरिदास पराते , तुषार लांजेवार , राजेश गांजवे , महेंद्र सांगोडे सह आदि नागरिकांनी सहकार्य केले .

## लाव्हा येथे बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन साजरा



**वाडी:** लाव्हा येथे जय बिरसा आदिवासी विकास सोसायटी यांच्या वतीने थोर आदिवासी क्रांतिकारक धरती आबा बिरसा मुंडा यांच्या १२५ व्या स्मृतिदिनानिमित्त पुतळ्याजवळ भावपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात लाव्हा ग्रामपंचायत सदस्य शारदा मरसकोल्हे व शोभा सलामे यांनी बिरसा मुंडा यांच्या बिरसा मुंडा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर अगरबत्ती व कॅंडल लावून पूजन केले. जि.प. सदस्य सुजित नितनवरे,अस्मिता मंचाचे अध्यक्ष राजकुमार बोरकर आणि जय बिरसा आदिवासी विकास सोसायटीचे सदस्य दिनेश उईके यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. संचालन सचिव सचिन सलामे यांनी तर आभार स्वप्निल सलामे यांनी मानले. आयोजनासाठी जय बिरसा आदिवासी विकास सोसायटीचे विनोद करणाके, शोभा सलामे, दुर्गा फुलसुंगे, रमेश सलामे, सीमा मडावी आदींनी सहकार्य केले.

## सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७० प्रकरणांची नोंद

# उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. सोमवार (ता.०९) रोजी शोध पथकाने ७० प्रकरणांची नोंद करून ४९,८००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३२ प्रकरणांची नोंद करून १२,८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ०३ प्रकरणांची नोंद करून ३००/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ०२ प्रकरणांची नोंद करून ८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून २,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करून अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १४ प्रकरणांची नोंद करून १७,५००/-रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ४२ प्रकरणांची नोंद करून ८,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ७ प्रकरणांची नोंद करून ७,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध धरमपेठ झोन अंतर्गत मे. प्रकाश महादेवराव भारंगे यांनी अस्थायी स्वरुपात फुटपाथवर टेंन्ट लावल्याबद्दल रु. ५,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. नेहरू झोन अंतर्गत मे. माऊली इंटरनॅशनल पब्लिक स्कुल यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. ५,०००/- चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. लकी स्वीट्स, मे. प्रगती किराणा स्टोअर्स, मे. हर्ष स्वीट्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल प्रत्येकी रु. ५,०००/- असे एकुण १५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला.

मंगळवारी झोन अंतर्गत मे. अबीद डेअरी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच मे. खेमानी डिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रु. १०,०००/-चे दंड वसूल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने ७ प्रकरणांची नोंद करून रू. ४०,०००/- दंड वसू केला.

## निधन वार्ता

**संगीता ठाकूर**



**वाडी:** येथील दत्तवाडीतील प्लॉट न.२३, त्रिलोक नगर निवासी संगीता अयोध्यासिंह ठाकूर यांचे निधन झाले. त्या ५७ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती ,चार भाऊ,एक बहीण व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर रविवारी टेकडीवाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

**सहदेव भगत**



**नागपुर:** उंटखाना निवासी आकाश (भुऱ्या) सहदेव भगत वय ४५ वर्ष यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि. १० जुन रोजी सकाळी ११ वाजता प्लॉट नं. -३२३, ए.के. गांधी कार्स मागे, उंटखाना, नागपूर येथील त्यांच्या निवासस्थाना वरून निघून मोक्षद्याम येथे अंत्यविधी होणार आहे.

## शिवराज्याभिषेकदिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सोहळा

**वाडी:** येथील शिवतीर्थ, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात स्थानीक हिंदू साम्राज्य दिन उत्सव समिती यांच्या वतीने ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा निमीत्य रविवार ८ जुन रोजी २५ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लक्ष्मीकांत कारींगवार यांचे 'शिवरायांचे आदर्श आणि आजचे महत्त्व' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान पार पडले. श्रोत्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मंत्रोपचारासह महाराजांचा जलाभिषेक व दुग्धाभिषेक, तसेच शिवस्तुती व आरती पार पडली. या पवित्र सोहळ्यात मोठ्या संख्येने शिवभक्तांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा.स्व.संघ वाडी नगर संघचालक दिनेश मंत्री होते तर प्रमुख पाहूणे म्हणून धरमपेठ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व रा.स्व.संघ उमरेड जिल्हा संघचालक दिपक दुधाने आनंदबाबू कदम, दामोधर जोध, प्रवीण शिंदे उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन विशाल जोध यांनी केले. आयोजनासाठी विशाल जोध ,निशांत झाडे, प्रशांत दाभेकर, शिवम राजे, गौरव उगले, प्रज्वल अतकरी, आयुष बोबडे, यश अंबर्ते, विकास जायभाये आदींनी सहकार्य केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HUNAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD HUNAIN MOHAMMAD SHAMIM RAIN.**
ADD : PLOT NO.41,NEAR H.K.COMPUTER,SAI BABA NAGAR,SHANTI NAGAR, NAGPUR- 440002, MAHARASHTRA, INDIA

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SHAKLAIN RAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SHAKLAIN.**
ADD : PLOT NO.41,NEAR H.K.COMPUTER,SAI BABA NAGAR,SHANTI NAGAR, NAGPUR- 440002, MAHARASHTRA, INDIA

# मनपा आरोग्य केंद्रांमध्ये कुष्ठरोगावर नि:शुल्क उपचार

## शरीरावरील चट्टयांकडे दुर्लक्ष करु नका लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ : शरीरावरी पिवळा, लालसर डाग किंवा चट्टा, अंगावरील गाठी, कानाच्या जाड झालेल्या पाळ्या, स्नायूंचा अशक्तपणा यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका, ते कुष्ठरोग असू शकते. त्यामुळे वेळीच निदान व्हावे यासाठी लगेच आपल्या जवळच्या मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना भेटा व त्यांच्या सल्ल्यानुसार नि:शुल्क उपचार करुन घ्या, असे आवाहन नागपूर महानगरलिके द्वारे करण्यात आले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात कुष्ठरोग जनजागृती उपक्रमाच्या अंतर्गत मनपाच्या आरोग्य विभागाद्वारे जनजागृती कार्यवाही केली जात आहे. कुष्ठरोग हा आजार एम. लेप्रा या जीवाणू च्या संक्रमणाने होतो. यामध्ये हे जीवाणू रुग्णाच्या त्वचेवर व मज्जासंस्थेवर आघात करतात. त्यामुळे शरीरावर चट्टे दिसतात व वेळेवर उपचार न झाल्यास विकृती होण्याची शक्यता असते. वेळेत कुष्ठरोगाचे निदान झाल्यास योग्य उपचाराने रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे रुग्णाच्या घरातील व संपर्कात येणाऱ्या व्यक्तींनाही हा रोग होण्याची संभावना असते. त्यामुळे संपर्कातील व्यक्तींनी देखील प्रतिबंधात्मक उपचार म्हणून औषधी घेणे गरजेचे असते. कुष्ठरोग हा एम.डी.टी. औषधोपचाराने पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. सुरुवातीलाच निदान झाल्यास कुष्ठरोगामुळे होणारी कोणत्याही प्रकारची विकृती टाळता येऊ शकते. निदान आणि उपचारात दुर्लक्ष केल्यास हात, पाय, डोळ्यांना दिव्यांगत्व येण्याची शक्यता असते. प्रत्येक पिवळा किंवा लाल चट्टा हा कुष्ठरोग असू शकत नाही, त्यामुळे चाचणी आणि निदान यादृष्टीने लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी शरीरावर कुठेही डाग किंवा चट्टा दिसून आल्यास जवळच्या मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जा किंवा आपल्या क्षेत्रातील आशा सेविकांना माहिती द्यावी, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी केले.

पूर्व विदर्भात कुष्ठरोगाच्या रुग्णांची संख्या जास्त आहे. नागपूर शहरातही कुष्ठरुग्णांची संख्या ही मोठी आहे. कुष्ठरोग या आजाराच्या निर्मूलनासाठी रुग्णांना उपचाराच्या कक्षेत आणणे अत्यंत आवश्यक आहे. या आजाराची इतर आजारांप्रमाणे तीव्र लक्षणे नसल्यामुळे रुग्णालाही आपल्याला कुष्ठरोग आहे हे कळत नाही. अशात अशा रुग्णांचा शोध घेणे आव्हानात्मक ठरते. कुष्ठरोगाचा समूळ नायनाट करण्यासाठी नागरिकांनी जागरूक असणे आवश्यक आहे. मनपाच्या आशा सेविका तसेच आरोग्य चमू या कार्यात तत्परतेने कार्य करीत आहेत. नागरिकांनी त्यांना सहकार्य करण्याचे आवाहनही मनपाद्वारे करण्यात येत आहेत.

### कुष्ठरोगाची लक्षणे

फिकट किंवा लालसर रंगाचा बधीर चट्टा
स्नायूंचा अशक्तपणा व डोळा, चेहरा, हात किंवा पायांची विकृती
विरळ झालेले भुवयांचे केस
जाड झालेल्या कानाच्या पाळ्या
अंगावरील गाठी

# शिवराज्याभिषेक सोहळा थाटात साजरा

## छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांची उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

नागपूर महानगरपालिका आणि श्री शिवराज्याभिषेक सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ९) महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री विजय शर्मा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. यावेळी त्यांच्यासोबत आमदार प्रवीण दटके, श्रीमंत राजे मुधोजी भोसले, युवराज जयसिंग भोसले, नागपूर मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी पियुष आंबुलकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन बघून आपण येथे रायगडावरील छत्रपती शिवजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळ्याला आलो असल्याची भावना छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री विजय शर्मा यांनी व्यक्त केली. तसेच त्यांनी सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांनी उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांचे स्वागत केले. अजय चारठाणकर यांनी उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांचे मनपाचा मानाचा दुप्पटा व ७५ व्या अमृत महोत्सवी सन्मानचिन्ह देऊन सत्कार केले. या सोहळ्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल बघायला मिळाली. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता, ज्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सोहळ्यानिमित्त सादर करण्यात आलेल्या शिवकालीन क्रीडा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना त्या ऐतिहासिक काळाची आठवण करून दिली. तसेच, शिवराज्याभिषेक महिला मुद्रा पथकाने केलेल्या सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली.

### कपिलनगरात पावणेदोन लाखांची घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

अज्ञात चोरट्यांनी दाराचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेले पावणे दोन लाखांचे सोन्याचे दागिने चोरी केले. ही घटना कपिल नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. कामगार नगर चौक, बँक कॉलनी येथे राहणारे अनिल इंदोरकर शनिवारी घराला कुलूप लावून कुटुंबासह एका कार्यक्रमात गेले होते.

ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडले. कपाटात ठेवलेले एक लाख 76 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरी केले. अनिल घरी परतले तेव्हा त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. घरातील सीसीटीव्ही मध्ये चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्या आहेत. अनिल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंदवून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप स्थगित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

विदर्भ भूमिअभिलेख कर्मचारी संघटनेच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याचे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्याने संघटनेने संप स्थगित करण्याचे जाहीर केले आहे.



आपल्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ भूमिअभिलेख कर्मचारी संघटनेने अमरावती व नागपूर विभागात २६ मे पासून बेमुदत संप सुरू केला होता. त्याची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींना ४ जून रोजी मंत्रालयात चर्चेसाठी बोलावले होते. बैठकीला राज्याचे जमाबंदी आयुक्त डॉक्टर सुहास दिवसे हे पुण्यावरून ऑनलाईन उपस्थित होते. संघटनेने सादर केलेल्या मागण्यांपैकी सर्वात महत्त्वाची म्हणजे तांत्रिक कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन श्रेणी मिळावी ही होती. ही मागणी मान्य करण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

विभागात सुमारे १५०० पदे दीर्घकाळापासून रिक्त आहेत. त्यानंतरही खात्यामार्फत गेल्या दोन वर्षापासून स्वामित्व योजनेद्वारे राज्यातील सुमारे ४८ हजार गावांतील मालमत्तांची ड्रोनद्वारे मोजणी करून अभिलेख तयार केले. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरावी, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. त्यावर बावनकुळे यांनी सुधारित आकृतिबंध निर्माण करण्यास जमाबंदी आयुक्तांना निर्देश दिले. राजपत्रित वर्ग दोनची सुमारे १५० पदे रिक्त असून पदोन्नतीची फाईल मंत्रालयात प्रलंबित आहे. राजपत्रित अधिकाऱ्यांच्या तातडीने पदोन्नत्या करण्याच्या सूचना बावनकुळे यांनी दिल्या. पदसमूह चारमधील सर्व्हे कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीसह पदसमूह तीनमधील निमतानदार, परीरक्षण भूमापक, तसेच पदसमूहात दोनमध्ये शिरस्तेदार त्यांना सुधारित दारिर्द्वतनश्रेणीचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना जमाबंदी आयुक्तांना दिल्या. यासोबतच मोजणी कर्मचाऱ्यांना मोजणीकरिता १२०० रोवर आणि तेवढेच लॅपटॉप खरेदी करण्याकरिता टेंडर काढण्याच्या सूचना बावनकुळे यांनी दिल्या.

विभागातील कर्मचाऱ्यांनी १५ मे पासून तर विदर्भ भूमिलेख कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली विदर्भात २६ मे पासून बेमुदत संप झाला बैठकीत चर्चा झालेल्या पाच मागण्यांवर राज्य सरकार हे १५० दिवसांच्या गतिमान कार्यक्रमात कार्यवाही करेल असे आश्वासन दिले. त्यानंतर संघटनेने संप स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आश्वासनाची पूर्तता वेळत न झाल्यास नाईलाजाने पुन्हा संप करावा लागेल, असा इशारा विदर्भ भूमिअभिलेख कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्रीराम खिरेकर यांनी दिला.

# गांजा तस्करी प्रकरणातील म्होरक्याला ओडिशातून अटक

### १२ जूनपर्यंत पोलिस कोठडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

गांजा तस्करी प्रकरणातील म्होरक्याला ओडिशा येथून अटक करण्यात आली. बुलबुल ऊर्फ व्हॉट्सअॅप सुकांता प्रधान (24) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. कळमना पोलिसांनी ओडिशा राज्यातील रेराखोल या गावी जाऊन त्याच्या मुसक्या आवळल्या. नागपुरात आणल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला 12 जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

चिखली चौकात गांजाची देवाण-घेवाण करीत असताना कळमना पोलिसांनी पाठलाग करून दोघांच्या मुसक्या आवळल्या. पलाश वानखेडे (31) रा. सूर्योदयनगर, नरसाळा रोड आणि अविनाश ढोके (34) रा. आनंदनगर, बिनाकी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीवरून बुलबुलच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

आता आरोपींची संख्या तीन झाली आहे. या प्रकरणात आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पोलिसांनी आरोपींकडून 108 किलो गांजासह एकूण 43 लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला होता.

पोलिस उपायुक्त निकेतन कदम, पोलिस निरीक्षक प्रवीण काळे यांच्या मार्गदर्शनात एक पथक ओडिशाला रवाना करण्यात आले. पथक प्रमुख उपनिरीक्षक संतोषकुमार रामलोड, पोहवा रविकुमार शाहू, प्रदीप पवार, मंगेश लोही, संदीप ढाले, संतोष पांडे हे ओडिशाला पोहोचले. रेराखोल या गावात गेल्यानंतर बुलबुलची संपूर्ण माहिती काढण्यात आली.

घराभोवती सापळा रचून त्याला अटक करण्यात आली. पोलिस सखोल चौकशी करीत आहेत. बुलबुल स्वतः गांजाची शेती करतो की दुसऱ्याकडून खरेदी करतो, देशभरात त्याचे किती ग्राहक आहेत, कुठपर्यंत त्याची साखळी आहे, गांजा पुरविणारा म्होरक्या कोण, किती लोक यात सहभागी आहेत ही सर्व माहिती पोलिसांना काढायची आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

### प्रतिकिलो मिळायचे १ हजार रुपये

पोलिसांनी अविनाश आणि पलाशची पोलिस कोठडी मिळविली. चौकशीदरम्यान ट्रकचालक अविनाशने सांगितले की, तो बुलबुलकडून गांजा खरेदी करीत होता. पलाशचा गांजा घेऊन ओडिशातून आला असल्याचे त्याने सांगितले. ओडिशाच्या रेराखोल गावातून ट्रान्सपोर्टच्या इतर वस्तूंमध्ये गांजाची पोती लपवून नागपुरात आणल्याची कबुली त्याने दिली. पोलिसांनी आरोपींकडून 27 लाख रुपयांचा गांजा, ट्रक आणि एसयूव्ही असा एकूण 43 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पलाश पोलिसांपासून वाचत मोठ्या प्रमाणात ओडिशातून गांजा तस्करीद्वारे शहरात आणत होता आणि नंतर त्याची इतर विक्रेत्यांना विक्री करीत होता. त्याने यापूर्वीही अशाच प्रकारे दोनदा गांजा बोलावला होता.

# ओगावा सोसायटीला मिळणार शाहु, फुले, आंबेडकर पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. ९ :

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने राज्यस्तरीय शाहु, फुले, आंबेडकर पुरस्कार कामठी येथील ओगावा सोसायटीला दिनांक १० जुनला मिळणार आहे. ओगावा सोसायटीची स्थापना माजी राज्यमंत्री अॅड. सुलेखा कुंभारे यांनी १९९६ साली केली.

ओगावा सोसायटीने विश्वविख्यात ड्रैगन पॅलेस निर्माण केले. ड्रैगन पॅलेस हे शांती, मैत्री व मानव कल्याणकारी विचारांचे केंद्र म्हणुन जगप्रसिध्द झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक व संशोधन केंद्र, ड्रैगन पॅलेस विपश्यना मेडिटेशन सेंटर, ड्रैगन इंटर नेशनल स्कुल, दादासाहेब कुंभारे बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राची निर्मिती ड्रैगन पेलेस परिसरात केली आहे.

वर्षभर शैक्षणिक व सांस्कृतिक राबविण्यात येत असतात. अॅड. सुलेखा ते कुंभारे यांच्या नेत्रुत्वात ओगावा सोसायटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला समर्पित आहे. ओगावा सोसायटीच्या कार्याची दखल घेत शाहु फुले आंबेडकर पुरस्कार देण्याचा निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालयाने घेतल्याची माहिती ड्रैगन पॅलेस टेंपलचे जनसंपर्क अधिकरी सुशील तायडे यांनी दिली. मला माझी आई नलिनी, अॅड. नारायणराव कुंभारे आणि वडील अॅड. दादासाहेब कुंभारे या उभयतांचे पाठबळ हमेशा राहिले आहे.

# रेल्वे गाड्यांची खरी स्थिती जाणून घेण्यासाठी एन.टी.ई.एस. अॅप वापरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

१३९ हेल्पलाइन व्यतिरिक्त, भारतीय रेल्वेकडे नॅशनल ट्रेन इन्क्वायरी सिस्टम एनटीईएस नावाची एक ऑनलाइन सेवा देखील आहे.

ज्याद्वारे प्रवासी देशभरात धावणाऱ्या गाड्यांच्या स्थितीची माहिती जसे की आगमन, प्रस्थान, रद्दीकरण, वळवणे इत्यादी माहिती रिअल टाइममध्ये मिळवू शकतात. ही सेवा वेबसाइट तसेच मोबाइल अॅपच्या स्वरूपात उपलब्ध आहे. एनटीईएस अॅप गुगल प्ले स्टोअरवर मोफत डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे आणि प्रवाशांसाठी एक विश्वासार्ह सहाय्यक बनले आहे.

सध्या, आग्नेय रेल्वेसह देशातील अनेक रेल्वे झोनमध्ये आवश्यक देखभाल आणि पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत, ज्यामुळे काही गाड्या त्यांच्या मूळ स्थानकांवरून उशिराने धावत आहेत. आग्नेय मध्य रेल्वे त्यांच्या नेटवर्कमधील गाड्यांच्या कामकाजावर सतत लक्ष ठेवून आहे जेणेकरून ते शक्य तितके वेळेवर येतील आणि कामकाज चांगल्या पद्धतीने चालविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

प्रवाशांनी त्यांच्या प्रवासासाठी स्टेशनवर येण्यापूर्वी एनटीईएस अॅप किंवा वेबसाइटद्वारे त्यांच्या ट्रेनची वास्तविक स्थिती तपासली पाहिजे, यामुळे प्लॅटफॉर्मवर गैरसोय आणि अनावश्यक वाट पाहणे टाळता येईल.

तथापि, रेल्वे प्रवाशांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर एसएमएसद्वारे गाड्यांच्या स्थितीची माहिती पाठवते आणि स्थानकांवर प्रवासी घोषणा प्रणालीद्वारे नियमित घोषणा देखील करते. एनटीईएसचा वापर प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर, वेळेवर आणि अचूक बनवतो.




### कळमना बाजार समितीतील ५१ मध्यस्थांचे परवाने रद्द

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

कळमना बाजार समितीतील बकरी मंडीतील खरेदी-विक्री व्यवहारातील ५१ मध्यस्थांचे (दलाल) परवाने राज्य शासनाने रद्द केले आहे.

सहकार मंत्र्यांनी दिलेल्या आदेशावरून पणन उपसंचालकांनी ही कारवाई केली. २००२ ते २०१९ या वीस वर्षांच्या काळात बाजार समितीला बकरी खरेदी-विक्रीतून केवळ ९५ हजार रुपयांचाच सेस मिळाला होता. इतकी मोठी व्यापारपेठ असताना इतका कमी महसूल मिळाल्याने यात ४० कोटी रुपयांचा महसूल बुडवून गैरप्रकार झाल्याची तक्रार २०२० मध्ये भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी तत्कालीन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे केली होती.

त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन केली होती. या समितीने दिलेल्या अहवालात गैरप्रकार झाल्याचे उघड झाल्यावर दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार परवाने रद्द करण्याची कारवाई करण्यात आली.

सहकार कायदा १९६७ च्या नियम ६(४) नुसार बाजार समितीच्या बुडालेल्या महसुलाची भरपाई करून घ्यावी, दोषी असणाऱ्या बाजार समितीच्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार समिती अशी कळमना बाजार समितीची ओळख आहे. मात्र समितीवर भ्रष्टाचाराचे आरोप होत असल्याने त्यावर प्रशासक नेमावा, अशी मागणी खोपडे यांनी केली आहे.

# दीड लाखांत विकले साडेआठ तोळे सोने

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

चोरी आणि घरफोडीतील कुख्यात आरोपींनी चोरीचे साडेआठ तोळे दागिने केवळ दीड लाख रुपयांत विकले. चोरीच्या पैशांवर मैत्रिणी आणि साथीदारांसह सतत कारने फिरत होते. महागड्या हॉटेलमध्ये भोजन आणि मौजमस्ती करायचे. चोरीची पद्धत आणि सीसीटीव्ही फुटेजवरून त्यांची ओळख पटविण्यात आली. गुन्हे शाखेचे घरफोडीविरोधी पथक त्यांच्या मैत्रिणीच्या घरावर पाळत ठेवून होते, तर दुसरे पथक त्यांचे लोकेशन मिळवीत होते. बहादुऱ्यात तिघेही एका कारमध्ये असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्या ताब्यातून रोख दीड लाख, तीन मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली. नरेश अकालू महिलांगे (30) रा. कळमना, आम्रपाल ऊर्फ हनुमान पाटील (34) रा. पारडी, सोनू शाहू (32) रा. हुडकेश्वर आणि फरदीन याकूब खान (25) रा. पारडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

त्यांनी प्रतितोळे 19 हजार रुपयेप्रमाणे फरदीनला दागिने विकले. पोलिसांनी साडेआठ तोळे दागिने जप्त करीत या गुन्ह्यात फरदीनलाही आरोपी केले. नरेश हा चोरी आणि घरफोडीत कुख्यात आहे. त्याने आतापर्यंत अनेक घरफोड्या आणि चोऱ्या केल्या. अलीकडेच त्याला घरफोडी आणि चोरीच्या एकूण 18 गुन्ह्यांत गुन्हे शाखेने अटक केली होती. 15 मेपासून तो जामिनावर होता.

सोनू ही लकी शाहूची पत्नी. नरेश मोठमोठ्या चोऱ्या करीत असल्याने लकीची साथ सोडून सोनू नरेशसोबत राहू लागली. लकी हादेखील घरफोडीत सक्रिय आहे. गुन्हे शाखेने त्याला कालच अटक केली. नरेश, सोनू आणि त्याचा साथीदार आम्रपाल यांनी महाल परिसरात घरफोडी करीत 20 लाख रुपये किमतीचे दागिने आणि पाच लाख रोख चोरले. तेव्हापासून तिघेही चोरीच्या कारने फिरत होते. पारडीतील फरदीन याकूब खान हा प्रॉपर्टी डिलगचे काम करतो. आम्रपाल हा त्याच्या ओळखीचा आहे.

20 लाख रुपये चोरीचे दागिने सराफा व्यापाऱ्याला विकणे धोक्याचे आहे, पकडले जाऊ शकतो, अशी शक्यता आरोपींना वाटली. त्यामुळे आम्रपालने फरदीनसोबत संपर्क साधला. त्याला साडेआठ तोळे दागिने केवळ दीड लाख रुपयांत म्हणजे 19 हजार रुपये तोळ्याप्रमाणे विकले.

# कुख्यात गुन्हेगार महानगरातून मागवितात एमडी पावडर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

महानगरातून शहरात अंमलीपदार्थ मागविणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराच्या अजनी पोलिसांनी मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडू 37 ग्रॅम एमडी पावडर, चार मोबाईल आणि दोन मोटारसायकल असा एकूण दोन लाख 75 हजार रुपये कमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. तिघांनाही न्यायालयाने 12 जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

अमित लोखंडे (25) रा. न्यु कैलास नगर, लोकेश भोडे (33) रा. जादूमहल चौक आणि दत्तू उर्फ विशाल दाभने (41) रा. न्यु कैलासनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. लोकेश आणि दत्तू हे दोघेही कुख्यात गुन्हेगार असून त्यांच्यावर तब्बल 27 गुन्ह्यांची नोंद आहे. तर अमित हा सुध्दा गुन्हेगारी जगतात असून त्याच्यावर दोन गुन्हे आहेत. आरोपी दत्तूचे महानगरातील मोठ्या तस्करांशी संबध आहेत. ते रस्ते मार्गाने कवा रेल्वेने नागपुरात एमडी पावडर आणून देतात. नंतर दत्तू हा अमित आणि लोकेशच्या माध्यमातून विक्री करतो. त्यांचे शहरात ठराविक ग्राहक आहेत. त्यांच्यापर्यंत ड्रग्स पोहोचविण्याचे दोघेही काम करतात.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीनचंद्र राजकुमार यांनी खात्रीलायक माहितीच्या आधारे सापळा रचून अमितला थांबविले. झडती घेतली असता त्याच्याकडून 2.50 ग्रॅम एमडी मिळाला. त्याच्या ताब्यातून दोन मोबाईल, अॅक्टीव्हा जप्त करण्यात आली. सखोल चौकशी केली असता त्याने लोकेश भोडे (33) रा. जादूमहल चौक याचे नाव सांगितले. पोलिस पथक त्याच्या घरी धडकले. पंचासमक्ष त्याच्या घराची झडती घेतली असता झिपलॉक पन्नीत 5 ग्रॅम एमडी पावडर मिळून आली. त्याने दत्तूचे नाव सांगितले. पोलिस पथक दत्तूच्या घरी धडकले. त्याच्या घराची झडती घेतली असता 11 झिपलॉक पन्नीत 29.50 ग्रॅम एमडी पावडर मिळून आली. तसेच दोन मोबाईलही मिळाले. तिघांनाही ठाण्यात आणून सखोल चौकशी करण्यात आली.

# महावितरणचा वर्धापन दिन साजरा

## 'शून्य अपघात' संकल्पनेत कर्मचाऱ्यांसह कुटुंबियांचा सहभाग



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

महावितरणच्या आपला 20 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात नुकताच साजरा केला. यानिमित्ताने नागपूर परिमंडलाने आयोजित कार्यक्रमात नियमित व बाह्यस्रोत कर्मचारी, अभियंते, अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, ज्यामुळे कार्यक्रमाला एक कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले.

नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली, वर्धापन दिनानिमित्त 1 ते 6 जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन नागपूर व वर्धा जिल्ह्यांत व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. या सप्ताहात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मॅरेथॉन, रॅली, चित्रकला व निबंध स्पर्धा, तसेच रहिवासी सोसायट्यांना भेटी देऊन वीज वितरण व वापरावेळी घ्यावयाच्या खबरदारीबाबत माहिती दिली. ग्राहक आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षितता या सप्ताहाच्या केंद्रस्थानी होती. सप्ताहाच्या समारोपाचा आणि वर्धापन दिनाचा मुख्य कार्यक्रम नागपूर व वर्धा येथे कर्मचारी आणि कुटुंबियांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या आयोजनाने अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 351 व्या राज्यभिषेक दिनानिमित्त त्यांच्या अधार्कृती पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्याने झाली. त्यानंतर महावितरणच्या 20 वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या चित्रफिती दाखवण्यात आल्या. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे शुभेच्छा संदेश तसेच वीज सुरक्षेबाबत घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी, सावनेर विभागातील धापेवाडा आणि बुटीबोरी विभागातील मोहगाव, डोंगरगाव, निलडोह, आणि सोनेगाव येथील 33 केव्ही उपकेंद्रांना मिळालेल्या आयएसओ मानांकनाबद्दल संबंधित कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी आणि बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, वीज सुरक्षा सप्ताहादरम्यान आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांनाही बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याला मुख्य अभियंता दिलीप दोडके, संचालक (ग्राहक व्यवहार) अॅड. गौरी चंद्रायण, परीक्षक आणि सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत, अधीक्षक अभियंते अमित परांजपे व संजय वाकडे यांच्यासह परिमंडळातील अभियंते, अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरणचे नागपूर परिक्षेत्र, नागपूर परिमंडल, नागपूर शहर आणि ग्रामीण तसेच स्थापत्य आणि चाचणी मंडळांतर्गत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कामठी मार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर येथे विशेष मनोरंजनाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध टीव्ही कलावंत जित कोष्टी यांच्या 'हास्यरंग' या एकपात्री विनोदी कार्यक्रमाने उपस्थितांना पोट धरून हसायला लावले.

# ८४ जुन्या वृक्षाचे यशस्वी ट्रांसप्लांटेशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

पर्यावरण संरक्षणाच्या आणि हरित नागपूरच्या दिशेने नागपूर महानगरपालिकेतर्फे एक उल्लेखनीय पाऊल उचलण्यात आले आहे. मनपाने ८४ वर्ष जुन्या हेरिटेज झाडाचे वृक्ष ट्रान्सप्लान्टर मशीनच्या सहाय्याने प्रायोगिक तत्वावर यशस्वीपणे प्रत्यारोपण सोमवारी (ता.९) करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून या अभिनव प्रयोगाला मोठे महत्त्व आहे.

मनपाच्या उद्यान आणि वर्कशॉप विभागाने भांडेप्लॉट, येथील पिंपळाच्या वृक्ष या मशीनच्या सहाय्याने शीतला माता मंदिर जवळ, भविष्य निर्वाह निधी कार्यालय जवळ यशस्वीपणे प्रत्यारोपण करण्यात आले. याप्रसंगी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. आणि उपायुक्त (उद्यान)गणेश राठोड उपस्थित होते. या मशीनच्या खरेदीसाठी जिल्हा नियोजन निधीतून ५ कोटी ४७ लक्ष रुपयांची तरतूद झाली आहे. मनपातर्फे खरेदी करण्यात आलेल्या या मशीनला प्रादेशिक परिवहन विभागाकडून वाहन क्रमांक सुद्धा प्राप्त झाला आहे.



### पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून मनपाचा अभिनव प्रयोग

भांडे प्लॉट चौक वर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणतर्फे फ्लाय ओव्हर बांधण्यात येत आहे. या रस्त्यावर मुखर्जी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलजवळ पिंपळाचा मोठा ८४ वर्ष जुना वृक्ष वाहतुकीसाठी अडथळा होता. या ३० फूट उंच झाडाला 'वृक्ष ट्रान्सप्लान्टर मशीनच्या सहाय्याने जमिनीतून उचलून दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आले. हे करताना झाडाच्या मुळांना आणि खोडाला नुकसान न करता दुसऱ्या ठिकाणी नेण्यात आले. डकोटा कंपनीची ही मशीन महाराष्ट्रातील दुसरी मशीन आहे. ठाणे महानगरपालिकाकडे सुद्धा ही मशीन आहे. या मशीनचे काम रिमोटद्वारे केले जाते. अगोदर जे सी बी ने झाडाच्या जवळ मोठा खड्डा करण्यात आला. त्यानंतर या मशीनच्या सहाय्याने झाडाला उचलून दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आले. या मशीन मध्ये १६०० लिटर पाण्याची टाकी सुद्धा आहे. जे झाड काढतांना आणि लावतांना पाणी टाकून झाडाच्या मुळांना पाणी देत राहते.

नागपूर मध्ये सुरू असलेल्या विविध विकास कामासाठी अडथळे निर्माण करणाऱ्या झाडांना प्रत्यारोपण करण्यात या मशीनची मदत होऊ शकते. यावेळी नेहरूनगर झोनच्या सहायक आयुक्त सोनम देशमुख, कार्यकारी अभियंता राजेश गुरमुळे, उज्ज्वल लांजेवार, उद्यान अधीक्षक अमोल चौरपागार आणि इतर अधिकारी उपस्थित होते.